
# वृषाली जोशी

# हर्क्युलसचे श्रम- २



# The Labors of Hercules-2

# हर्क्युलसचे श्रम- २

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# हर्क्युलसचे श्रम- २

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युलसचे श्रम- २

## लेखिका : अगाथा ख्रिस्ती

## अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १२ सप्टेंबर २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# हर्क्युलसचे श्रम- २

## कथांचा क्रम

अगाथा ख्रिस्ती

हर्क्युलस

1. हर्क्युलसचे श्रम
2. क्रेटन बैल
3. डिओमेडसचे घोडे
4. हिप्पोलीटाचा कंबरपट्टा
5. गेरयॉनचा कळप
6. सोनेरी सफरचंदे
7. सर्बेरस कुत्र्यावरील पकड

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या

गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे..

# हर्क्युलस

ग्रीक पुराणकथेप्रमाणे हर्क्युलस हा देवांचा राजा झिअस याचा पुत्र असून, त्याचा सावत्र भाऊ व राजा असलेला युरेस्थियस हा त्याला [ त्याच्या मृत आईमार्फत ] बारा श्रमांची अवघड कामे करायला सांगतो. त्यासाठी हर्क्युलस बारा वर्षे प्रवास करत असतो. ही अशक्य भासणारी कामे तडीस नेऊन तो लोकांच्या मनातील त्याचे स्थान एवढे उंचावतो, की ते त्याला देवत्व बहाल करतात. नंतर तो प्रजेचा आवडता राजा होतो. ही बारा श्रमांची कामे ‘हर्क्युलसचे श्रम’ म्हणून प्रसिद्ध आहेत.

पहिलेः नेमियन सिंह

दुसरेः लर्नियन हायड्रा

तिसरेः ऑर्केडीयन हरीण

चौथेः इरायमॅथियन डुक्कर

पाचवेः ऑजियन तबेले

सहावेः स्टॅयम्फॅलियन पक्षी

सातवेः क्रेटन बैल

आठवेः डिओमेडसचे घोडे

नववेः हिप्पोलीटाचा कंबरपट्टा

दहावेः गेरयॉनचा कळप


अकरावेः सोनेरी सफरचंदे

बारावेः सर्बेरस कुत्र्यावरील पकड

अगाथा ख्रिस्तीने या हर्क्युलसच्या बारा श्रमांच्या कामांवर आधारित अशी बारा आधुनिक कामे हर्क्युल पायरो करतो, असे पुढील दोन भागात असलेल्या सहा सहा कथांच्याद्वारे मांडले आहे.

**The Labors of Hercules**

# हर्क्युलसचे श्रम




हर्क्युल पायरोच्या सदनिकेत आधुनिक फर्निचर होते. ते क्रोमियमने चमकत होते. तेथील खुर्च्या आरामशीरपणे गुबगुबीत

होत्या. त्यांच्या चौकोनी आकारामध्ये काही तडजोड केलेली नव्हती.

त्यापैकी एका खुर्चीवर हर्क्युल पायरो नीट बसला होता. खुर्चीच्या मध्यभागी त्याच्यासमोर दुसऱ्या खुर्चीत, सगळयांचा मुख्य डॉ बर्टोन बसला होता. मोठ्या आनंदाने तो पायरोच्या चॅटेऊ मोटॉन रोथ्सचिल्ड येथील पेयाचे घुटके घेत होता. डॉ बर्टोन व्यवस्थित नव्हता. तो जाडा, गबाळा असून त्याच्या पांढऱ्या केसांमध्ये तांबडी सतेज त्वचा दिसत होती. खोल श्वासाचा आवाज काढत तो हसत असे. त्याच्याभोवती तंबाखूची राख पसरलेली असे. पायरो राख गोळा करायची भांडी त्याच्याभोवती ठेवायचा फुकट प्रयत्न करत होता.

डॉ बर्टोन प्रश्न विचारत होता. “हर्क्युल, मला का ते सांग.”

“म्हणजे तुला माझ्या ठेवलेल्या नावाबद्दल विचारायचे आहे का?”

दुसरा विरोध दाखवत बोलला, “ठेवलेल्या नावाबद्दल नव्हे. ते नक्कीच पागन [ ख्रिश्चन, इस्लामिक नसलेले व अनेक देवांना भजणारे ] आहे. पण का? ते मला जाणून घ्यायचे आहे. वडिलांची आवड का? आईचा इच्छेमुळे का? की काही कौटुंबक कारणाने? जर मला बरोबर आठवत असेल, तरी माझी स्मरणशक्ती आता

पूर्वीसारखी राहिली नाही --- तुला ॲचिले नावाचा एक भाऊ आहे, नाही का?”

पायरोचे मन मागे जाऊन ॲचिले पायरोच्या करीयरसंबंधी विचार करू लागले. ते सगळे खरेच घडले होते का?

तो उत्तरला, “फक्त काही काळासाठी.”

डॉ बर्टोनने युक्तीने ॲचिले पायरोचा विषय बदलला. “लोक स्वतःच्या मुलांची नावे ठेवायच्या बाबतीत जास्त जागरूक व्हायला हवेत.” खोलवर विचार करत, तो बोलला, “मला देवासारखी मुले आहेत, हे मला माहिती आहे. त्यातील एक गोरा आहे. तर एक जिप्सीसारखा काळा! मग डेरड्रे आहे. दुःखमय डेरड्रे --- त्या मुलीचे नाव मेरी आहे. ती म्हणजे छोट्या इल माशासारखी आहे. अजून धीर नावाची मुलगी आहे खरे तर तिचे नाव अधीर चांगले शोभले असते, कारण ती तशी आहे. आणि डायना --- ठीक आहे --- तो वयस्क, हुशार जाणता मनुष्य शहारला. आता तिचे वजन बारा दगडांइतके आहे. आणि ती फक्त पंधरा वर्षांची आहे. ते म्हणतात ती फार जाड आहे --- पण मला ती तशी वाटत नव्हती --- त्याना तिला हेलन या नावाने हाक मारायची होती --- पण मी तिथे ठाम राहिलो. तिचे आई वडील व आजी कसे दिसतात, हे मला माहिती होते. त्यामुळे मी मार्था किंवा डोरकसवर किंवा काही

अर्थवाही शब्दावर भर दिला. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. माझे श्रम फुकट गेले. तिचे पालक दारूबाज लोक होते.''

पायरो त्याच्याकडे चौकसपणे बघत होता. तो हळूहळू श्वासाचा आवाज करत व चेहऱ्यावर आठ्या पाडत बोलला, ''काल्पनिक संभाषणाचा विचार करता, तुझी आई आणि कैलासवासी मिसेस होम्स या छोटे कपडे शिवत किंवा काही विणत बसल्या आहेत, ''ॲचिले, हर्क्युल, शेरलॉक, मायक्रॉफ्ट --- ''

त्याच्या मित्राच्या विनोदी बोलण्याचा आनंद हर्क्युल पायरो घेऊ शकला नाही. ''मला एवढेच समजले, की मी हर्क्युलससारखा दिसत नाही?''

डॉ बर्टोनचे डोळे त्या छोट्याशा, नीटनेटक्या, पट्टेरी पँट, काळे जाकीट व छान टाय घातलेल्या हर्क्युल पायरोवरून, त्याच्या चामडी बुटांवरून, अंडाकृती डोक्यावरून व वरचा ओठांवर खूप शोभणाऱ्या मिशांवरुन फिरले.

''पायरो, मोकळेपणाने बोलायचे तर तसे नाही. मला वाटते, तुला ती गाजलेली व्यक्तिरेखा जाणून घ्यायला कधी सवड झाली नाही, बरोबर?''

''तसे आहे खरे!''

“हे दयनीय आहे. तू खूप काही गमावले आहेस. जर माझ्या हातात असते, तर मी सगळ्यांना आपली जुनी गाजलेली पुस्तके अभ्यासायला लावली असती.”

पायरोने खांदे शहारवले. “अरे मित्रा, माझे त्यावाचून उत्तम चालले आहे.”

“चालू दे! चालू दे! प्रश्न चालण्याचा नाही आहे. तो फार चुकीचा दृष्टीकोन आहे. हल्लीच्या पत्राद्वारे शिक्षणासारखा आपली जुनी गाजलेली पुस्तके म्हणजे काही झटपट यश मिळवण्याची शिडी नाही. माणसाचे कामाचे तास किती याचे महत्व नाही, त्याच्या फुरसतीच्या वेळाचा प्रश्न आहे. ही चूक आपण सगळे करतो. तुझेच बघ, सर्व चांगले चालले आहे. त्यातून तुला हवे ते मिळत असेल. सोपे करून सांगायचे म्हणजे, तू तुझ्या रिकाम्या वेळाचे काय करणार आहेस?”

पायरोचे उत्तर तयार होते. “मी गंभीरपणे भाजीचे शेत लावणार आहे.”

डॉ बर्टोनना धक्का बसला. “शेती करणार? म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? त्या फुगलेल्या हिरव्या पाणचट भाज्या?”

पायरो उत्साहाने बोलला, “मला तेच तर करायचे आहे. त्या पाणचट नसतात.”

“ओहो, मला माहिती आहे. त्यांना चीजने, कांद्याने अथवा पांढऱ्या सॉसने शिंपडा.”

“नाही. नाही. तुम्ही चूक करत आहात. माझी कल्पना अशी आहे, की भाजीच्या पिकात सुधारणा करायची. ती फुलांच्या गुच्छासारखी दिसायला हवी.”

“अरे माणसा, ही चांगली कल्पना आहे. ती लाल वाइन आहे. फुलांचा गुच्छ या शब्दामुळे डॉ बर्टोनना त्यांच्या कोपराजवळ असलेल्या पेल्याची आठवण आली. त्याने घोटभर पिऊन त्याचा आस्वाद घेतला. “ही फार छान वाइन आहे. अगदी मस्त! हो. त्याने मान्यतेने त्याचे डोके हलवले. “पण हा भाजीचा व्यवसाय --- त्याबद्दल तू गंभीर नाहीस ना? खरेच तसा तुझा विचार नाही ना?” तो मोठ्या भीतीने विचारत होता --- त्यामुळे तू गाळात जाशील.” त्याचे हात सहानुभूतीपूर्वक त्याच्या ढेरपोटावर विसावले. ”तुझा बेंडबाजा वाजेल.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला भाजीशेतीबद्दल चांगली माहिती दिसते आहे.”

“मी गावाकडे रहात असतांना, लोकांना हे करतांना पाहिलेले आहे. पायरो, पण खरेच हा काय छंद आहे! त्याची तुलना --- “ त्याचा आवाज खोल समाधानाने कापरा झाला --- पुस्तकांची

ओळ असलेल्या खोलीत शेकोटीसमोर आरामखुर्चीत --- ती खोली लांबलचक असणार --- चौकोनी नाही. सगळीकडे पुस्तके --- पेयाचा पेला भरलेला आणि तुमच्या हातात उघडे पुस्तक! वाचता वाचता काय छान वेळ जातो!" तो खर्जातील आवाजात बोलला.

त्याने भाषांतर केले, "वाइनच्या गडद समुद्रावरील लाटा पायलटने त्याचे कसब वापरून परत सरळ केल्या. डौलदारपणे जहाज वाऱ्यावर डोलत होते... "

अर्थात भाषांतराने मूळ कवितेतील स्वाद येत नाही."

थोडा वेळ त्याच्या उत्साहात मग्न होऊन, तो पायरोला विसरला. पायरोला त्याला बघून एकदम एक संशय आला. --- एक अस्वस्थ कळ आली. इकडे तिकडे त्याचे काही चुकले होते का? जाणीवेची श्रीमंती? त्याच्यावर उदासीचे सावट आले. खरेच त्याने जुनी गाजलेली पुस्तके अभ्यासायला हवी होती --- फार पूर्वीच --- आता त्यासाठी फार उशीर झाला.

डॉ बर्टोनने त्याची खुपणारी उदासी दूर हटवत विचारले, "तू खरेच निवृत्त व्हायचा विचार करतो आहेस का?"

"हो."

दुसरा गालातल्या गालात हसत बोलला, “नाही. असे करू नकोस.”

“पण मी तुला सांगतो आहे.”

“अरे, पण तू हे करू शकणार नाहीस. तुला तुझ्या कामात खूप रुची आहे.”

“नाही, खरेच मी सर्व तजवीज केली आहे. आणखी काही केसेस --- विशेषतः निवडक केसेस --- नाही. माझ्याकडे येतील त्या सर्व नव्हे. फक्त खासगीपणे विनवणी करणाऱ्या!”

डॉ बर्टोन जिवणी रुंद करत बोलला, “असे आहे तर! एखाददुसरी केस, अजून एकच केस --- असे करत --- पायरो, प्रिमा डोनाच्या शेवटच्या कामाची केस बहुधा तुझ्या यादीत नसेल.”

तो छोटा, पांढऱ्या केसांचा माणूस मित्रत्वाने गालातल्या गालात हसत बोलला, “तुझे श्रम हर्क्युलसचे श्रम नाहीत. तुझे प्रेमाचे श्रम आहेत. मी चुकीचे बोलत असेन वा बरोबर असेन, तर तू बघशीलच. मी पैज लावतो की बारा महिन्यांच्या काळात, तू अजून इथेच असशील. भाजी उगवायचा विचार अजून --- “ तो शहारला. “फक्त विचारच राहील.”

त्याच्या पाहुण्याचा निरोप घेऊन, डॉ बर्टोनने चौकोनी खोली सोडली. पायरो पुन्हा न वाचण्यासाठी पाने उलटत राहिला. त्याने मागे ठेवलेल्या कल्पनेबरोबर आपल्याला काम करायला हवे.

तो गेल्यावर पायरो हळूच स्वप्नातल्यासारखा बसला व गुणगुणला, “हर्क्युलसचे श्रम --- मी ठीक आहे. तू? हे चिरडीला आणणारे आहे.”

दुसऱ्या दिवशी पायरोने स्लीमरने लिहिलेले गाईच्या कातड्याच्या वेष्टनातील पुस्तक आणले व सततच्या लकड्यामुळे एक त्रासिक कटाक्ष त्यातील छापील मजकुरावर टाकला.

त्याची सचिव मिस लेमनला त्यातील हर्क्युलसचे श्रम शोधण्याचे काम देऊन, ते त्याच्यासमोर ठेवायला सांगण्यात आले. त्यात रस नसतांना [ तिचा स्वभाव कुठलेही काम नाकारण्याचा नव्हता. ] तिने झटपट तिचे काम पूर्ण केले.

‘त्या आश्चर्यचकित करणाऱ्या समुद्रासारख्या विशाल, जुन्या गाजलेल्या व मौखिक परंपरेने पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या प्रसिद्ध नायक हर्क्युलसने पायरोचे डोके खायला सुरवात केली. मरणानंतर त्याला देवांच्या ओळीत बसवले गेले आणि त्याला दैवी मान दिला जाऊ लागला.’ इथपर्यंत ठीक होते पण नंतरचा भाग जरा गुंतागुंतीचा होता. पायरोने दोन तास तो लक्ष देऊन वाचला.

त्यावरून टिपणे काढली. भुवया उंचावत, कागदांच्या तुकड्यांचा अर्थ लावत आणि इतर पुस्तकांचा संदर्भ घेऊन, तो त्या कामात गुंतलेला राहिला. शेवटी तो खुर्चीत मागे सरकून आरामात बसला व मान हलवली. आधीच्या संध्याकाळची त्याची मनस्थिती निघून गेली. काय लोक असतात! हा हर्क्युलस घ्या. हा नायक! तो काय होता, तर महाकाय, स्नायुबल असलेला, पण डोक्याने जरा कमी असलेला आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचा! पायरोला एकदा १८९५ मध्ये लयॉन येथे ज्याच्यावर खटला चालवला गेला, त्या ॲडॉल्फ डयुरांड नावाच्या खाटकाची आठवण झाली. त्याची ताकद एखाद्या बैलासारखी होती व त्याने अनेक मुलांना ठार मारले होते. त्याला अत्यंत त्रासदायक अशी चक्कर येत असल्याचे सांगून त्याची केस लढवली गेली. चक्करेचे स्वरूप फार मोठे होते की लहानसे, यावर अनेक दिवस चर्चा झाली. हा पुराणातील हर्क्युलस बहुधा मोठ्या त्रासदायक स्वरूपच्या चक्करेने बेजार होता. नाही. पायरोने डोके हलवले. नाही. ही जर ग्रीक नायकाची कल्पना असेल, तर आधुनिक मोजमापाने ते चालणार नाही.

त्या जुन्या धाटणीने त्याला चक्रावून टाकले. या त्या काळातील देवदेवतांना आधुनिक काळातील गुन्हेगारांसारखी टोपणनावे होती. नक्कीच त्यांचे स्वरूप गुन्हेगारी असले पाहिजे. दारूसारखी पेये घेणे, लैंगिक वर्तनातील आनंद उपभोगणे, बहीण

भावातील लैंगिक संबंध, स्त्रियांवरील लैंगिक बळजोरी, चोऱ्या, खूनखराबा आणि फसवणूक यामुळे --- कोर्ट केसेस आणि जज्जचे निकाल या गोष्टी सतत चालू असणार. चांगले कौटुंबिक आयुष्य नाही. सुव्यवस्था नाही. त्यांच्या गुन्हा करण्यातदेखील काही पद्धत नाही.

या सर्व गोष्टींमुळे अपेक्षाभंग झालेला पायरो उठून उभा रहात बोलला, “खरेच हर्क्युलस! त्याने आजूबाजूला पसंती दर्शवत पाहिले. आधुनिक फर्निचर असलेली चौकोनी खोली --- एखाद्या खोलीत एखादे आधुनिक शिल्प ठेवलेले! कुठे तांब्याच्या वायरची भौमितिक रचना केलेली! आणि या सर्वांमध्ये चमकणारा तो! त्याने आरशात स्वतःकडे पाहिले. इथे आधुनिक हर्क्युलस होता --- त्या पुराणातील कुरूप, फुगलेल्या स्नायुंच्या, हातात शस्त्र धरलेल्या, नग्न आकृतीपेक्षा खूप वेगळा. छोट्याशा नीटनेटक्या आकृतीचा, चांगल्या शहरी कपड्यात, मिशा असलेला --- अशा मिशा ठेवायचे कधी हर्क्युलसला स्वप्नातही सुचले नसते. मोठ्या पण तरीही सुसंस्कृत मिशा. तरीही हर्क्युल पायरो आणि सनातन रूढीच्या हर्क्युलसमध्ये एका गोष्टीत साम्य आहे. दोघेही संशयातीतपणे, जगाला त्रास देणाऱ्या उपद्रवी गोष्टींपासून जगाचे संरक्षण करत आहेत --- दोघेही ते रहातात, त्या समाजाचा फायदा करून देणारे आहेत.

काल रात्री जाताना डॉ बर्टोन काय म्हणाला होता --- "तुझे श्रम हर्क्युलससारखे नाहीत --- "

ओहो, पण तो चुकीचे बोलला होता. जुना प्राणी! इथे पुन्हा एकदा हर्क्युलसचे श्रम केले जाणार आहेत --- आधुनिक हर्क्युलसचे --- हुशार व मनोरंजन करणाऱ्या हर्क्युलसची अभिमानाची गोष्ट इथे घडणार आहे. त्याच्या निवृत्तीपूर्वी तो बारा केसेस घेईल. कमी नाही आणि जास्तही नाही. या बारा केसेस जुन्या हर्क्युलसच्या बारा श्रमांशी मिळत्या जुळत्या असतील. हो. ते फारच मनोरंजक ठरेल. ते कलात्मक व अध्यात्मिक असेल.

पायरोने ते जुने, बहुमुल्य पुस्तक उचलले आणि पुन्हा त्याच्यात बुडून गेला. तो हर्क्युलसच्या बारा श्रमांशी अगदी सहीसही नक्कल करणार नव्हता. त्यात बाई किंवा नेससचा शर्ट असणार नव्हता --- श्रम आणि फक्त श्रम.

मग पहिले श्रम नेमीयन सिंहाचे असणार होते. 'नेमीयन सिंह' त्याने त्याच्या जिभेला सवय होण्यासाठी पुनरुच्चार केला. अर्थात त्याला मास आणि रक्त असलेल्या सिंहाची अपेक्षा नव्हती. प्राणीसंग्रहालयातील अधिकारी काही त्याच्याकडे त्यांची खऱ्या सिंहाची समस्या घेऊन येणार नव्हते. तसे झाले असते, तर ते अतीच सादृष्य ठरले असते. नाही. इथे ते प्रतीकात्मक असणार होते. या

पहिल्या केसमध्ये समाजातील कोणीतरी प्रसिद्ध व्यक्ती असायला पाहिजे. ती महत्वाची आणि भावनाशीलदेखील असायला हवी. कोणी मोठा गुन्हेगार --- किंवा पर्याय म्हणून, लोकांच्या मते सिंह असायला हवा. कुणी प्रसिद्ध लेखक वा राजकीय नेता वा चित्रकार किंवा राजघराण्यातीलही चालेल का?

त्याला राजघराण्यातील व्यक्तीची कल्पना आवडली ---

त्याला काही घाई नव्हती. तो त्या खूप महत्वाच्या केससाठी थांबला असता --- त्याने स्वतः होऊन स्वतःवर लादलेले हे श्रमाचे काम होते.

# THE CRETAN BULL
## क्रेटन बैल



### एक

हर्क्युल पायरोने त्याच्या पाहुणीकडे विचारपूर्वक बघितले. ठाम निर्धाराची हनुवटी असलेली, निळ्यापेक्षा करड्या रंगाचे डोळे असलेली व निळसर काळ्या छटेचे केस असलेला असा एक क्वचित दिसणारा फिकट चेहरा त्याला दिसला --- तिच्या केसांच्या

बटा जुन्या ग्रीसमधील स्त्रीसारख्या निळसर जांभळ्या रंगाच्या होत्या.

तिने बरोबर मापाचा, गावाकडील छानदार ट्वीड कोट घातला होता. तिच्या हातात एक लहानशी ओंगळ बॅग होती. एखाद्या मुलीचा नैसर्गिकपणे वाटणारा कमीपणा निघून जाईल, असा तिचा निरागस ताठा होता, असा विचार पायरोने स्वतःशी केला.

"हो. ती गावाकडील गरीब मुलगी दिसते आहे. काहीतरी वेगळ्याच हेतूने ती माझ्याकडे आलेली दिसते."

आणि तिचा आवाज थोडा थरथरवत डायना मॅबेर्ली म्हणाली,

"मला --- मला माहिती नाही की मिस्टर पायरो, तुम्ही मला मदत करू शकाल की नाही. ही फार असामान्य परिस्थिती आहे."

पायरो बोलला,

"पण काय? मला सांग."

डायना मॅबेर्ली म्हणाली,

"काय करावे, ते मला कळत नाही. म्हणून मी तुमच्याकडे आले आहे. काही करण्यासारखे आहे का, हेदेखील मला माहिती नाही."

"ते तुम्ही मला ठरवू द्याल का?"

त्या मुलीच्या चेहऱ्याचा रंग लगेच बदलला. तिने दम टाकत भरभर सांगायला सुरवात केली.

"मी तुमच्याकडे आले आहे, कारण माझा ज्याच्याशी एक वर्षापूर्वी साखरपुडा झाला होता, त्याने तो मोडला आहे."

ती थांबली व तिने त्याच्याकडे धीटपणे पण विरोधात्मक नजरेने पाहिले.

"तुम्हाला नक्कीच असे वाटले असेल, की मी वेडी आहे."

हर्क्युल पायरोने सावकाश त्याचे डोके हलवले.

"अग मुली, उलट मला अजिबात संशय नाही, की काही झाले तरी तू खूप बुद्धिमान असणार. पण प्रेमिकांची भांडणे मिटवणे, हे काही माझ्या आयुष्याचे उद्दिष्ट नाही. मला पक्के माहिती आहे, की तुम्हालाही ते माहिती आहे. त्यामुळे हा साखरपुडा तोडण्यात काही असामान्य असले पाहिजे. असेच आहे ना?"

त्या मुलीने मान हलवली. तिने स्पष्ट व नेमक्या शब्दात सुरु केले,

"ह्यूने आमचा साखरपुडा मोडला, कारण त्याला वाटले तो वेडा होत चालला आहे आणि अशा माणसाने लग्न करू नये."

हर्क्युल पायरोच्या भुवया थोड्या वर गेल्या.

“आणि तुला तसे वाटत नाही का?”

‘मला माहिती नाही. शेवटी वेडे असणे म्हणजे काय? प्रत्येकजण थोडासा वेडा असतोच.”

पायरोने काळजीपूर्वक मान्य केले, “असे म्हणतात खरे.”

“जेव्हा तुम्हाला असे वाटते, की तुम्ही शिजवलेल्या अंड्यासारखे लिबलिबीत असून तुम्हाला जबरदस्तीने गप्प बसवले जात आहे, तेव्हा असे होते.”

“तुझ्या प्रियकराने ती अवस्था गाठली आहे का?”

डायना मॅबेर्ली म्हणाली,

“मला तर ह्यामध्ये काही विचित्र वाटत नाही. ओहो, तो चांगल्या स्थिर मनाचा माणूस आहे, हे मला माहिती आहे. सशक्त --- त्याच्यावर अवलंबून रहावे, असा.”

“मग त्याला असे का वाटते, की तो वेडा होत चालला आहे?”

पायरो क्षणभर थांबला व बोलला,

“कदाचित त्याच्या कुटुंबात वेडेपणा आहे का?”

डायनाने ठामपणे होकारार्थी तिची मान हलवली व बोलली,

“मला वाटते, त्याचे आजोबा वेडे होते आणि कोणी आत्याआजी किंवा कोणीतरी. पण मी काय म्हणते, प्रत्येक कुटुंबात

कोणीतरी विचित्र असतेच. तुम्हाला माहिती आहे, अर्धे शहाणे, अती शहाणे किंवा तत्सम!”

तिचे डोळे विनंती करत होते.

हर्क्युल पायरोने दुःखाने मान हलवली व बोलला,

“मुली, मी तुझ्यासाठी दिलगीर आहे.”

ती रडू लागली व ओरडली,

“मला कुणी माझी कीव करायला नको आहे. मला तुम्ही काही काम करायला हवे आहे.”

“तुला मी काय करायला हवे आहे?”

“मला माहिती नाही. पण काहीतरी चुकीचे झाले आहे.”

“मुली, तू मला तुझ्या प्रियकराबद्दल सर्व काही सांगशील का?

डायना भरभर सांगू लागली,

“त्याचे नाव ह्यू चँडलर आहे. तो चोवीस वर्षांचा आहे. त्याचे वडील ॲडमिरल चँडलर आहेत. ते लायडे सदनमध्ये रहातात. राणी एलिझाबेथच्या वेळेपासून ते तिथे रहात आहेत. ह्यू हा एकुलता एक मुलगा आहे. तो नेव्हीमध्ये गेला --- सगळे चँडलर्स खलाशी आहेत --- ती एक प्रकारे त्यांची परंपरा आहे. पंधरा साली, सर गिल्बर्ट चँडलर, सर वॉल्टर रॅले बरोबर होता. ह्यू नेव्हीमध्ये

काही शिकायला गेला. त्याच्या वडिलांना इतर काही माहिती नव्हते. आणि तरीही --- आणि तरीही त्याच्या वडिलांनी आग्रह धरला, की त्याने त्यातून बाहेर पडावे.”

“हे केव्हा झाले?”

सुमारे वर्षापूर्वी. अगदी अचानक!”

“नेव्हीमधील आयुष्य ह्यूला आवडत होते का?”

“पूर्णपणे!”

“तिथे काही प्रकरण झाले नव्हते ना?”

“ह्यूविषयी? काहीही नाही. त्याचे तिथे चांगले चालले होते. त्याला --- त्याला वडिलांनी असे का सांगितले, ते समजलेच नाही.”

ॲडमिरल चँडलरनी काय कारण दिले?”

डायना हळू म्हणाली,

“त्यांनी खरे तर काही कारण दिले नाही. ओहो! ते म्हणाले की ह्यूने इस्टेट सांभाळायची गरज आहे --- पण --- पण एवढेच. जॉर्ज फ्रोबिशरला सुद्धा एवढेच कळले.”

“जॉर्ज फ्रोबिशर कोण?”

“कर्नल फ्रोबिशर. ते ॲडमिरल चँडलर यांचे जुने दोस्त आहेत आणि ह्यूचे मार्गदर्शक. ते त्यांचा बराचसा वेळ लायडे सदनमध्ये घालवतात.”

“आणि त्यांना ॲडमिरल चँडलरचा मुलाने नेव्ही सोडावी, या ॲडमिरल यांच्या निर्णयाबद्दल काय वाटते?”

“ते काहीच बोलत नाहीत. त्याना ते काही समजतच नाही. कुणालाच समजत नाही.”

“ह्यूला स्वतःलाही नाही?”

डायनाने लगेच उत्तर दिले नाही. पायरो मिनिटभर थांबला. मग बोलला,

“त्यावेळी तो देखील आश्चर्यचकित झाला असेल. पण आता? तो काहीही बोलला नाही? काहीही नाही?”

डायना कसेबसे पुटपुटली,

“एक आठवड्यापूर्वी तो म्हणाला की --- त्याच्या वडिलांचे बरोबर होते. तेवढेच करणे शक्य होते.”

“तू त्याला का ते विचारले नाहीस का?”

”अर्थात विचारले. पण तो काही बोलला नाही.”

हर्क्युल पायरो मिनिटभर विचारात पडला व मग बोलला,

“तुमच्या जगात काही उलथापालथ झाली होती का? काही विशेष घडले होते का? सुमारे एक वर्षापूर्वी? स्थानिक लोकांनी ज्याबद्दल बोलत सुटावे, असे काही घडले का? पुरावा नसलेले असे काही घडले का?”

ती लाजून म्हणाली, “तुम्ही काय म्हणता आहात, ते मला कळत नाही.”

पायरो शांतपणे, पण अधिकारवाणीने बोलला,

“काय ते मला सांगितलेले बरे!”

“तुम्ही म्हणता, तसे काही नाही --- काही झाले नाही.”

“मी म्हणतो तसे नाही, मग कसे?

“मला वाटते, तुम्ही काही नको ते विचारत आहात. शेतावर नेहमी विचित्र गोष्टी घडत असतात. तो सूड होता --- किंवा गावातील कुणी मूर्ख माणूस वा कुणीतरी.”

“काय झाले?”

ती बोलायचे नसतांना म्हणाली, “एका मेंढीसंबंधी उगीचच काही आवई उठली --- तिचा गळा चिरला गेला. ओहो! ते भयंकर होते. ती ज्या एका शेतकऱ्याची होती, तो फार कठोर मनुष्य होता. पोलिसांना वाटले की हा एक प्रकारचा त्याच्यावर घेतलेला सूड होता.”

“पण ते दुष्कृत्य कोणी केले त्या माणसाला त्यांनी पकडले नाही का?”

“नाही.”

ती घाबरत म्हणाली, “पण जर तुम्हाला असे वाटत असेल -”

पायरोने त्याचा हात वर केला व तो म्हणाला, “मला काय वाटते आहे, ते तुला काहीच कळत नाही. मला सांग तुझ्या प्रियकराने डॉक्टरचा सल्ला घेतला का?”

“नाही. माझी खात्री आहे, की नाही.”

“ते करणे, त्याच्यासाठी सर्वात सोपे नव्हते का?”

डायना सावकाश म्हणाली,

“नाही. तो तसे करणार नाही. तो डॉक्टरचा द्वेष करतो.”

“आणि त्याचे वडील?”

“मला वाटते, त्यांचाही डॉक्टरवर फारसा विश्वास नसावा. ते म्हणतात, तिथे खूप फसवे व्यापारी स्वभावाचे डॉक्टर आहेत.”

“ॲडमिरल कसे आहेत? ठीक आहेत का? आनंदी आहेत का?”

डायना हळू आवाजात बोलली,

“ते फार वयस्क दिसू लागले आहेत --- “

“मागील वर्षी का?”

‘हो. ते मोडून पडले आहेत. त्यांची फक्त सावली उरली आहे.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली व तो बोलला,

“त्यांना त्यांच्या मुलाचा साखरपुडा पसंत होता?”

“हो. हो. असे बघा माझ्या घरच्या लोकांची जमीन त्यांच्या जमिनीला लागून आहे. आम्ही पिढ्यानपिढ्या तेथे रहात आहोत. ते आमच्या साखरपुड्याबद्दल घाबरत घाबरत आनंदी होते.”

‘आणि आता तुमचा साखरपुडा मोडल्याबद्दल, ते काय म्हणतात?”

त्या मुलीचा आवाज थोडा थरथरला. ती म्हणाली,

“मी त्यांना काल सकाळी भेटले. ते घाबरलेले दिसत होते. त्यांनी माझा हात त्यांच्या दोन्ही हातात धरला व म्हणाले, “माझ्या मुली, माझा मुलगा योग्य गोष्ट करतो आहे --- तेवढीच गोष्ट त्याला करणे शक्य आहे.”

हर्क्युल पायरो म्हणाला, “आणि म्हणून तुम्ही माझ्याकडे आलात?”

तिने मान हलवून विचारले, “तुम्ही काही करू शकाल का?”

हर्क्युल पायरो उत्तरला,

“मला माहिती नाही. पण मी तिथे स्वतः येऊन बघू शकतो.”

## दोन

दुसऱ्या कशाहीपेक्षा, ह्यू चँडलरचे मोठे धट्टेकट्टे शरीर बघून हर्क्युल पायरो प्रभावित झाला. उंच, महाकाय व प्रमाणबद्ध, रुंद छाती व खांदे आणि पिवळसर तपकिरी केसांचे डोके. तो महाशक्तीमान व मोठा उमदा पुरुष वाटत होता.

ते डायनाच्या घरी आल्यावर, तिने ताबडतोब ॲडमिरल चँडलरना फोन केला. ते लायडे सदनमध्ये गेले. तिथे लांब गच्चीत चहा त्यांची वाट बघत होता. चहाबरोबर तीन माणसे होती. पांढऱ्या केसांचा व वयापेक्षा मोठा दिसणारा ॲडमिरल चँडलर होता त्याचे खांदे जणू कुठल्या तरी जड ओझ्याने वाकले होते. त्याचे डोळे काळेभोर व उदास दिसत होते. तर त्याचा मित्र कर्नल फ्रोबिशर त्याच्या उलट होता. कणखर व कोरडा असा छोटा माणूस! कानशीलांवर त्याचे लालसर केस करडे होऊ लागले होते. चपळ, शीघ्रकोपी, लागेल असे बोलणारा, भीती वाटेल असा व भेदक डोळ्यांचा छोटा माणूस! त्याला भुवया डोळ्यांवर ओढून घ्यायची व डोके खाली करून पुढे करायची सवय होती. त्याच्या भेदक

डोळ्यांनी तो तुमचे आरपार निरीक्षण करत असे. तिसरा माणूस ह्यू होता.

कर्नल फ्रोबिशर म्हणाला, “चांगला नमुना आहे, नाही का?”

तो हळू आवाजात बोलला. पायरो ह्यूकडे लक्ष देऊन बघत असल्याचे त्याला समजले.

हर्क्युल पायरोने त्याचे डोके हलवले. तो आणि कर्नल फ्रोबिशर जवळ बसले होते. इतर तिघांच्या खुर्च्या चहाच्या टेबलापासून लांब होत्या आणि ते आपापसात मोठ्या रुबाबात पण थोड्या कृत्रिमपणे गप्पा मरत होते.

पायरो पुटपुटला, “हो, तो महाकाय आहे --- महाकाय आहे. तो तरुण बैल आहे --- हो. एखादा असे म्हणू शकेल, पॉसिडॉनचा [ग्रीक पुराणातील समुद्रदेव ] एकनिष्ठ बैल --- सौष्ठवपूर्ण सशक्त पुरुषाचा नमुना!”

“तो अगदी सुदृढ दिसतो, नाही का?”

फ्रोबिशरने सुस्कारा टाकला. त्याचे भेदक डोळे कडेने पायरोकडे बघत होते. तो म्हणाला,

“तू कोण आहेस हे मला माहिती असल्याचे, तुला माहिती आहे का?”

“अस्स! ते काही गुपित नाही!”

पायरोने त्याचा राजेशाही हात हलवला. त्याच्या हावभावांवरुन असे वाटत होते, की तो छुपा रुस्तुम होता. तो त्याच्यासारखाच विचार करत होता.

दोन मिनिटाने फ्रोबिशरने विचारले, “त्या मुलीने तुम्हाला या बाबतीत, उदास व्हायला लावले का?”

“कुठल्या बाबतीत?”

“तरुण ह्यूच्या बाबतीत --- हो, मला वाटते, तुम्हाला या बाबतीत सर्व काही माहिती आहे. पण ती तुमच्याकडे का आली, ते मला समजत नाही --- हे तुमच्या पद्धतीचे काम आहे, असे मला वाटत नाही. कारण ती समस्या जास्त वैद्यकीय स्वरूपाची आहे.”

“तुम्हाला आश्चर्य वाटेल --- पण सर्व प्रकारचा समस्या या माझ्या कामाच्या पद्धतीत मोडतात.”

“म्हणजे मला म्हणायचे आहे, तिची तुमच्याकडून काय अपेक्षा आहे, कुणास ठाऊक!”

पायरो म्हणाला, “मिस मॅबेर्ली झुंजार मुलगी आहे.”

कर्नल फ्रोबिशरनेदेखील तिच्याबद्दल कौतुकाचे शब्द काढून मान हलवली.

“हो, ती झुंजार आहे, हे ठीक आहे. ती चांगली मुलगी आहे. ती मागे हटणारी नाही. पण काही गोष्ट अशा असतात, की तिथे झुंजार वृत्तीने लढता येऊ शकत नाही --- “

त्याचा चेहरा अचानक म्हातारा व दमलेला दिसू लागला.

पायरोने त्याचा आवाज अजून खर्जात नेऊन खासगीत विचारले,

“कुटुंबात वेडाची परंपरा असल्याचे मी ऐकले, ते खरे आहे का?”

फ्रोबिशरने मान हलवली.

तो पुटपुटला, “फक्त आता ते वेड परत वर डोके काढते आहे. मध्ये एक दोन पिढ्या काही नव्हते. ह्यूचे आजोबा तसे असलेले शेवटचे.”

पायरोने इतर तिघांच्या दिशेने नजर टाकली. डायना मस्तपैकी संवाद साधून हसत होती व ह्यूला चिडवत होती. असे दिसत होते, की त्या तिघांना जगाची काही पर्वा नाही.

पायरोने हळूवारपणे विचारले, “हा कशा प्रकारचा वेडेपणा आहे?”

ह्यूचे आजोबा शेवटी फार आक्रमक झाले होते. वयाच्या तिशीपर्यंत ते अगदी चांगले होते. मग ते हळूहळू विचित्र होऊ

लागले. लोकांना ते कळायला थोडा वेळ लागला. मग कुजबुज सुरु झाली. लोक सरळ त्याबद्दल बोलू लागले. नंतर तेही संपले. पण काय सांगणार --- " त्यांनी त्यांचे खांदे उडवले. "याचा शेवट ते वेडे होण्यात झाला. बिचारे राक्षसी कृत्ये करणारे, खुनी झाले. त्याना मानसिक रुग्ण म्हणून जाहीर करावे लागले."

काही क्षण थांबून ते म्हणाले,

"मला वाटते, ते खूप म्हातारे होईपर्यंत जगले --- अर्थात त्याचेच ह्यूला भय आहे. म्हणून त्याला डॉक्टरकडे जायचे नाही. त्याला वर्षानुवर्षे कोंडले जाण्याची भीती आहे. मी त्याला दोष देऊ शकत नाही. मलाही तसेच वाटते."

"आणि ॲडमिरल चँडलर, त्याना कसे वाटते?"

कर्नल फ्रोबिशर थोडक्यात म्हणाला, "यामुळे ते पार खचून गेले आहेत."

"मुलगा त्यांचा फार लाडका आहे का?"

"त्यांचे विश्व मुलाभोवतीच आहे. असे बघा, त्यांची बायको बोटीच्या अपघातात बुडाली. तेव्हा मुलगा दहा वर्षांचा होता. तेव्हापासून ते फक्त मुलाकरता जगत आहेत."

"ते त्यांच्या पत्नीशी फार एकनिष्ठ होते का?"

“ते तिची पूजा करत असत. ती --- ती मला माहिती असल्याप्रमाणे अती सुंदर बाई होती. क्षणभर थांबून, ते धक्का बसल्यासारखे बोलले, “तिचा फोटो तुम्हाला बघायचा आहे का?”

“मला तो बघायला आवडेल.”

फ्रोबिशर त्याची खुर्ची मागे ढकलून उठला व मोठ्याने म्हणाला,

“चार्ल्स, मी मिस्टर पायरोंना एक दोन गोष्टी दाखवण्यासाठी नेतो आहे. ते निष्णात गुप्तहेर आहेत.”

ॲडमिरलनी उगीचच हात वर केला. फ्रोबिशर गच्चीवर गेले. पायरो त्यांच्या पाठोपाठ गेला. क्षणभर डायनाच्या चेहऱ्यावरील आनंदी मुखवटा गळून पडला व तिथे एक प्रश्नचिन्ह उमटले. ह्यूनेदेखील त्या मोठ्या काळ्या मिशावाल्या छोट्या माणसाकडे वर पाहिले.

पायरो फ्रोबिशरच्या पाठोपाठ घरात शिरला. सूर्यप्रकाशातून एकदम तिथे गेल्यामुळे अंधुक दिसत होते. पण त्याच्या लक्षात आले की जुन्या, सुंदर वस्तूंनी घर भरलेले होते.

कर्नल फ्रोबिशर फोटोंच्या जागी पोचण्यासाठी मार्गक्रमणा करत राहिला.

चँडलर घराण्यातील मृत व्यक्तींच्या तसबिरी तिथे भिंतीला ओळीने लावलेल्या होत्या. त्यांचे चेहरे आनंदी पण कठोर होते. पुरुष माणसे नेव्हीच्या पोशाखात होती, तर बायका सॅटीनचे कपडे घातलेल्या व मोत्याने मढलेल्या होत्या. फ्रोबिशर शेवटी एका तसबिरीशी थांबला

व घोगऱ्या आवाजात म्हणाला, "हे ऑर्पेनने रंगवले आहे."

तो एका उंच बाईकडे बघत उभा राहिला. तिचा हात कुत्र्याच्या पट्ट्यावर होता. तिचे केस लालसर तपकिरी रंगाचे होते आणि चेहऱ्यावर उत्साही व चपळ भाव होते.

फ्रोबिशर म्हणाला, "हे तिचे ज्वाळेसारखे लखलखणारे सौदर्य बघा. तुम्हाला असे वाटत नाही का?"

"काही गोष्टीत हो."

"पण त्याने अर्थात तिचे स्त्रीमार्दव, नाजूकता दाखवली नाही. सर्व महत्वाच्या बाबतीत --- ही पुरुषी आवृत्ती वाटते." तो मध्येच बोलायचा थांबला. हे दयनीय आहे, की त्या चित्रकारांने चँडलर घराण्यातील एकच गोष्ट उचलली, जिच्याशिवाय हे चित्र अधिक सुंदर झाले असते --- "

ते स्तब्ध झाले. त्यांच्या भोवतालच्या हवेत, उदासी भरून राहिली. जसे काही मृत चँडलर्स त्यांच्या रक्तातील अपराधी

गंडाशिवाय वेळोवेळी वाहून येणाऱ्या वाईट भागाबद्दल सुस्कारे टाकत होते ---

त्याच्याबरोबरील लोकांकडे पहाण्यासाठी, हर्क्युल पायरोने डोके वळवले. जॉर्ज फ्रोबिशर अजूनही त्याच्या वरील बाजूस असलेल्या भिंतीवरील सुंदर बाईकडे टक लाऊन बघत होता. पायरो हळूवारपणे बोलला,

"तुम्हाला ती चांगली माहिती असेल --- "

एकदम धक्का बसून फ्रोबिशर बोलला,

"आम्ही लहानपणी एकत्र होतो. मी सेकंड लेफ्टनंट म्हणून भारतात गेलो, तेव्हा ती सोळा वर्षांची होती --- मी परत आलो तेव्हा --- तिचे चार्ल्स चँडलरबरोबर लग्न झाले होते."

"तुम्ही त्यालाही चांगले ओळखत होतात?"

"चार्ल्स माझ्या जुन्या मित्रांपैकी एक होता. तो माझा घट्ट मित्र होता आणि आहे."

"त्यांच्या लग्नानंतरही तुम्ही त्यांना पहात असाल, नाही का?"

"मी माझ्या बहुतेक रजा इथे घालवत असे. ही जागा म्हणजे माझे दुसरे घरच होते. चार्ल्स आणि कॅरोलीन माझ्यासाठी एक खोली तयार ठेऊन, माझी वाट बघत असत --- "त्याने त्याचे खांदे सरळ केले. अचानक त्याने वाद घालायच्या पावित्र्यात त्याचे डोके पुढे

केले. “म्हणूनच मी इथे आहे --- जर चार्ल्सला माझी गरज असेल, तर मी इथे आहे.”

“डायनाचा व ह्यूचा साखरपुडा मोडल्याचे तुम्हाला माहिती आहे का?

“हो, मला ते माहिती आहे.”

“आणि त्याचे कारण माहिती आहे का?”

फ्रोबिशर कडकपणे उत्तरला, “त्याबद्दल मला काही माहिती नाही. तरुण मंडळी ते आपापसात ठरवत असतात. त्यात नाक खुपसण्याचे मला काही कारण नाही.”

पायरो बोलला,

“ह्यू चँडलरने डायनाला सांगितले, त्यांनी लग्न करणे बरोबर नाही, कारण त्याचे डोके फिरू लागले आहे.”

त्याने पाहिले की फ्रोबिशरच्या कपाळावर घर्मबिंदू डवरले आहेत. तो म्हणाला,

“त्या नकोशा गोष्टीबद्दल आपण बोललेच पाहिजे का? तुम्हाला काय वाटते, तुम्ही काय करू शकाल? ह्यूने बरोबर गोष्ट केली आहे. बिचारा! ती काही त्याची चूक नाही. अनुवंशिकता --- जीन्सचा परिणाम --- मेंदूतील पेशी --- पण एकदा त्याला माहिती

झाल्यावर तो साखरपुडा मोडण्याव्यतिरिक्त काय करू शकतो? त्याच्यासाठी ती गोष्ट करणे भागच पडले.”

“जर ते काय, ते मला कळले तर --- “

“ते तुम्हाला माझ्याकडून कळले असेल.”

“पण तुम्ही तर मला काहीही सांगितले नाहीत.”

“मी तुम्हाला म्हणालो, की मला तो विषय वाढवायचा नाही.”

“अ‍ॅडमिरल चँडलरने त्याच्या मुलाला नेव्हीतून राजीनामा देणे का भाग पाडले?”

“कारण तेवढेच करणे शक्य होते.”

“का?”

फ्रोबिशरने त्याचे हट्टी डोके हलवले.

पायरो मृदुपणे बोलला,

“हे कुठल्या मेंढीला मारण्याशी निगडीत होते का?”

दुसरा मनुष्य रागाने बोलला,

“म्हणजे तुम्ही हे ऐकले आहे?”

“डायनाने मला सांगितले.”

“त्या मुलीने तिचे तोंड गप्प ठेवणे, शहाणपणाचे ठरले असते.”

"तिला हे माहिती नव्हते, की यावरून काही निष्कर्ष निघेल."

"तिला माहिती नाही."

"तिला काय माहिती नाही?"

बोलायचे नसतांना, रागाने, धक्का बसून फ्रोबिशर बोलला,

"ओहो, जर तुम्हाला ते माहिती असेल, तर --- चँडलरना त्या रात्री आरडाओरडा ऐकू आला. ते काय झाले, ते शोधू लागले. मुलाच्या खोलीत उजेड होता. चँडलर आत गेले. ह्यू आतमध्ये कपडे घालून गाढ झोपला होता --- अगदी गाढ --- कपड्यांवर रक्त सांडले होते. खोलीतील बेसिन रक्ताने तुडुंब भरले होते. त्याच्या वडिलांना त्याला जागे करवेना. दुसऱ्या दिवशी मेंढीचा गळा चिरला गेल्याचे सांगितले गेले. ह्यूला प्रश्न विचारण्यात आले. पण त्या मुलाला त्याबद्दल काही माहिती नव्हते. त्याला तो बाहेर गेल्याचे आठवत नव्हते --- दरवाज्याच्या कडेला त्याचे चिखलाने भरलेले बूट सापडले. बेसिनमधल्या रक्ताबद्दल देखील तो काही सांगू शकत नव्हता. त्याला काहीच स्पष्टीकरण देता येत नव्हते. त्या बिचाऱ्याला काही माहिती नव्हते, तुम्हाला कळते आहे का?

चार्ल्स माझ्याकडे आला. आम्ही बोललो. काय करणे बरे राहील? --- तीन रात्रींनंतर परत हे घडले --- त्यानंतर तुमचे तुम्ही बघू शकता. मुलाला नेव्ही सोडावी लागली. जर तो इथे चार्ल्सच्या

नजरेखाली असेल, तर चार्ल्स त्याच्यावर लक्ष ठेऊ शकेल. नेव्हीमध्ये काही भानगड होणे, परवडण्यासारखे नव्हते. हे एवढेच करणे शक्य होते.”

पायरोने विचारले, “त्यानंतर काय?”

फ्रोबिशरने घाबरून म्हटले, “मी आता अजून कुठल्याही प्रश्नांची उत्तरे देणार नाही आहे. ह्यूला त्याचे बरे वाईट समजते, असे तुम्हाला वाटत नाही का?”

हर्क्युल पायरोने उत्तर दिले नाही. तो नेहमी कबूल करायला नाराज असे की त्याच्यापेक्षा कोणाला जास्त कळते.

## तीन

ते हॉलमध्ये आल्यावर, त्याना आत येत असलेला ॲडमिरल चँडलर भेटला. तो क्षणभर उभा राहिला. बाहेरील उजेडामुळे त्याच्या बाह्यात्काराची काळी आकृती दिसत होती.

तो घोगऱ्या आवाजात हळू बोलला,

“ओहो, तुम्ही दोघे इथे आहात तर! मिस्टर पायरो, मला तुमच्याशी बोलायचे आहे. माझ्या अभ्यासिकेत या.”

फ्रोबिशर उघड्या दाराने बाहेर गेला आणि पायरो ॲडमिरलच्या मागे गेला. त्याला असे वाटत होते, की त्याला बोटीवरील वरच्या डेकवर त्याची स्वतःबद्दलची माहिती देण्यासाठी बोलावले गेले आहे.

ॲडमिरलने पायरोला एका मोठ्या आरामखुर्चीकडे नेले व स्वतः तशाच एका खुर्चीत बसला. पायरो फ्रोबिशरबरोबर असतांना इतरांच्या अस्वस्थतेने, चिडण्याने व नाराज होण्याने प्रभावित झाला होता. ही सर्व मोठ्या मानसिक ताणाची लक्षणे होती. ॲडमिरल चँडलरबरोबर त्याला निराशादायक वाटले व खोलवरचे शांत दुःख जाणवले ---

खोल सुस्कारा टाकून चँडलर बोलला, “डायनाने तुम्हाला यात ओढ्ल्याबद्दल मला तुमची माफी मागितली पाहिजे --- बिचारी मुलगी! मला कळते आहे, तिला हे किती कठीण जाते आहे. पण --- ठीक आहे. ही आमची खासगी दुःखांतिका आहे. मिस्टर पायरो, तुम्ही समजून घ्याल, की आम्हाला यात बाहेरील व्यक्ती नको आहे.”

“मला तुमच्या भावना समजतात.”

गरीब बिचारी डायना --- ती यावर विश्वास ठेवत नाही --- पहिल्यांदा माझाही बसला नाही. जर मला माहिती नसते, तर माझा अजूनही विश्वास बसला नसता --- “

तो थांबला.

“काय माहिती आहे का?”

“ते रक्तात असलेले, काही वाईट, असेच ना?”

“आणि तरी तुम्ही साखरपुडा होऊ दिला?”

ॲडमिरल चँडलर बोलला,

“तुमचे म्हणणे आहे, की मी तेव्हाच त्यातून काढता पाय घ्यायला हवा होता? पण तेव्हा मला काही कल्पना नव्हती. ह्यू त्याच्या आईवर गेला होता --- चँडलरचे विशेष काही त्याच्यात आल्याचे दिसत नव्हते. मला आशा होती, की तो अगदी तिच्या वळणावर गेलेला आहे. लहानपणापासून आतापर्यंत त्याच्यात कधी काही विचित्रपणा दिसला नाही. किंवा मला काही कळले नाही --- ते सोडून द्या. तसे तर प्रत्येक जुन्या कुटुंबात काही मानसिक त्रुटी असतातच!”

पायरो हळूवारपणे म्हणाला, ”तुम्ही कुणा डॉक्टरांचा सल्ला घेतला नाही का?”

चँडलर गरजला, ”नाही. आणि घेणारही नाही. इथे मी त्याच्याकडे बघत असतांना मुलगा सुरक्षित आहे. एखाद्या जंगली पशुसारखे ते त्याला चार भिंतीत कोंडून घालू शकत नाहीत --- “

“तुम्ही म्हणता की तो सुरक्षित आहे. पण इतरांचे काय?”

“म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे?’

पायरोने उत्तर दिले नाही. तो ॲडमिरलच्या उदास काळ्या डोळ्यात रोखून बघत राहिला.

ॲडमिरल कटूपणे बोलला,

“ज्याचे त्याचे आपापले नशीब! तुम्ही गुन्हेगार शोधत असता. माझा मुलगा गुन्हेगार नाही, मिस्टर पायरो.”

“अजून नाही.”

“अजून नाहीचा अर्थ काय?”

“या गोष्टी वाढतात --- ती मेंढी --- “

“त्याबद्दल तुम्हाला कुणी सांगितले?”

“डायना मॅबेर्ली. आणि तुमचा मित्र कर्नल फ्रोबिशरदेखील.”

“जॉर्जने त्याचे तोंड गप्प ठेवायला हवे होते.”

“तो तुमचा खूप जुना मित्र आहे ना?”

ॲडमिरल खर्जातील आवाजात बोलला, “माझा घट्ट मित्र.”

“आणि तुमच्या --- बायकोचाही मित्र?”

चँडलर हसला.

“हो. ती जेव्हा अगदी तरुण होती, तेव्हा मला वाटते, जॉर्जचे कॅरोलीनवर प्रेम होते. जॉर्जने कधी लग्न केले नाही. ते बहुधा त्याच कारणाने असावे. पण मी नशीबवान होतो --- किंवा तसे मी तरी समजतो. मी तिला पळवले, पण फक्त गमावण्यासाठीच!”

त्याने उसासा टाकला व त्याचे खांदे पडले.

पायरो म्हणाला, “तुमची बायको जेव्हा बुडाली, तेव्हा कर्नल फ्रोबिशर तुमच्याबरोबर होता?”

चँडलरने मान हलवली.

“हो. तो आमच्याबरोबर तेव्हा कॉर्नवॉलमध्ये होता. ती आणि मी बोटीत बरोबर होतो. तो त्या दिवशी घरी राहिला होता. मला कधीच कळले नाही, की बोट कशी उलटली --- अचानक तिच्यात भोक पडून बहुधा पाणी आत शिरले असावे. आम्ही उपसागरात होतो --- चांगलीच भरती होती. मला शक्य होते, तेवढा वेळ मी तिला धरून ठेवले --- त्याचा आवाज फाटला. दोन दिवसांनी तिचे प्रेत सापडले.. मी देवाचे आभार मानले, की त्यादिवशी आम्ही ह्यूला बरोबर नेले नव्हते. असे मला त्या वेळेस तरी वाटले. आता

--- तसे पाहिले तर --- ह्यूसाठी चांगलेच झाले. बिचारा तो छोटारडा! कदाचित तो आमच्याबरोबर असता, तर --- "

परत तिथे एक खोलवर, निराश उसासा आला.

"मिस्टर पायरो, आम्ही शेवटचे चँडलर्स होतो. आमच्यानंतर लायडे सदन मध्ये अजून चँडलर्स असणार नाहीत. जेव्हा ह्यूचा डायनाशी साखरपुडा झाला --- ठीक आहे, त्याबद्दल बोलणे नकोच. देवाचे आभार, की त्यांनी लग्न केले नाही. मी एवढेच सांगू शकतो."

## चार

हर्क्युल पायरो गुलाबाच्या बागेत बसला होता. त्याच्या शेजारी ह्यू चँडलर बसला होता. डायना नुकतीच तेथून गेली होती.

त्या तरुण, देखण्या व त्रासलेल्या माणसाने पायरोकडे बघितले.

तो म्हणाला,

"मिस्टर पायरो, तुम्ही तिला समजावले पाहिजे."

तो मिनिटभर थांबला व परत बोलू लागला,

“तुम्हाला माहिती आहे, की डायना झुंजार मुलगी आहे. ती हे असे अर्धवट सोडणार नाही. तिला याचा छडा लागेपर्यंत, ती गप्प बसणार नाही. ती असा समज करून घेईल, की मी वेडा आहे.”

“तुम्ही वेडे आहात, अशी “तुमची स्वतःची खात्री आहे का?”

त्या तरुण मनुष्याने वेदनेने शरीर आक्रसून घेतले. तो म्हणाला,

“मी माझ्या डोक्याच्या बाबतीत अजून आशा सोडलेल्या नाहीत, पण ते दुखणे वाढत चालले आहे. डायनाला माहिती नाही, ते बरे आहे. मी ठीक असतानाच फक्त तिने मला पाहिले आहे.”

“आणि तुम्ही जेव्हा बरे नसता, तेव्हा काय होते?”

हयूने एक खोल श्वास घेतला. मग तो म्हणाला,

“एका गोष्टीचे --- मी स्वप्न बघतो. आणि जेव्हा मी स्वप्न बघतो, तेव्हा मी वेडा होतो. उदाहरणार्थ, काल रात्री मी माणूस राहिलो नाही. पहिल्या प्रथम मी एक बैल होतो --- वेडा बैल --- चकचकीत सूर्यप्रकाशात धावत सुटलेला --- माझ्या तोंडात सतत धूळ आणि रक्त होते --- मग मी कुत्रा झालो --- लाळ गळत असलेला कुत्रा --- मला कुत्र्याची भीती वाटते. मी आल्यावर मुले घाबरून पळून जाऊ लागली --- माणसे मला ठार मारायला बघू लागली --- माझ्यासाठी कोणीतरी पाण्याचे मोठे भांडे भरून ठेवले पण मला ते पिता येईना. मला पिता येईना --- “

तो थांबला. “मी जागा झालो. आणि मला समजले, ते खरे होते. मी बेसिनशी गेलो. माझे तोंड कोरडे पडले होते. मला तहान लागली होती. पण मी पाणी पिऊ शकत नव्हतो. मिस्टर पायरो, मला गिळता येत नव्हते --- अरे बापरे, मला पिता येत नव्हते --- “

हर्क्युल पायरोने हलकीशी गुणगुण केली. ह्यूने त्याचे हात रागाने गुडघ्यांवर दाबून ठेवले होते. त्याचा चेहरा पुढे आलेला असून डोळे अर्धे मिटलेले होते, जसे काही तो त्याच्याकडे येणारे काही पहात होता. ह्यू पुढे म्हणाला,

“आणि स्वप्नांपेक्षा वेगळ्या अशादेखील काही गोष्टी आहेत. मी जागा असतांनासुद्धा त्या मला दिसतात. भुते, विचित्र आकार मला घाबरवतात. कधीकधी मी माझे अंथरूण सोडतो व हवेतून उडू लागतो. वाऱ्यावर स्वार होतो --- दुष्ट प्रवृत्ती माझ्याबरोबर असतात.”

पायरो बोलला, “अस्स!”

तो हळूवार, नकोसा आवाज होता.

ह्यू त्याच्याकडे वळला.

“ओहो, यात काही संशय नाही. ते माझ्या रक्तात आहे. कुटुंबाचा वारसा आहे. मी त्यातून सुटू शकत नाही. मला हे

लग्नाआधी समजले, याबद्दल देवाचे आभार! समजा आम्हाला मूल झाले असते आणि त्याच्याकडे हा वारसा गेला असता तर!"

त्याने पायरोच्या दंडावर त्याचा हात ठेवला. तुम्ही तिला सांगायला हवे. तिने मला विसरून जायला हवे. केव्हातरी कोणीतरी तिला भेटेल. तरुण स्टीव्ह ग्रॅहम आहे --- तो तिच्यासाठी वेडा झालेला आहे आणि तो चांगला मनुष्य आहे. ती त्याच्याबरोबर सुखी होईल --- सुरक्षित राहील. मला ती --- सुखी रहायला हवी आहे. अर्थात ग्रॅहम केव्हाचा तयार आहे आणि तिच्या घरचे लोकही! पण मी जाईन, तेव्हा ते ठीक होतील."

हर्क्युलच्या आवाजाने त्याचा आवाज मध्येच तोडला.

"तू जाशील, तेव्हा ते ठीक होतील म्हणजे काय?"

ह्यू हसला. ते प्रेमळ, चांगले हसू होते. तो बोलला,

"माझ्या आईचे पैसे आहेत. तुम्हाला माहिती आहे की तिला ते वारसाहक्काने मिळाले. ते माझ्याकडे आले. ते सगळे मी डायनासाठी ठेवले आहेत."

पायरो खुर्चीत ताठ बसला. "काय?"

मग तो म्हणाला, "पण मिस्टर चँडलर, तुम्ही कदाचित खूप वर्षे जगाल.

ह्यू चँडलरने डोके हलवले. तो तीक्ष्णपणे बोलला,

“नाही, मिस्टर पायरो. मी म्हातारा होईपर्यंत जगणार नाही.”

नंतर तो अचानक शहारला.

तो पायरोच्या खांद्यावरून मागे बघत बोलला, ““‘अरे बापरे! हे बघा! तिथे तुमच्या शेजारी --- एक सांगाडा आहे --- त्याची हाडे हलत आहेत. तो मला बोलावतो आहे --- खाणाखुणा करतो आहे --- “

सूर्याकडे टक लावून बघितल्याने, त्याचे डोळे, डोळ्यातील बाहुली विस्तारली होती. तो जणू पडल्यासारखा कडेला झुकला.

मग पायरोकडे वळून जवळजवळ मुलासारख्या आवाजात म्हणाला,

“तुम्हाला काही दिसत नाही?”

हर्क्युल पायरोने हळूहळू डोके हलवले.

ह्यू घोगऱ्या आवाजात म्हणाला,

“हे असे काही दिसणे --- याचे एवढे काही नाही. पण मी रक्ताला घाबरतो. माझ्या खोलीतील, माझ्या कपड्यांवरील रक्त! आमच्याकडे एक पोपट आहे. एका सकाळी तो माझ्या खोलीत होता. त्याचा गळा चिरलेला होता --- आणि मी अंथरुणात हातात रेझर घेऊन, रक्तात भिजून पडलो होतो.”

तो पायरोच्या जवळ सरकला.

तो कुजबुजला, “अगदी अलीकडेही काही गोष्टी मी मारल्या. गावामध्ये --- सर्वत्र --- खाली. मेंढ्या, कोकरे --- एक छोटा कुत्रा. वडील मला रात्री कोंडून ठेवतात, पण कधीकधी --- कधीकधी --- सकाळी दार उघडते. माझ्याकडे किल्ली असते. पण मी ती कुठे लपवून ठेवली आहे, तेच मी विसरून जातो. मला माहिती नसते. या गोष्टी करणारा मी नसतो --- हे दुसरेच कुणीतरी माझ्यात येते व माझा ताबा घेते --- ते मला माणसापासून राक्षस बनवते. त्याला रक्त हवे असते. तो पाणी पिऊ शकत नाही --- “

अचानक त्याने त्याचा चेहरा हातात लपवला.

एक दोन मिनिटाने पायरोने विचारले,

“मला अजून कळत नाही, की तू डॉक्टरला का दाखवले नाहीस?”

ह्यू त्याचे डोके हलवून बोलला,

“तुम्हाला खरेच कळत नाही का? मी शारीरिक दृष्ट्या मजबूत आहे. एखाद्या बैलाइतका धष्टपुष्ट आहे. मी कदाचित खूप जगेन --- खूप --- चार भिंतीत कोंडून! ते मला सहन होणार नाही. त्यापेक्षा मरणे बरे --- तुम्हाला माहिती आहे, अनेक मार्ग आहेत. अपघात,

बंदुक साफ करणे --- त्या प्रकारचे मार्ग. डायनाला समजेल --- मी माझे काय ते करेन.”

तो नक्की पायरोकडे बघत होता. पण पायरोने त्याच्या आव्हानाला प्रतिसाद दिला नाही. उलट त्याने मृदुपणे विचारले,

“तू काय खातोस व पितोस?”

ह्यूने त्याचे डोके मागे टाकले. मग तो जोरात हसू लागला.

“सगळेजण खातात व पितात, तेच.”

काही विशेष औषधे? गोळ्या?”

“नाही रे देवा. तुम्हाला खरेच असे वाटते का, की त्याने माझा त्रास कमी होईल? न्यूनगंडाने तो बोलला, “मनाचा रोग तुम्ही नियंत्रित करू शकता का?”

पायरो कोरडेपणे बोलला,

“मी प्रयत्न करतो आहे. या घरातील कुणाला डोळ्यांचा त्रास आहे का?”

ह्यूने त्याच्याकडे रोखून पाहिले. तो म्हणाला,

“माझ्या वडिलांचे डोळे त्याना खूप त्रास देतात. त्याना वारंवार नेत्ररोगतज्ञाकडे जावे लागते.”

पायरोने दोन मिनिटे ध्यान केले. मग तो म्हणाला,

“मला वाटते कर्नल फ्रोबिशरने त्यांचे बरेचसे आयुष्य भारतात काढले का?”

“हो. ते भारतीय सैन्यात होते. त्यांना भारताबद्दल खूप आस्था होती --- ते त्याबद्दल खूप बोलत असत --- देशी चालीरीती --- आणि असेच बरेच काही.”

पायरो परत ‘ओहो’ असे पुटपुटला.

मग त्याने शेरा मारला,

“मला तुझ्या हनुवटीला कापलेले दिसते आहे.”

ह्यूने त्याचा हात उचलला.

‘हो. फारच मोठी वाईट जखम. एकदा मी दाढी करत असताना, वडिलांनी मला दचकवले. तुम्हाला माहिती आहे, अलीकडे मी जरा उदास असतो. आणि माझ्या हनुवटीवर व मानेवर थोडे पुरळ उठले आहे. त्यामुळे दाढी करणे अवघड जाते.”

पायरो बोलला,

“तू मऊ मलम वापरले पाहिजेस.”

“ओहो, मी वापरतो, जॉर्जकाकांनी मला ते दिले आहे.”

त्याला एकदम हसू आले.

“आपण स्त्रियांच्या सौदर्यदुकानासारखे बोलत आहोत. मऊ मलम, डोळ्यांचा त्रास, काही नेहमीच्या गोळ्या. याचा काय उपयोग आहे? मिस्टर पायरो, तुम्ही काय बोलत आहात?

पायरो शांतपणे म्हणाला,

“मी डायनासाठी, शक्य तेवढे चांगले काही करायचा प्रयत्न करतो आहे.”

ह्यूची मनस्थिती बदलली. त्याचा चेहरा कोरडा बनला. त्याने पायरोच्या दंडावर हात ठेवला.

“हो. तुम्हाला शक्य असेल, तेवढे करा. तिला मला विसरायला सांगा. तिला सांगा, काही आशा ठेवणे चांगले नाही --- मी तुम्हाला सांगितलेल्या काही गोष्टी तिला सांगा --- कृपया तिला माझ्यापासून दूर रहायला सांगा. आता ती माझ्यासाठी तेवढेच करू शकते. लांब राहून मला विसरणे!”

## पाच

डायना, तुझ्याकडे धैर्य आहे का? मोठे धैर्य? तुला त्याची गरज आहे.”

डायना जोरात रडू लागली.

“म्हणजे हे खरे आहे. हे खरे आहे? तो वेडा झाला आहे का?”

हर्क्युल पायरो म्हणाला,

“मी काही मानसोपचारतज्ज्ञ नाही. पण मी असे म्हणू शकत नाही, ‘हा मनुष्य वेडा आहे.’” ती त्याच्याजवळ आली.

“ॲडमिरल चँडलरना वाटते, ह्यू वेडा आहे. जॉर्ज फ्रोबिशरलाही वाटते, तो वेडा आहे. ह्यूला स्वतःलाही वाटते, तो वेडा आहे --- “

पायरो तिचे निरीक्षण करत होता.

“आणि तुला काय वाटते?”

“मला? मला वाटते, तो वेडा नाही. म्हणून तर --- “

ती थांबली.

“म्हणून तू माझ्याकडे आलीस?

“दुसरे काहीच कारण नाही. दुसरे काय कारण असणार?”

“मी तेच मला स्वतःला विचारतो आहे.”

“मला तुमचे काही कळतच नाही.”

“स्टीव्ह ग्रॅहम कोण आहे?”

ती चमकली.

ती निरखून बघू लागली.

“स्टीव्ह ग्रॅहम? तो --- तो असाच कुणीतरी आहे.”

तिने त्याच्या दंडाला धरले.

“तुमच्च्या मनात काय आहे? तुम्ही काय विचार करत आहात? तुम्ही तिथे उभे रहा --- तुमच्या मोठ्या मिशांमागे, तुमचे डोळे सूर्यप्रकाशात मिचकावत उभे रहा. आणि मला काहीही सांगू नका. तुम्ही मला घाबरवत आहात --- फार घाबरवत आहात. तुम्ही असे का करत आहात?”

पायरो म्हणाला, ” कारण कदाचित मीच घाबरून गेलो आहे.”

करडे डोळे विस्फारले गेले. पायरोवर रोखले गेले. ती कुजबुजत्या स्वरात बोलली,

“तुम्हाला कसली भीती वाटते आहे?”

हर्क्युल पायरोने एक जड सुस्कारा टाकला. तो बोलला,

“खुनी पकडणे, हे खून होणे रोखण्यापेक्षा सोपे आहे.”

ती ओरडली, “खून? तो शब्द वापरू नका.”

पायरो म्हणाला, “तथापि मी तो मुद्दाम वापरतो आहे.”

त्याने अधिकारवाणीने पटपट त्याचा आवाज बदलला

“हे बघ मिस डायना, तू आणि मी आपण दोघांनी लायडे सदनमध्ये रात्र काढायला हवी. मी तुझ्यावर त्याची जबाबदारी सोपवतो. तू ते करू शकशील?”

“मी --- हो --- मला वाटते, मी करू शकेन. पण का --- ?”

“कारण आपल्याकडे आता घालवायला वेळ नाही. तू मला सांगितलेस, की तू धैर्यवान मुलगी आहेस. आता ते धैर्य वापरायची वेळ आली आहे. मी सांगतो, ते कर. त्याविषयी प्रश्न विचारू नकोस.”

तिने एकही शब्द न बोलता मान हलवली व ती निघून गेली.

एकदोन मिनिटांनी पायरो तिच्यामागे घरात गेला. त्याने वाचनालयात तिचा व तीन माणसांचा आवाज ऐकला. तो मोठा जिना चढून गेला. वरच्या मजल्यावर कुणी नव्हते.

त्याला ह्यूची खोली सहज सापडली. खोलीच्या कोपऱ्यात गरम व गार पाण्याचे बेसिन होते. त्यावर पेल्यांची मांडण होती. त्यात वेगवेगळ्या नळ्या, भांडी व बाटल्या होत्या.

पायरो झटपट व हुशारीने कामाला लागला.

त्याला जे करायचे होते, त्याला फार वेळ लागला नाही. तो परत खाली हॉलमध्ये आला. तेव्हा डायना वाचनालयातून बाहेर आली. ती लाजरी पण बंडखोर दिसत होती.

“सर्व ठीक झाले.”

ॲडमिरल चँडलरने पायरोला वाचनालयात नेले व दार लावले. तो म्हणाला, “इकडे पहा मिस्टर पायरो, मला हे आवडले नाही.”

“ॲडमिरल चँडलर, तुम्हाला काय आवडले नाही?”

तुम्ही आणि डायनाने रात्र इथे काढावी, हे मला आवडले नाही. पण मला तुमचा अनादर करायचा नाही --- “

“हा पाहुणचाराचा प्रश्न नाही आहे.”

“मी म्हणालो तसे, मला तुमचा अनादर करायचा नाही --- पण स्पष्ट सांगायचे तर मला हे आवडले नाही. मिस्टर पायरो, मला हे नको आहे. त्याचे कारणही मला कळत नाही. त्यामुळे काय चांगले होणार आहे?”

“आपण असे म्हणू शकतो का, की मी एक प्रयोग करून बघतो आहे.”

“कुठल्या प्रकारचा प्रयोग?”

त्याबद्दल तुम्ही मला माफ कराल. ते माझे काम आहे --- “

“आता इकडे बघा, मिस्टर पायरो, पहिले म्हणजे मी काही तुम्हाला इथे यायला सांगितलेले नाही --- “

पायरो मध्येच बोलला,

“ॲडमिरल चँडलर, माझ्यावर विश्वास ठेवा. मला तुमचे म्हणणे पटते आहे व मी ते बरोबर असल्याचेही कबूल करतो. एका प्रेमात पडलेल्या मुलीच्या हट्टासाठी केवळ मी इथे आहे. तुम्ही मला काही गोष्टी सांगितल्यात. कर्नल फ्रोबिशर यांनी मला काही गोष्टी सांगितल्या. ह्यूने स्वतः मला काही गोष्टी सांगितल्या. आता मला स्वतःला बघायचे आहे.”

“पण काय बघायचे आहे? मी सांगतो, यात बघण्यासारखे काही नाही. मी रोज रात्री ह्यूला खोलीत कोंडतो, एवढेच.”

“आणि तरीही --- काही वेळा --- तो सांगतो, की सकाळी दार कुलूपबंद नसते, असे कसे काय?”

“हे काय आहे?”

“तुम्ही कधी दार उघडे असलेले पाहिले नाही का?

चँडलरने भुवया वर ताणून नापसंती दर्शवली.

“मी नेहमी समजत आलो, की जॉर्जने ते उघडले --- तुमचे काय म्हणणे आहे?

“तुम्ही किल्ली कुठे ठेवता? कुलुपात?”

“नाही मी ती बाहेरील कट्ट्यावर ठेवतो. मी, जॉर्ज किंवा विदर्स नावाचा नोकर तिथून सकाळी ती घेतो. आम्ही विदर्सला सांगितले आहे, की ह्यूला झोपेत चालायची सवय असल्याने, आम्ही असे

करतो --- मला खात्री आहे, की त्याला त्याहून जास्त माहिती आहे. पण तो विश्वासू आहे. आमच्याकडे गेली अनेक वर्षे आहे.”

“त्या कुलुपाची दुसरी किल्ली आहे का?”

“अशी असल्याचे मला तरी माहिती नाही.”

‘एखादी बनवून घेता येते.”

‘पण कोण --- “

“तुमच्या मुलाला वाटते, की त्याच्याकडे ती कुठेतरी लपवलेली आहे, पण तो जेव्हा झोपेत चालतो, तेव्हा त्याला ते आठवत नसते.”

खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून बोलणारा कर्नल फ्रोबिशर बोलला,

“चार्ल्स, मला हे आवडले नाही --- ती मुलगी --- “

ॲडमिरल चँडलर लगेच म्हणाला, “मी तोच विचार करत होतो. ती मुलगी तुमच्याबरोबर परत इथे येता कामा नये. तुम्हाला वाटले, तर तुम्ही येऊ शकता.”

पायरो बोलला, “तुम्हाला मिस डायना आज रात्री इथे का नको आहे?”

फ्रोबिशर हलक्या आवाजात बोलला,

“अशा बाबतीत ते धोकादायक असते --- “

तो थांबला.

पायरो म्हणाला, “ह्यू तिच्याशी एकनिष्ठ आहे --- “

चँडलर ओरडला, “म्हणूनच तर! ते जाऊ दे. वेड्या माणसाच्या बाबतीत सर्व काही उलटेपालटे असते. ते ह्यूला स्वतःलाही माहिती आहे. डायनाने इथे यायला नको.”

पायरो म्हणाला, “त्या बाबतीत डायनाने स्वतः ठरवायला हवे.”

तो वाचनालयाबाहेर गेला. डायना बाहेर गाडीत थांबली होती. आपल्याला रात्रीसाठी, जे हवे आहे, ते आपण मिळवूच. आपण जेवायला वेळेवर परत येऊ.”

त्यांनी लांबवर रपेट मारली. अॅडमिरल व कर्नलबरोबर झालेले बोलणे पायरोने मिस डायनाला परत सांगितले. ती त्यांच्या मूर्खपणाला हसली.

“त्याना काय वाटते, की ह्यू मला दुखावेल?”

तिच्या उत्तरामुळे, पायरोने तिला विचारले ते गावातील औषधांच्या दुकानात थांबले, तर तिची काही हरकत नाही ना. तो म्हणाला की तो त्याचा टूथब्रश विसरला आहे.

ते दुकान गावातील शांत रस्त्यावर होते. डायना गाडीबाहेर थांबली.

पायरो ब्रशच्या बाबतीत बराच चोखंदळ असल्याने, डायना बराच वेळ त्याची वाट बघत थांबली ---

## सहा

एलिझाबेथच्या काळातील ओकचे जड फर्निचर असलेल्या मोठ्या झोपायच्या खोलीत, हर्क्युल पायरो वाट बघत बसला होता. वाट बघण्याशिवाय काही करण्यासारखे नव्हते. त्याने त्याला पाहिजे तशी सर्व व्यवस्था केली होती.

सकाळी लवकर नोकर आला. बाहेर पदरव येताच पायरोने कडी काढून दार उघडले. बाहेरील पॅसेजमध्ये आहेत त्यापेक्षा वयाने मोठी वाटणारी, दोन मध्यमवयीन माणसे होती --- ॲडमिरलचा चेहरा कडक पण हसरा होता तर कर्नल फ्रोबिशरचा थरथरणरा व वेडावाकडा होता.

चँडलर फक्त बोलला, मिस्टर पायरो, तुम्ही आमच्याबरोबर याल का?"

डायनाच्या खोलीबाहेर गठडी वळलेली एक आकृती होती. त्या पिवळसर तपकिरी चुरगळलेल्या डोक्यावर प्रकाश पडला

तेव्हा दिसले, की तो आवाज करत कसाबसा श्वास घेणारा, ह्यू होता. त्याच्या अंगावर गाऊन व पायात स्लीपर्स होत्या. त्याच्या उजव्या हातात खूप धारदार असा चकाकणारा वाकडा सुरा होता. त्याचा सर्व भाग चकाकत नव्हता ---

त्यावर इथेतिथे लाल चकाकीत भाग होते.

हर्क्युल पायरो बारीक आवाजात किंचाळला.

“अरे बापरे!”

फ्रोबिशर कडक शब्दात बोलला,

“ती ठीक आहे. त्याने तिला काही केले नाही. त्याने आवाज वाढवून हाक मारली,

“डायना, आम्ही आहोत. आम्हाला आत यायचे आहे.”

पायरोने ॲडमिरलला श्वास रोधून विव्हळतांना व काही पुटपुटताना ऐकले,

“माझा मुलगा. माझा बिचारा मुलगा.”

कडी काढल्याचा आवाज आला. दार उघडून डायना तिथे उभी होती. तिचा चेहरा पांढरा फटक पडला होता.

ती गळून गेल्यासारखी दिसत होती.

‘काय झाले? कोणीतरी होते --- आत यायला बघत होते --- मला ऐकू आले --- ते दाराचे हँडल फिरवत होते. खिडक्यांची तावदाने ओरबाडत होते --- ओहो! ते भीतीदायक होते --- एखाद्या पशूसारखे --- “

फ्रोबिशर कडक शब्दात बोलला,

“तुझे दार कुलूपबंद होते, म्हणून देवाचे आभार!

“मिस्टर पायरोंनी मला ते कुलूपबंद करायला सांगितले.”

पायरो म्हणाला,

“त्याला उचलून आत आणा.”

त्या बेशुद्ध माणसाला दोघांनी उचलून आत आणले. डायनाच्या अंगावरून त्याला नेताना डायनाने धापा टाकत, श्वास रोधून धरला.

ह्यू? हा ह्यू आहे का? ते काय आहे --- त्याच्या हातावर?”

ह्यू चे हात चिकट व ओले होते. त्यावर तपकिरीसर लाल डाग होते.

डायना ओरडली, “ते रक्त आहे का?

पायरोने चौकसपणे त्या दोघांकडे पाहिले. ॲडमिरलने मान हलवली. तो म्हणाला,

“हे मानवी रक्त नाही, याबद्दल देवाचे आभार! एक मांजर. मला ते खालील मजल्यावर हॉलमध्ये दिसले. त्याचा गळा चिरलेला होता. नंतर तो इथे वर आला असणार --- “

डायनाचा आवाज भीतीने बसला होता, ती बोलली, “इथे? माझ्यासाठी?”

खुर्चीवरील माणूस हबकला --- त्यांनी त्याच्याकडे आश्चर्याने बघितले. ह्यू चँडलर उठून बसला. त्याने डोळे फडफडवले.

तो घोगऱ्या आवाजात म्हणाला, “हॅलो, काय झाले? मला का --- ?”

तो थांबला. तो त्याच्या हातात घट्ट धरलेल्या सुऱ्याकडे बघत होता.

तो खर्जातील आवाजात बोलला,

“मी काय केले आहे?”

त्याचे डोळे एकाकडून दुसऱ्याकडे वळले. शेवटी ते मागील भिंतीला जाऊन चिकटणाऱ्या डायनावर स्थिर झाले. तो शांतपणे म्हणाला,

“मी डायनावर हल्ला केला का?

त्याच्या वडिलांनी नकारार्थी मान हलवली. ह्यू म्हणाला,

“काय झाले, ते मला सांगा. मला समजले पाहिजे.”

त्यांनी त्याला सांगितले --- सांगायचे नसतांना --- थांबत थांबत --- त्याच्या शांत चिकाटीने त्यांना ते त्यांच्या तोंडाबाहेर पडायला लावले.

खिडकीबाहेर सूर्य वर येत होता. हर्क्युल पायरोने पडदा बाजूला केला. सकाळचा प्रकाश खोलीत आला.

ह्यूचा चेहरा भावनांवर काबू ठेवत होता. आवाज स्थिर होता.

तो म्हणाला,

“अस्स.”

मग तो उठला. तो हसला व शरीर ताणले. अगदी नैसर्गिक आवाजात तो बोलला,

“सुंदर सकाळ आहे, नाही का? मला वाटते मी जंगलात जाऊन एखादा ससा मिळतो का, ते पहातो.

तो खोलीतून बाहेर पडला व बाकी सगळे त्याच्याकडे बघत राहिले.

मग ॲडमिरल पुढे झाला. फ्रोबिशरने त्यांचा दंड धरला.

“चार्ल्स, नको. हा दुसऱ्या कुणासाठी नाही तरी त्याच्यासाठी उत्तम उपाय आहे --- बिचारा राक्षस!”

डायनाने हुंदके देत स्वतःला अंथरुणावर लोटून दिले.

ॲडमिरल वरखाली आवाजात म्हणाले,

“तुझे बरोबर आहे, जॉर्ज --- तू बरोबर आहेस. मला माहिती आहे. मुलाकडे धाडस आहे --- “

फ्रोबिशर तुटक्या आवाजात म्हणाला,

“तो मनुष्य आहे --- “

क्षणभराच्या शांततेनंतर चार्ल्स चँडलर बोलला,

“ते जाऊ दे. तो शापित परदेशी कुठे आहे?”

## सात

बंदुकीच्या खोलीत ह्यू ने मांडणीवरून त्याची बंदुक उचलली व त्यात गोळ्या भरू लागला, तेव्हा त्याच्या खांद्यावर पायरोचा हात पडला.

पायरोने विचित्र अधिकारवाणीने एक शब्द उच्चारला,

“नाही.”

ह्यूने त्याच्याकडे चमकून पाहिले. जाड, चिडक्या आवाजात तो बोलला,

“माझ्या खांद्यावरून तुमचा हात काढा. तुम्ही मध्ये पडू नका. मी तुम्हाला सांगून ठेवतो, इथे अपघात होणार आहे. एवढेच होऊ शकते.”

परत पायरोने तो एक शब्द उच्चारला,

“नाही.”

“तुम्हाला कळते आहे का? जर डायनाचा दरवाजा उघडा असता, तर मी तिचा गळा चिरला असता --- डायनाचा --- त्या सुऱ्याने?”

“मला असे काही वाटत नाही. तू मिस डायनाला ठार मारले नसतेस.”

“पण मी त्या मांजराला मारले, नाही का?”

“नाही. तू मांजराला मारले नाहीस. तू पोपटाला मारले नाहीस. तू मेंढीला मारले नाहीस.”

“तुम्ही वेडे आहात की मी वेडा आहे?”

हर्क्युल पायरो उत्तरला,

“आपल्यापैकी कुणीच वेडे नाही.”

त्याच वेळी ॲडमिरल चँडलर व कर्नल फ्रोबिशर आत आले. त्यांच्या मागे डायना होती.

ह्यू पडलेल्या आवाजात भावनाक्षोभाने बोलला,

“हा मनुष्य म्हणतो आहे, मी वेडा नाही --- “

हर्क्युल पायरो म्हणाला,

“मला तुम्हाला हे सांगायला आनंद वाटतो, की तू पूर्णपणे शहाणा आहेस.”

ह्यू हसला. एखाद्या वेड्याने हसावे, तसा तो हसला.

“हे फारच विनोदी आहे. मग मी मेंढी आणि इतर प्राण्यांचे गळे कसे कापले? मी शहाणा आहे? मी पोपटाला मारले, तेव्हा शहाणा होतो? आणि आजचे मांजर?”

“मी तुला सांगतो, तू मेंढीला मारले नाहीस किंवा पोपटाला --- किंवा मांजरालादेखील मारले नाहीस.

“मग कोणी मारले?”

‘ज्याला तुला वेडा ठरवायचे आहे त्याने. प्रत्येक प्रसंगी तुला गुंगीचे इंजेक्शन दिले गेले आणि तुझ्या हातात रक्ताने भरलेला सुरा किंवा रेझर दिला गेला. त्या दुसऱ्या कुण्या दुष्ट माणसाचे रक्ताळलेले हात तुझ्या बेसिनमध्ये धुतले गेले.”

“पण का?”

“कारण तू आता जे करायला निघाला होतास, ते तू करावेस म्हणून. पण आता मी तुला थांबवले.”

ह्यूने निरखून पाहिले. पायरो कर्नल फ्रोबिशरकडे वळला.

”कर्नल फ्रोबिशर, तुम्ही अनेक वर्षे भारतात राहिलात. माणसांना मुद्दाम मादक द्रव्यसेवन करायला लावून, वेडे बनवल्याच्या घटना तुम्ही कधी पाहिल्या नाहीत का?”

कर्नल फ्रोबिशरचा चेहरा उजळला. ते म्हणाले,

“मी स्वतः कधी पाहिले नाही, पण त्याबद्दल पुष्कळ वेळा ऐकले. धोत्र्याच्या फुलाने विषबाधा होणे, व त्याचा शेवट माणसाला वेडे ठरवण्यात होणे.”

“बरोबर. अल्कलॉइड ॲट्रोपाईनमधील तत्व खरे तर, धोत्र्याच्या फुलाच्या अगदी जवळचे आहे. ते बेलाडोना किंवा भयंकर नाईटशेडमधूनही मिळू शकते. बेलाडोना तयार करायची कृती अगदी सामान्य आहे आणि ते डोळयांच्या उपचारामध्ये वापरले जाते. याची नक्कल करून व वेगवेगळया ठिकाणी ते तयार करून, विषाचा मोठा साठा काही संशय न येता मिळवता येतो. त्यापासून ॲट्रोपाईन सल्फेट व अल्कलॉइड मिळवता येते. मग ते दाढीच्या गार साबणात मिसळता येते. जर बाहेरून ते नुसते वापरले, तर पुरळ येऊ शकते. तोंड व घसा कोरडा पडणे, गिळायला त्रास

होणे, दोन दोन दिसणे, भास होणे, ही सर्व लक्षणे होऊ शकतात आणि ती ह्यूने अनुभवली आहेत.”

तो ह्यूकडे वळला.

“आणि माझ्या मनातील शेवटचा संशय घालवण्यासाठी, मी तुम्हाला एक कपोलकल्पित नव्हे तर खरी गोष्ट सांगतो. तुझा दाढीचा साबण त्यात खूप ॲट्रोपाईन सल्फेट असलेला होता. मी त्याचा नमुना घेऊन त्याची परीक्षा केली.”

पांढरा पडलेला, थरथरणारा ह्यू विचारता झाला,

“हे कुणी व का केले?”

पायरो म्हणाला,

“मी इथे आल्यापासून तेच तर शोधतो आहे. मी खून करण्याचा उद्देश शोधतो आहे. तू मेलास, तर डायनाला पैसे मिळाले असते. पण मी तिला इतक्या गंभीरपणे घेतले नाही --- “

ह्यू चँडलर चमकला.

“मी तसे नसेल, अशी आशा करतो.”

मी दुसऱ्या उद्देशाची चाचपणी केली. एक त्रिकोण --- दोन पुरुष व एक बाई. कर्नल फ्रोबिशर तुझ्या आईच्या प्रेमात होता. ॲडमिरल चँडलरने तिच्याशी लग्न केले.”

ॲडमिरल चँडलर ओरडला,

‘जॉर्ज? जॉर्ज! माझा विश्वास बसत नाही.”

ह्यू विश्वास बसणार नाही, अशा आवाजात बोलला,

“तुम्हाला असे म्हणायचे आहे, की तो द्वेष मुलापर्यंत जाऊ शकतो?”

हर्क्युल पायरो म्हणाला,

“काही परिस्थितीत, हो.”

फ्रोबिशर ओरडला,

“हे निखालस खोटे आहे. चार्ल्स, त्याच्यावर विश्वास ठेऊ नकोस.”

चँडलर त्याच्यापासून दूर गेला. तो स्वतःशी पुटपुटला,

“धोत्र्याचे फूल --- भारत --- हो, मला आता समजले --- आणि मी कधीच विषाबद्दल संशय घेतला नाही --- आमच्या घराण्यात असलेल्या वेडाबद्दलही नाही --- “

“पण हो! हर्क्युल पायरोचा आवाज शिगेला पोचला, “कुटुंबातील वेड --- वेडा मनुष्य --- सूड घ्यायला टपलेला --- लबाड --- वेड्याप्रमाणे त्याचा वेडेपणा अनेक वर्षे दडवून ठेवणारा.” तो फ्रोबिशरच्या भोवती फिरला.

“अरे बापरे! तुला माहिती असणार, तुला नक्की संशय असणार, की ह्यू तुझा मुलगा आहे. तू त्याला कधी तसे सांगितले का नाहीस?”

फ्रोबिशर अवाक् झाला. गोठून गेला.

“मला माहिती नव्हते. मला खात्री नव्हती --- असे बघा, एकदा कॅरोलीन माझ्याकडे आली --- ती कशाने तरी घाबरलेली होती --- फार त्रासात होती. कशामुळे मला माहिती नव्हते. मला कधीच माहिती झाले नाही. ते सर्व कशाबद्दल होते? ती --- मी --- आम्ही आमची डोकी खाजवली, पण उत्तर मिळेना. नंतर मी भारतात निघून गेलो. मी तेवढेच करू शकत होतो. आम्हाला दोघांना माहिती होते, आता आम्हाला नाटक खेळावे लागणार. मी --- खरे तर, मला आश्चर्य वाटले. पण मला खात्री नव्हती. ह्यू माझा मुलगा असल्याचे मला कॅरोलीनने कधीच सांगितले नाही. आणि आता जेव्हा वेडाचे नाटक सुरु झाले, तेव्हा या गोष्टी निश्चित झाल्या, असे मला वाटले.”

पायरो बोलला,

“आता सर्व गोष्टी बरोबर झाल्या. तो मुलगा त्याचा चेहरा वर करणे व भुवया खाली करणे --- ही लकब तुमच्याकडून शिकला आहे. पण चार्ल्स चँडलरने हे अनेक वर्षांपूर्वी पाहिले. आणि

त्याच्या बायकोकडून त्याला सत्य कळले. मला वाटते, ती त्याला घाबरत असावी --- तो तिला वेडेपणाची झलक दाखवू लागला --- त्यामुळे ती तुझ्याकडे ओढली गेली. ती तुझ्यावर नेहमीच प्रेम करत होती. चार्ल्स चँडलरने त्याचा सूडाचा बेत आखला. त्याची बायको बोटीच्या अपघातात मेली. ती व तो दोघेच बोटीत होते आणि अपघात कसा झाला, हे त्याला माहिती होते. मग तो त्या मुलाचाही द्वेष करू लागला, जो त्याचे नाव लावत होता, पण त्याचा मुलगा नव्हता. तुमच्या भारतीय गोष्टी ऐकून, धोत्र्याच्या फुलातील विषाची कल्पना त्याच्या डोक्यात आली. ह्यू ला हळूहळू वेडा करायचे त्याने ठरवले. त्याला अशा अवस्थेला आणायचे की तो स्वतः त्याचे स्वतःचे आयुष्य दुःखी बनवेल. रक्ताची लालसा ॲडमिरल चँडलरची होती, ह्यूची नव्हे. एकाकी शेतात मेंढीची कत्तल चार्ल्स चँडलरने केली. पण त्याची शिक्षा ह्यू ला भोगावी लागली.

“मला कधी संशय आला, तुम्हाला माहिती आहे का? जेव्हा चार्ल्स चँडलरने मुलाला डॉक्टरकडे नेण्यात एवढी हयगय केली. ह्यूने स्वतःसाठी डॉक्टरला विरोध करणे ठीक होते, नैसर्गिक होते. पण वडील? त्याना असे वाटायला हवे होते, की त्यांच्या मुलाला वाचवायचा काही उपाय डॉक्टरकडे असेल --- त्या मुलाला डॉक्टरकडे न्यायची शंभर तरी कारणे त्याना शोधता आली असती.

पण नाही. डॉक्टरला ह्यू ला भेटायची परवानगी नव्हती --- जर डॉक्टरने तो अगदी ठीकठाक असल्याचे सांगितले असते तर!”

ह्यू शांतपणे बोलला,

“मी निरोगी आणि शारीरिक व मानसिक दृष्ट्या चांगला आहे?”

त्याने डायनाच्या दिशेने एक पाउल टाकले. फ्रोबिशर घोगऱ्या आवाजात बोलला,

“तू चांगला शहाणा आहेस. आपल्या कुटुंबात वेडाचा इतिहास नाही.”

डायना म्हणाली,

“ह्यू --- “

ॲडमिरल चँडलरने ह्यू ची बंदुक उचलली. तो म्हणाला,

“हा सर्व मूर्खपणा आहे. मला वाटते, मी जाऊन ससा मिळतो आहे का, हे बघावे --- “

फ्रोबिशर पुढे आला. पण पायरोच्या हाताने त्याला अडवले. पायरो म्हणाला,

“तू स्वतःच आता म्हणालास --- की हे सर्वात चांगले ठरेल --- “

ह्यू आणि डायना खोलीतून निघून गेले.

त्या दोन माणसांनी, एक इंग्लिश व दुसरा बेल्जियन यांनी चार्ल्स चँडलरला जंगलाकडे जातांना शेवटचे पाहिले.

आणि त्यांनी लगेच बंदुकीचा एक मोठा आवाज ऐकला ---

# The Horses of Diomedes

# डिओमेडसचे घोडे




फोन वाजला.

“हॅलो पायरो, तुम्ही आहात का?

तरुण डॉक्टर स्टोडार्टचा आवाज पायरोने ओळखला. त्याला मायकेल स्टोडार्ट आवडत असे. त्याच्या मोठ्याने हसण्यातील लाजाळू मित्रत्वाचा भाव आवडत असे. गुन्ह्यातील त्याचा कमी

अनुभव व तरीही असणारी रुची लक्षात घेऊन त्याचे मनोरंजन होत असे. त्याच्या निवडलेल्या व्यवसायातील कष्टाळू व शिष्ट माणूस म्हणून तो त्याला मान देत असे.

आवाज चढला व आढेवेढे घेऊ लागला, “मला तुम्हाला त्रास द्यायला आवडत नाही.

पायरोने थोडे त्रासून विचारले, “तुला कसला त्रास होतो आहे का?”

मायकेल स्टोडार्टने सुटका झाल्याच्या आवाजात म्हटले, “हो ना.”

“अरे मित्रा, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?”

आता स्टोडार्टचा आवाज वेगळा आला. तो थोडा चाचरत उत्तरला, “मला वाटते, जे मी तुम्हाला आ --- ता रात्रीच्या वेळी चक्कर मारायला येण्याबद्दल विचारले, तर ते चुकीचे ठरेल --- प -- ण --- मी ज --- रा कोड्यात पडलो आहे.”

“मी नक्की येईन. तुझ्या घरी का?”

“नाही. खरे तर मी मागील तबेलेवजा घरांकडे जातो आहे. कनिंगहॅम वसाहत, नंबर १७. तुम्ही खरेच येऊ शकाल? तसे झाल्यास मी फार उपकृत होईन.”

पायरो म्हणाला, ‘मी लगेच येतो.”

## दोन

पायरो त्या वसाहतीमधून नंबर बघत चालला होता. रात्रीचा एक वाजून गेला होता आणि वसाहतीचा बराचसा भाग झोपला होता. एखाद्या दुसऱ्या खिडकीत उजेड दिसत होता. ते १७ नंबरशी पोचल्यावर, दार उघडले व डॉ स्टोडार्ट बघत उभा राहिला.

"अरे भल्या माणसा, ये. येशील का?"

एक लहानसा जिना वरील मजल्याकडे जात होता. इथे उजवीकडे एक बऱ्यापैकी मोठी खोली होती. त्यात दिवाण, रग, त्रिकोणी चंदेरी उशा आणि खूपसे पेले व बाटल्या होत्या.

सर्वत्र जरासा गोंधळच होता. जिकडेतिकडे सिगरेटची थोटके व फुटके पेले पडले होते.

पायरो म्हणाला, 'ओहो! माझ्या मित्रा, वॉटसन, मला वाटते इथे मेजवानी झाली असावी."

डॉ स्टोडार्ट मोठ्याने हसत बोलला, "मेजवानी झाली होती, हे ठीक आहे. कसली तरी मेजवानी!"

"म्हणजे तू त्यात नव्हतास का?"

"नाही. मी इथे केवळ माझ्या व्यावसायिकतेतून आलो आहे."

"काय झाले?"

स्टोडार्ट म्हणाला, “ही जागा पेशन्स ग्रेस --- मिसेस पेशन्स ग्रेस या बाईची आहे.”

पायरो म्हणाला, “हे जुने व सुंदर नाव आहे, असे वाटते.”

“इथे मिसेस ग्रेसच्या बाबतीत काही जुने व सुंदर नाही. ती कडकपणे दिसायला चांगली होती. तिला अनेक नवरे होते आणि सध्या एक मुलगेलासा मित्र आहे. तो तिला लुबाडत असल्याचा तिला संशय आहे. त्यांनी ही पेयपानाची मेजवानी सुरु केली व मनाई असलेल्या मादक द्रव्याने, स्पष्ट सांगायचे तर, कोकेनने संपवली. कोकेनने तुम्हाला छान वाटू लागते आणि बागेतील सर्व झकास वाटू लागते. ते तुम्हाला चढवते आणि तुम्हाला वाटू लागते, की तुम्ही नेहमीपेक्षा काहीही दुप्पट करू शकाल. तुम्ही ते जास्त घेतलेत, तर तुम्ही आक्रमक होता आणि मानसिक दृष्ट्या उत्तेजित होता. अविचारी बनता व मनाचा तोल ढळू लागतो. मिसेस ग्रेसचे तिच्या मुलगेलाश्या मित्राबरोबर जोरदार भांडण झाले. तो हॉकर नावाचा एक वाईट मनुष्य आहे. तो तिथल्या तिथे तिच्यावर धाऊन गेला आणि तिने खिडकीतून बाहेर ओणवी होऊन, तिला कुणीतरी मूर्खासारखे दिलेल्या एका कोऱ्या करकरीत पिस्तुलाने, त्याच्यावर नेम साधला.”

पायरोच्या भुवया चढल्या.

"त्याला गोळी लागली का?"

"तिची नाही! मी म्हणेन गोळी अनेक यार्ड पुढे गेली. रस्त्याने एक भणंग माणूस कचऱ्याच्या पेट्या धुंडाळत चालला होता, त्याला ती गोळी लागली. त्याच्या हाताच्या मांसल भागातून ती आरपार गेली. तो अर्थात कळवळून ओरडला आणि लगेच गर्दी गोळा झाली. रक्ताचा सडा पडला आणि मला खबर देण्यात आली."

"अस्स?"

मी त्याला मलमपट्टी केली. ती जखम काही गंभीर नव्हती. एकदोघेजण त्याच्याकडे बघू लागले. शेवटी त्याच्या हातात बऱ्याच पाच पौंडाच्या नोटा कोंबून त्याचे तोंड गप्प करण्यात आले. त्या गरीब बिचाऱ्याचे त्याने समाधान झाले. नशीबाचा चांगला फटका!"

"आणि तू?"

"मला थोडे अजून काम करावे लागले. आतापर्यंत मिसेस ग्रेस भावनिक क्षुब्ध अवस्थेत होती. मी तिला एक इंजेक्शन दिले आणि अंथरुणावर झोपवले. तिथे अजून एक बरीच तरुण मुलगी, पण थोडी कमी झिंगलेली होती. मी तिच्यावरदेखील उपचार केले. तोपर्यंत प्रत्येकाने त्वरेने सूं बाल्या केला होता."

तो थांबला.

पायरो म्हणाला, “आणि मग तुला परिस्थितीबद्दल विचार करायला वेळ मिळाला.”

स्टोडार्ट बोलला, “बरोबर. जर ती सामान्य पेयपानाची मेजवानी असती, तर ते प्रकरण तिथे संपले असते. पण ही बेकायदेशीरपणे मादक द्रव्यसेवन केल्यामुळे वेगळी ठरत होती.”

“तू जे म्हणतो आहेस, त्याबद्दल तुझी खात्री आहे?”

“ओहो, अगदी पुरेपूर. त्यात काही चूक नाही. दारुच्या खोक्यात मला थोडी सापडली. त्यांनी ती संपवून टाकली. ती कुठून आली? तुम्ही काल बोलत होतात, ते मला आठवले, की अंमली पदार्थ घेण्याची लाट आली आहे व खूप लोक त्याच्या आहारी गेले आहेत.”

पायरोने मान हलवली व बोलला, “या रात्रीच्या मेजवानीत पोलीसांना नक्कीच स्वारस्य असेल.”

मायकेल स्टोडार्ट नाराजीने बोलला, “तेच तर --- “

पायरोने त्याच्याकडे अचानक रुची वाटून बघितले. तो म्हणाला, “पण तू --- पण तुला तर पोलिसांना मध्ये आणायचे नव्हते ना?”

स्टोडार्ट अगदी हळू आवाजात बोलला, “निरागस लोक गोष्टी एकत्र करतात --- त्यांच्यावर संकटे येतात.”

“मिसेस ग्रेससाठी तुला इतके काही वाटते आहे का?”

“अरे देवा, नाही. ती फार कडक आणि कणखर आहे.”

पायरो हळूवारपणे बोलला, “मग ती दुसरी मुलगी असेल का?”

डॉ स्टोडार्ट म्हणाला,

“अर्थात, ती देखील एक प्रकारे कणखर आहे. म्हणजे ती स्वतःला तसे म्हणवते. पण ती फारच लहान आहे --- जरा रानटी आहे, एवढेच. पण तो लहान मुलीचा मूर्खपणा आहे. ती अशा जाळ्यात फसली आहे, कारण तिला हे सर्व आधुनिक व काहीसे चटपटीत वाटते.”

पायरोच्या ओठांवर मंद स्मित तरळले. तो हळूवारपणे म्हणाला, “या मुलीला तू यापूर्वी भेटला होतास?”

मायकेल स्टोडार्टने नकारार्थी मान हलवली. तो फार तरुण आणि लाज वाटलेला दिसत होता.

“हंट बॉलच्या वेळी मर्टोनशायरमध्ये तिला ओलांडून धाव. तिचे वडील निवृत्त जनरल आहेत --- फार कडक व संतापी आहेत. त्याना जरा मवाळ कर. ते म्हणजे पक्का साहेब आहेत --- तशा

प्रकारचे! त्याना चार मुली आहेत आणि चारही थोड्या रानटी आहेत --- मी म्हणेन, असे वडील असल्यावर त्याही तशाच होणार. त्या इथे रहातात, हे देशासाठी वाईट आहे. सैन्याचा तळ जवळच आहे व खूपसा पैसाही! --- कुठल्याही जुन्या देशाला असे वाटणार नाही --- श्रीमंत लोक आणि त्यातील बरेचसे दुष्ट! त्या मुली वाईट लोकांच्या संगतीत रहात आहेत."

पायरोने विचारपूर्वक त्याच्याकडे काही मिनिटे पाहिले. मग तो म्हणाला, "आता मला समजले, की तुला मी तुझ्याबरोबर यायला का हवे होते. तुला मी हे प्रकरण हातात घ्यायला हवे आहे का?"

"तुम्ही ते घ्याल का? मला वाटते आहे, की त्याबद्दल काहीतरी केले पाहिजे --- पण मी कबूल करतो, की मला शक्य असल्यास, मी शैला ग्रँटला याबाहेर ठेऊ इच्छितो."

"मला वाटते, ते करता येईल. मला तिला भेटायला आवडेल."

"मग या तर!"

त्याने खोलीबाहेर त्यांना मार्ग दाखवला. समोरच्या दारातून दुःखभरला आवाज आला.

"डॉक्टर, अरे देवा, मी वेडी होत चालले आहे."

स्टोडार्ट खोलीत गेला. त्याच्यापाठोपाठ पायरोही गेला. ती अतिशय विस्कटलेली झोपायची खोली होती --- फरशीवर पावडर सांडली होती. जिकडेतिकडे भांडी, तांबे पडले होते. कपडे झळकत होते. अंथरुणावर एक कृत्रिमपणे सोनेरी केस केलेली, भकास व दुष्ट चेहऱ्याची बाई पहुडली होती. ती म्हणाली, “माझ्या अंगावर सर्व बाजूंनी किडे चढत आहेत --- मला --- मी शपथेवर सांगते, मला --- मला वेड लागेल --- अरे देवा मला कसले तरी इंजेक्शन द्या.”

डॉ स्टोडार्ट अंथरुणाच्या बाजूला उभा राहिला. त्याचा आवाज दिलासा देणारा व व्यावसायिक होता.

पायरो शांतपणे खोलीबाहेर गेला. त्याच्यासमोर एक दार होते. त्याने ते उघडले.

ती एक लहानशी खोली होती. त्यात साधे फर्निचर होते. अंथरुणावर एक बारीक मुलीसारखी आकृती स्तब्ध पहुडली होती.

पायरो हळूच पलंगाच्या कडेला गेला व मुलीकडे पाहिले.

काळेभोर केस, लांब फिकट चेहरा --- आणि --- हो, तरुण --- खूप तरूण ---

त्या मुलीच्या पापण्यांवर प्रकाशकिरण पडले. तिने डोळे उघडले, चमकणारे, घाबरट डोळे. तिने रोखून बघितले, बसली व निळसर काळ्या केसांचा पिसारा तिने तिचे डोके झटकून बाजूला

केला. ती वयाने लहान घोडीसारखी दिसत होती. तिने स्वतःला थोडे आखडून घेतले --- जसे कुणी अनोळखी माणसाने खाणे दिले, तर एखादे रानटी जनावर जसे संशयाने स्वतःला आखडून घेईल, तसे!

बारीक व तरुण आवाजात, ती अनपेक्षितपणे म्हणाली,

“तू कोण आहेस?”

“बाईसाहेब, घाबरू नका.”

“डॉ स्टोडार्ट कुठे आहेत?”

त्याच मिनिटाला तो तरुण मनुष्य खोलीत आला. ती मुलगी सुटकेचा निश्वास टाकून बोलली,

“ओहो, तुम्ही इथं आहात तर! हे कोण आहेत?”

“शैला, हे माझे मित्र आहेत. आता तुला कसे वाटते आहे?”

ती मुलगी म्हणाली, “वाईट, भीतीदायक --- मी ते उग्र वासाचे व काहीतरीच चव असलेले औषध का घेतले?”

स्टोडार्ट कोरडेपणे म्हणाला, “मी तुझ्या जागी असतो, तर परत असे केले नसते.”

“मी --- मी पण करणार नाही.”

पायरो म्हणाला, “ते तुला कोणी दिले?”

तिने डोळे विस्फारले. तिचा वरचा ओठ वेडावाकडा हलला. ती बोलली, “ते इथे मेजवानीच्या वेळी झाले --- आम्ही सगळ्यांनी ते घेतले. पहिल्यांदा ते छान लागले.”

पायरो सभ्यपणे बोलला, “पण कोणी ते इथे आणले?”

तिने डोके हलवले. “मला माहिती नाही. तो कदाचित टोनी असेल --- टोनी हॉकर. पण खरे तर मला त्याबद्दल काही माहिती नाही.”

पायरो हळूच म्हणाला, “बाईसाहेब, तुम्ही आज पहिल्यांदा कोकेन घेतले आहे का?”

तिने मान हलवली.

स्टोडार्ट कडकपणे, थोडक्यात म्हणाला, “आणि ही शेवटची वेळच असू दे.”

“हो --- मलाही तसेच वाटते --- पण ते नवलपूर्ण होते.”

स्टोडार्ट म्हणाला, “शैला ग्रँट, असे बघ. मी “डॉक्टर आहे आणि मी काय बोलतो आहे, हे मला माहिती आहे. एकदा हे मादक द्रव्यसेवन सुरु झाले, की त्या जाळ्यात तू अविश्वसनीय रीत्या अडकत जाशील. मला माहिती आहे. मी असे लोक पाहिलेले आहेत. मादक द्रव्यसेवन शरीर आणि मन दोन्हीचा नाश करते. त्या मानाने एखादे पेय हे ठीक आहे. या मिनिटापासून ते वर्ज करून

टाक. माझ्यावर विश्वास ठेव. हा विनोद नाही. आजच्या रात्री जे घडले, त्याबद्दल तुझे वडील काय म्हणतील?"

शैला ग्रँटचा आवाज चढला, "वडील?" ती हसू लागली. "वडील? मला वडील कधी दिसतही नाहीत. त्याना हे माहिती व्हायला नको. त्यांचे नियम कडक असतात."

स्टोडार्ट म्हणाला, "आणि ते बरोबरच आहे."

दुसऱ्या खोलीतून मिसेस ग्रेसचा कळवळून ओरडल्याचा आवाज आला,

"डॉक्टर --- डॉक्टर --- "

तोंडातल्या तोंडात नापसंतीदर्शक काहीतरी पुटपुटत स्टोडार्ट खोलीबाहेर गेला.

शैला ग्रँट परत पायरोकडे रोखून बघू लागली. ती गोंधळली होती. ती म्हणाली, "तुम्ही खरे कोण आहात? तुम्ही मेजवानीच्या वेळी नव्हतात."

"नाही. मी मेजवानीला नव्हतो. मी डॉ स्टोडार्टचा मित्र आहे."

"तुम्ही पण डॉक्टर आहात का?

नेहमीसारखे कृत्रिमपणे नाटकाच्या पहिल्या अंकाचा पडदा उघडल्यासारख्या आविर्भावात, पायरो साधे बोलणे बोलला, “माझे नाव हर्क्युल पायरो आहे.”

त्या वाक्याचा परिणाम व्हायचा राहिला नाही. प्रसंगवशात त्याचे नावही माहिती नसल्याचे तरुण पिढीचे दुर्लक्ष पायरोला दुःखाने सहन करावे लागले.

पण शैला ग्रँटने ते ऐकले होते, हे विशेष होते. ती फारच आश्चर्यचकित झाली आणि बघत राहिली ---

## तीन

विधानाच्या खरेखोटेपणाशिवाय असे म्हटले जाते, की प्रत्येकाला टॉर्कमध्ये एक आत्या असते. असेही म्हटले जाते, की प्रत्येकाला लंडनपासून काही अंतरावर असलेल्या मर्टोनशायरमध्ये एक तरी लांबचा चुलत भाऊ असतो. तिथे शिकार, मासे पकडणे, नेमबाजी करता येते. तिथे चित्रातल्यासारखी पण जरा स्वमग्न अशी खेडेगावे असतात. तिथे रेल्वेचे चांगले जाळे असते. ब्रिटीश साम्राज्याच्या इतर अशा गावांपेक्षा इथले नोकर कमी कटकट करतात. त्यामुळे तुमचे उत्पन्न चार आकडी असल्याशिवाय, तुम्हाला प्राप्तीकर आणि इतर कायकाय भरत, मर्टोनशायरमध्ये

रहाणे शक्य नाही. पाच आकडी उत्पन्न असेल, तर जास्त बरे. हर्क्युल पायरो परदेशी असल्याने, त्याला कोणी गावाकडील चुलत भाऊ नव्हते. पण आतापर्यंत त्याला अशा भागातून भेटीसाठी आमंत्रणे मिळण्यात काही अडचण नव्हती. शिवाय त्याने इतकी चांगली मालकीणबाई मिळवली होती, की तिला तिच्या शेजाऱ्यांबद्दल बोलायला खूप आवडे, ज्यात पायरोला काहीच रस नसे. पण तरी त्याला तिची बडबड ऐकून घ्यावी लागे, एवढाच त्रास होता.

"ग्रँट्स? इथे चार ग्रँट्स आहेत. चार मुली. गरीब बिचाऱ्या जनरलला त्याना काबूत ठेवणे कठीण जात असल्यास, मला काही नवल वाटत नाही. एकटा मनुष्य चार मुलींचे काय करणार?" कार्मिचेल बाईसाहेबांचे हात तिचे बोलणे कुणालाही खरे वाटेल, अशा तऱ्हेने हवेत उडत होते. पायरो म्हणाला, "खरे की काय ?" आणि त्या बाईने पुढे सुरु ठेवले.

तो जनरल त्याच्या सैन्याच्या तुकडीत मोठा शिस्तशीर म्हणून प्रसिद्ध होता, असे त्यानेच मला सांगितले. पण त्या मुलींनी त्याचा पराभव केला. मी तरुण असतांना असे नव्हते. म्हातारा कर्नल सँडे मोठ्या शिस्तीचा माणूस होता व त्याच्या आज्ञा तो पाळायला लावत असे. मला आठवते, त्याच्या बिचाऱ्या मुली --- "

[ कर्नल सँडेच्या मुलींचे वर्णन व कार्मिचेल बाईसाहेबांच्या तारुण्यातील मित्रांचे वर्णन बराच काळ चालू राहिले. ]

तिच्या पहिल्या बोलण्याकडे वळत कार्मिचेल बाईसाहेब म्हणाल्या, "तुम्हाला सांगते, त्या मुलींचे खरे तर काही चुकलेले नव्हते. फक्त चढलेले डोके आणि नकोशा गोष्टी करायला लागणे. पूर्वी इथे व्हायचे त्यामानाने हे काहीच नव्हते. इथे विचित्र लोक येतात. इथे आता साधेसुधे गाव असे काही राहिलेले नाही. सगळीकडे आता पैसा पैसा आणि पैसा! त्याचेच राज्य? आणि तुम्ही जुन्या गोष्टी ऐकत बसला आहात. तुम्ही कोण म्हणालात? अन्थनी हॉकर? ओहो, हो. मला तो माहिती आहे. तो फार वाईट तरुण मनुष्य होता. पण पैशात लोळत होता. तो इथे शिकारीसाठी येत असे --- तो मेजवान्या देत असे --- फार चैनीच्या मेजवान्या आणि विशेष मेजवान्या, जर एखाद्याने त्याला सांगितलेल्या सगळ्या गोष्टींवर विश्वास ठेवायचे म्हटले तर --- मी तर असे नेहमी करतेच, असे नाही. कारण मला असे वाटत नाही की लोक एवढ्या वाईट स्वभावाचे असतात. ते नेहमी वाईटावर विश्वास ठेवतात. एखादी व्यक्ती उत्तेजक पेये पिते किंवा मादक द्रव्य घेते, असे म्हणायची हल्ली फॅशन झाली आहे. त्या दिवशी मला कोणीतरी म्हणाले, की तरुण मुली सहजतेने दारू घेतात. पण असे म्हणणे म्हणजे मोठे भूषण आहे, असे मला वाटत नाही. आणि जर कोणी

वागण्यात काही वेगळेपणा दाखवत असेल, तरी ते मादक द्रव्यसेवन वाईटच म्हणतात. मिसेस लार्कीन अशी आहे, असे सर्वजण म्हणतात. पण मी त्या बाईची काही पर्वा करत नाही. हा विसराळूपणा सोडून दुसरे काही नाही. ती तुमच्या त्या अँथनी हॉकरची जवळची मैत्रिण होती. आणि म्हणूनच, जर मला विचाराल, तर ती तिच्या नातींशी अगदी दुष्टाव्याने वागते. त्या माणसाला खाणाऱ्या आहेत, असे ती म्हणते. तशा त्या सारख्या पुरुषांच्या मागे मागे असतात. पण का नाही? शेवटी ते नैसर्गिक आहे. आणि त्यातील प्रत्येकजण दिसायला चांगली आहे."

पायरो एक प्रश्न विचारतो,

"मिसेस लार्कीन? अरे भल्या माणसा, ती कोण होती, असे मला विचारणे बरे नाही, नाही का? हल्ली कुणाला कुणाचे काय पडलेले असते? ते म्हणतात, ती उत्तम रीत्या स्वार होऊ शकते, त्यामुळे ती एव्हाना कुठच्या कुठे गेली असेल. तिचा नवरा म्हणे शहरात होता. तो मेला होता. घटस्फोट झाला नव्हता. ग्रँट्सनंतर ती लगेचच इथे आली. त्याला फार काळ झाला नाही. मला नेहमी असे वाटते, ती --- "

म्हाताऱ्या कार्मिचेल बाईसाहेब थांबल्या. तिचे तोंड उघडे होते व डोळे बाहेर आले होते. पुढे होऊन तिने पायरोला बोटांच्या

मुळावर तिच्या हातातील कागद कापायच्या साधनाने एक दणदणीत फटका मारला. त्याला लागून किती वेदना झाल्या, याची पर्वा न करता, ती उद्दीपित होऊन ओरडली, "अर्थात! त्यामुळे तू इथे आला आहेस का? अरे तू दुष्ट, फसव्या प्राण्या, मी तुला त्याबद्दल सर्व काही सांगायला भाग पाडते."

"पण कशाबद्दल मी सगळे सांगायचे आहे?"

कार्मिचेल बाईसाहेबांनी दुसरा फटका मारायचा प्रयत्न केला पण पायरोने तो कसब वापरून चुकवला.

"पायरो, शिंपल्यासारखे आत लपून बसायचे ढोंग करू नकोस. मला तुझ्या मिशा हलतांना दिसत आहेत. तुला इथे गुन्ह्याने खेचून आणले आहे --- आणि तू मला फक्त निलाजरेपणे त्रास देतो आहेस. आता मला बघू दे, तो खून असेल का? अलीकडे कोण मेले आहे? फक्त म्हातारी लुइसा गिलमोर. ती पंच्याऐंशी वर्षांची होती आणि तिला जलोदर झाला होता. ती नसावी. त्या बिचाऱ्या लिओ स्टॅव्हेरटॉनची शिकार करतांना मान मोडली होती आणि त्याला प्लॅस्टर घातले होते --- त्यामुळे तो नसावा. तो कदाचित खून नसावा. काय हे दयनीय आहे! मला अलीकडील काही विशेष हिरेमाणकांच्या चोऱ्या आठवत नाहीत --- तू पाठलाग करत असलेला फक्त गुन्हेगार असावा. ती बर्ल लार्कीन आहे का? तिने

तिच्या नवऱ्याला विष दिले का? त्याची खंत वाटल्याने ती इतकी भकास झाली असेल का?”

पायरो ओरडला, “बाईसाहेब, तुम्ही फार जलद जात आहात.”

“अरे चक्रम माणसा, पायरो, तू काही कारवाई करू बघतो आहेस.”

“बाईसाहेब, तुम्ही आपले जुने मूल्यवान साहित्य ओळखता का?”

“त्याचा इथे काय संबंध आहे?”

“त्याचा असा संबंध आहे. मी आपला पूर्वी होऊन गेलेल्या थोर हर्क्युलसचे अनुकरण करायचा प्रयत्न करतो आहे. त्याचे एक काम डिओमेडसच्या रानटी घोड्यांना पाळण्याचे होते.”

तू इथे घोड्यांना प्रशिक्षण द्यायला आला असल्याचे सांगू नकोस --- तुझ्या वयाला --- आणि नेहमी चामड्याचे बूट घालणारा! तू आयुष्यात कधी कुणाला घोड्यावर बसलेले पाहिले नसल्यासारखे माझ्याकडे बघू नकोस!”

“बाईसाहेब, घोडे प्रतीकात्मक आहेत. ते मनुष्यांना मारून खाणारे रानटी घोडे होते.”

"ते किती क्रूर होते! मला हे प्राचीन ग्रीक व रोमन नेहमी वाईट वाटतात. मला कळत नाही की चर्चचे लोक जुन्या मूल्यवान साहित्यातून नेहमी त्यांचा उल्लेख का करत असतात? मला एक गोष्ट कळत नाही, ते काय सांगू बघतात. मला वाटते, हा जुन्या मूल्यवान साहित्याचा सगळा विषय चर्चच्या लोकांसाठी योग्य नाही. हे इतके लैगिकतेकडे झुकणारे आहे. आणि ते अंगावर कपडे नसलेले पुतळे --- हे फक्त मलाच वाटते असे नाही. पण तुम्हाला माहिती आहे, हे चर्चचे लोक कसे असतात. जर मुली चर्चमध्ये मोजे घालून आल्या नाहीत, तर ते कसे रागावतात --- पण मी कुठे होते? मी काय सांगत होते?"

"माझी खात्री नाही."

"मला वाटते, तुम्ही दुर्दैवी आहात. तुम्ही अंदाज केला, "ती चोरी असेल. मी मिसेस लार्कीनला दुसऱ्या दिवशी बँकेत पन्नास पौंडाच्या चेकची रक्कम स्वतःसाठी काढतांना पाहिले --- मला तेव्हा वाटले, की ही एवढी रक्कम का काढत आहे? ओहो, असा विचार करणे चूक होते. जर तिने चोरी केली असती, तर ती पैसे भरताना दिसली असती, नाही का? पायरो, तू तिथे नुसताच घुबडासारखा बसून रहाणार असशील, तर मी तुझ्या अंगावर काहीतरी फेकेन."

पायरो म्हणाला, "तू थोडा धीर धरला पाहिजेस."

## चार

जनरल ग्रँटचे घर, अ‍ॅश्ले लॉज, फार मोठे नव्हते. ते एका टेकडीशेजारी होते. तिथे चांगले तबेले होते आणि दुर्लक्षित विखुरलेली बाग होती.

घराच्या दलालाने सांगितल्याप्रमाणे, ते फर्निचरने सजलेले होते. एकमेकांवर पाय टाकलेला बुद्ध सोयीस्करपणे आरामशीर बसला होता. बनारसचे ब्रासचे ट्रे व टेबले जमिनीवर जखडल्यासारखी दिसत होती. शेकोटीवरील कट्ट्यावर हत्तींची मिरवणूक मिरवत होती. ब्रासच्या अजून वस्तूंनी भिंत सजली होती.

त्या इंग्रजी- भारतीय वळणाच्या घरात मध्यभागी जनरल ग्रँट त्याच्या पायाला बँडेज गुंडाळलेलल्या अवस्थेत मोठ्या हाताच्या गबाळ्या खुर्चीत आरामशीरपणे पहुडला होता.

त्याने स्पष्टीकरण दिले, "मिस्टर पायरो, गाउट! मला नेहमीच गाउटचा त्रास होत असतो. त्यामुळे मी जाम चिडचिडा बनतो. हा सगळा माझ्या वडीलांचा दोष आहे. त्यांनी आयुष्यभर पोर्ट प्यायली --- माझे आजोबाही तसेच होते. तेच माझ्यात उतरले

आहे. माझ्याबरोबर एक पेय घेणार का? माझ्यासाठी ती घंटी वाजवाल का?”

एक फेटा बांधलेला नोकर अवतरला. जनरल ग्रँटने त्याला अब्दुल अशी हाक मारून, व्हिस्की व सोडा आणायला सांगितले. ती आल्यावर त्याने इतक्या उदारपणे पेला भरला की पायरोला ती कमी करायला सांगण्यासाठी हालचाल करावी लागली.

जनरलने काचेच्या कपाटातील व्हिस्कीकडे बघत म्हटले, “मिस्टर पायरो, मी तुमच्याबरोबर घेऊ शकत नाही. माझे डॉक्टर वल्लाह म्हणतात, त्याला हात लावणेही माझ्यासाठी विष आहे. डॉक्टर बिचारे अज्ञानी असतात. दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी न होणारे! त्याना माणसांना त्यांच्या आवडत्या अन्नापासून व पेयांपासून, दूर ढकलायला आवडते. जसे की उकळता मासा. वा! वा! उकळता मासा!”

रागाच्या भरात जनरलने निष्काळजीपणे, त्याचा दुखावलेला पाय हलवला आणि बांधलेल्या दोऱ्यांच्या नावाने, वेदनेने एक किंकाळी फोडली.

त्याने स्वतःच्या अपशब्दांबद्दल क्षमा मागितली.

“एखाद्या डोके सुजलेल्या अस्वलासारखा मी आहे. जेव्हा मला गाउटचा दौरा पडतो, तेव्हा माझ्या मुली मला चांगला रुंद

पलंग देतात. मी त्यांना का दोष देतो, कुणास ठाऊक! तुम्ही त्यापैकी एकीला भेटल्याचे मला समजले.”

“हो. मला तो आनंद मिळाला. तुम्हाला खूप मुली आहेत, नाही का?”

जनरल मलूलपणे बोलला, ‘चार. त्यात मुलगा नाही. चार चमकत्या मुली.”

या दिवसात विचार करण्यासारखी गोष्ट.”

‘त्या चौघीही फार सुंदर असल्याचे मी ऐकले आहे.”

“हं. म्हणजे फार वाईट नाहीत. तुम्हाला सांगतो, त्यांच्या मनात काय आहे, हे मला कधीच समजत नाही. अलीकडे तुम्ही मुलींवर वचक ठेऊ शकत नाही. हल्ली फार कडक वागून चालत नाही. सगळीकडे फार मोकळीक दिसते. मग माणूस काय करणार? मी त्याना बांधून तर ठेऊ शकत नाही, शकतो का?”

“त्या आसपासच्या भागात प्रसिद्ध आहेत, असे मला समजले.”

जनरल ग्रँट म्हणाला, “काही जुन्या म्हाताऱ्यांना त्या आवडत नाहीत. मटणाचे कपडे घातलेल्या त्या बकऱ्या इथे आजूबाजूला फिरत असतात. माणसाला इथे जपून वावरावे लागते. त्यातील एक निळया डोळयांची विधवा आहे. तिने मला जवळजवळ पकडले -

-- ती एखाद्या मांजराच्या पिल्लासारखी पायात घोटाळू लागली. ‘बिचारा जनरल ग्रँट --- तुझे आयुष्य कसे रुचीपूर्ण असायला हवे होते.’” जनरलने डोळा मारून बोट नाकावर ठेवले.

“मिस्टर पायरो, ते तसे होणे अटळ होते. ते फारसे मनावर घेऊ नका. चालायचेच. ही काही जगाची वाईट बाजू नाही. पण त्यात फार पुढे गेलात, तर ते बेचव होईल. मला गाव आवडत होते, जेव्हा ते गावासारखे होते. पण या मोटारी, जाझ संगीत आणि तो कर्कश ओरडणारा रेडिओ! माझ्याकडे तो नाही आहे आणि मुलींना ते माहिती आहे. माणसाला स्वतःच्या घरात थोडी शांती मिळवायचा हक्क आहे.”

पायरोने हळूहळू संभाषण अन्थनी हॉकरकडे वळवले.

“हॉकर? हॉकर? नाही. मला तो माहिती नाही. त्रासदायक दिसणारा व दोन डोळे जवळ असणारा मनुष्य! जो तुमच्या डोळ्याला डोळा भिडवू शकत नाही, अशा माणसावर कधीही विश्वास ठेऊ नका.”

“पण तो तुमची मुलगी शैलाचा मित्र आहे, हो ना?

“शैला? मला अजिबात माहिती नाही. मुली मला कधीच काही सांगत नाहीत.” दाट भुवया खाली नाकावर आल्या. भेदक, निळे डोळे लाल चेहऱ्यामधून थेट पायरोकडे बघू लागले. “हे बघा

मिस्टर पायरो, हे काय चालले आहे? तुम्ही मला कशासाठी भेटायला आला आहात आणि मला काय सांगत आहात?”

पायरो सावकाश म्हणाला,

“ते कठीण आहे --- कदाचित माझे मलाच ते माहिती नाही. मी एवढेच म्हणू शकतो.तुमची मुलगी शैला --- किंवा कदाचित सगळ्या मुली यांनी काही नको ते मित्र केले आहेत.”

“त्या वाईट संगतीला लागल्या आहेत का? मला याचीच भीती होती.

मला इतरजणांकडूनही एखादा शब्द ऐकू येतो.” त्याने दयनीयपणे पायरोकडे पाहिले. ”मिस्टर पायरो, पण मी काय करू शकतो? मी काय करू शकतो?”

पायरोने त्याचे डोके गोंधळून गेल्यासारखे हलवले.

जनरल ग्रँट बोलत राहिला, “त्या कुणाच्या नादाला लागल्या आहेत?”

पायरोने दुसऱ्या प्रश्नाने उत्तर दिले, “जनरल ग्रँट, तुमच्या लक्षात आले आहे का, की तुमच्या मुलींपैकी कोणी वागण्यात दबलेल्या, उदास व खात्रीशीर वाटत नसून, उद्दीपित झालेल्या व मनस्वी वाटत आहेत का?

“सर, हा काय भिकारपणा आहे! तुम्ही तर एखाद्या हमखास लागू पडणाऱ्या औषधासारखे बोलत आहात. एक तर असे काहीही मला जाणवलेले नाही.”

पायरो थंडपणे बोलला, “मग तुमचे नशीब चांगले आहे.”

“सर, या सगळ्याचा अर्थ काय आहे?”

“मादक द्रव्ये.”

“काय?’

तो शब्द गर्जत आला.

पायरो म्हणाला,

“तुमची मुलगी शैला हिला मादक पदार्थसेवनाचे व्यसन लागावे, असा प्रयत्न केला गेला. कोकेनचे व्यसन फार पटकन लागते. एखाददोन आठवडे त्यासाठी पुरेसे असतात. एकदा ते व्यसन लागले, की ती व्यसनी व्यक्ती त्याचा अजून पुरवठा व्हावा, यासाठी काहीही करते, कितीही पैसे मोजते. तुमच्या लक्षात येईल, की ती व्यसनाधीन व्यक्ती किती जोरदारपणे त्याला बळी पडू शकते.”

त्या वयस्क माणसाच्या मुखातून निघणारे कानठळ्या बसवणारे बॉम्ब व रागाचा पारा चढलेले भीतीदायक बोलणे, त्याने शांतपणे ऐकून घेतले. मग जसा आगीचा डोंब विझत आला तेव्हा,

जनरलने डोळे मिचमिच करणाऱ्या त्या वाईट मुलाला पकडल्यावर काय करावे, हे फक्त शेवटचे वर्णन करायचे उरले.

पायरो म्हणाला, “तुमची स्तुती करणारी मिसेस बीटॉन म्हणते त्याप्रमाणे, पहिल्यांदा आपल्याला त्या सशाला पकडावे लागेल. एकदा त्या मादक द्रव्य विकणाऱ्याला पकडले, की मी मोठ्या आनंदाने त्याला तुमच्या हवाली करेन.”

कोरीव काम केलेल्या लहान टेबलावर हात टेकून जनरल उठला व त्याचा तोल सावरला.

पायरो पुटपुटला, “मी तुम्हाला हजार वेळा विनंती करतो --- समजले का --- विनंती करतो, की मुलींना यातले काही सांगू नका.”

“काय? मी त्यांच्याकडून सत्य काय ते काढून घेईन. ते मी करेन.”

“तेच तर तुम्ही करू नका, असे मी तुम्हाला सांगतो आहे. तुम्हाला फक्त खोटे कळेल.”

“सर, ते खोटे गेले खड्डयात!”

“जनरल ग्रँट, मी तुम्हाला खात्री देतो. तुम्ही तुमचे तोंड गप्प ठेवले पाहिजे. ते महत्वाचे आहे --- समजले? महत्वाचे!”

तो जुना शिपाईगडी बोलला, “ओहो! ठीक आहे, तुमच्या म्हणण्याप्रमाणे होऊ दे.”

त्याला आज्ञा पाळायला लावण्यात आली. पण पटवून दिले गेले नाही.

हर्क्युल पायरोने बनारस ब्रासमधून वाट काढली व बाहेर पडला.

## पाच

मिसेस लार्कीनच्या खोलीत लोकांची गर्दी झाली होती.

मिसेस लार्कीन स्वतः एका बाजूच्या टेबलावर उत्तेजक पेये मिसळत बसली होती. ती उंच असून तिचे लालसर चॉकलेटी केस तिने मानेमागे गुंडाळून ठेवले होते. तिचे डोळे हिरवट करडे होते व पापण्या लांब काळ्याभोर होत्या. ती वाईट डौलाने, सहजतेने इकडेतिकडे फिरत होती. ती साधारण तिशीची वाटत होती. फक्त जवळून बघितले, तर तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्यात सुरकुत्या दिसत होत्या. त्यावरून कळत होते की ती दिसते, त्यापेक्षा दहा वर्षांने मोठी आहे.

हर्क्युल पायरोला इथे एका मध्यमवयीन बाईने, कार्मिचेल बाईसाहेबांच्या मैत्रिणीने आणले. त्याला स्वतःलाही एक उत्तेजक

पेय दिले गेले आणि दुसरे खिडकीत बसलेल्या मुलीसाठी नेऊन देण्यास सांगण्यात आले. ती मुलगी, लहानशी चांगली मुलगी होती --- तिचा चेहरा गुलाबी गोरा असून संशयास्पद रीत्या देवदूतासारखा होता. तिचे डोळे छोटेसे व छान होते. पण ते दक्ष व संशयी असल्याचे पायरोच्या ताबडतोब लक्षात आले,

तो म्हणाला, “बाईसाहेब, तुमची तब्येत चांगली रहाण्यासाठी.”

तिने मान हलवली व ती ते प्यायली. मग ती वेड्यावाकड्या पद्धतीने बोलली, “तुम्हाला माझी बहीण माहिती आहे का?”

“तुमची बहीण? आहा, म्हणजे तुम्ही ग्रँट बहीणींपैकी आहात?”

“मी पाम ग्रँट आहे.”

“आणि आज तुमची बहीण कुठे आहे?”

“ती शिकार करायला गेली आहे. ती लवकरच परत येईल.”

“मी तुमच्या बहीणीला लंडनला भेटलो.”

“मला माहिती आहे.”

“तिने हे सांगितले?”

पाम ग्रँट नकार देत, कसेतरी म्हणाली, “शैला काही संकटात होती का?”

‘म्हणजे तिने तुम्हाला सर्व काही सांगितले नाही?”

त्या मुलीने मान हलवून विचारले, “तिथे टोनी हॉकर होता का?”

पायरोने उत्तर देण्यापूर्वी दार उघडून हॉकर व शैला आत आले. ते शिकारीच्या वेषात होते. शैलाच्या गालावर चिखलाची खूण होती.

‘अरे लोकांनो, आम्ही पेयपानासाठी इथे आलो आहोत. टोनीची बाटली रिकामी आहे.”

पायरो पुटपुटला, “देवदूतांच्या गोष्टी --- “

पाम ग्रँट गरजली, “तुम्हाला राक्षस म्हणायचे आहे.”

पायरो कडकपणे बोलला, “ते तसे आहे का?”

बर्ल लार्कीन पुढे येऊन बोलली, “टोनी, तू इथे आहेस तर. तुमची शिकार कशी झाली? तू गेलर्टच्या झाडांच्या छोट्या गटाचे चित्र काढलेस का?”

तिने चातुर्याने त्याला शेकोटीशेजारील सोफ्याजवळ ओढले. त्याने जाण्यापूर्वी शैलाकडे डोके वळवून पाहिलेले पायरोने पाहिले.

शैलाने पायरोला पाहिले होते. तिची क्षणमात्र चलबिचल झाली. मग ती खिडकीत दोघांकडे आली. ती कसेबसे म्हणाली, “म्हणजे काल घरी आलेले तुम्ही होतात तर!

‘तुमच्या वडीलांनी तुम्हाला सांगितले का?”

तिने मान हलवली.

“मला वाटते, अब्दुलने सांगितले असावे.”

पाम ओरडली, “तुम्ही माझ्या वडिलांना भेटायला गेलात?”

पायरो म्हणाला, “हो, हो. आमचे काही समान मित्र आहेत.”

पाम कडकपणे बोलली, “माझा यावर विश्वास नाही.”

“तुमचा कशावर विश्वास नाही? की तुमचे वडील आणि मी यांचे काही समान मित्र असू शकतात, यावर?”

मुलगी लाजली.

“असा मूर्खपणा पांघरू नका. मला म्हणायचे होते, ते खरे कारण नव्हते.”

ती तिच्या बहीणीकडे वळली. “शैला, तू का काही बोलत नाहीस?”

शैलाने सुरवात केली, “पण त्यांना टॉमी हॉकरबरोबर काही करायचे नव्हते, होय ना?”

पायरोने विचारले, ‘का काही करायचे असेल?”

शैला लाजून खोलीमध्ये फेरी मारून इतरांकडे गेली.

पाम अचानक भावनाप्रधानतेने, पण हळू आवाजात म्हणाली, “मला टॉमी हॉकर आवडत नाही. त्याच्यात काहीतरी पाप असल्याचे जाणवते --- आणि तिच्याबद्दलही --- म्हणजे मला म्हणायचे आहे --- मिसेस लार्कीन. आता त्यांच्याकडे बघा.”

पायरोने ती पहात होती, तिकडे बघितले.

हॉकरचे डोके त्याच्या यजमानीण बाईंजवळ होते. तो तिला शांत करत असल्याचे दिसत होते. मिनिटभरासाठी तिचा आवाज उठला, “पण मी थांबू शकत नाही. मला ते आता हवे आहे.”

पायरो थोडे हसून बोलला, “लेस्बियन --- किंवा ती कोण असेल ती असेल --- त्यांना नेहमी ते लगेच हवे असते, नाही का?”

पण पाम ग्रँटने काही प्रतिसाद दिला नाही. तिने मान खाली घातली होती. ती उदास होऊन तिच्या ट्वीडच्या स्कर्टला चुण्या धालत व काढत होती.

पायरो संभाषण करायच्या इच्छेने बोलला, “बाईसाहेब, तुम्ही तुमच्या बहिणीहून अगदी वेगळ्या आहात.”

तिने कृत्रिम अधीरपणे तिचे डोके वर केले व म्हणाली, “मिस्टर पायरो, टोनी शैलाला काय देत होता? कशामुळे ती वेगळीच होत होती?”

त्याने तिच्याकडे सरळ बघितले व विचारले, “मिस ग्रँट, तुम्ही कधी कोकेन घेतले आहे का?”

तिने मान हलवली.

“ओहो, नाही. ते ते होते तर! कोकेन? पण ते फार धोकादायक नाही का?”

शैला ग्रँट हातात ताजे पेय घेऊन तिच्याकडे आली. ती बोलली, “काय धोकादायक?”

पायरो म्हणाला, “आम्ही मादक द्रव्यसेवनाच्या दुष्परिणामांबद्दल बोलतो आहोत. त्याने मन व शरीर हळूहळू मृत्यूकडे जाते --- ते माणसातील सत्याचा व चांगल्याचा नाश करते, हे सर्वात वाईट आहे.”

शैलाने तिचा श्वास रोधून धरला. तिच्या हातातील पेला हेंदकाळून त्यातील पेय खाली जमिनीवर सांडले. पायरोने पुढे चालू ठेवले.

““मला वाटते, डॉ स्टोडार्टने तुम्हाला जीवनातील मृत्यूकडे नेणारे त्याचे परिणाम स्पष्ट सांगितले आहेत. हे इतके झटपट घडते

--- असे न होणे कठीण आहे. जो माणूस मुद्दाम केलेली दुसऱ्यांची धूळदाण व हाल बघून स्वतःची तुंबडी भरून घेतो, तो रक्त व मास खायला चटावलेला नरपशूच असतो.”

तो बाजूला झाला. त्याच्यामागे त्याने पाम ग्रँटचा आवाज ऐकला. “शैला!” आणि एक शीळदेखील ऐकली --- शैला ग्रँटची --- हळूवार शीळ --- ती इतकी हळू होती, की त्याला जेमतेम ऐकू आली.

“बाटली --- “

पायरोने मिसेस लार्कीनचा निरोप घेतला व तो बाहेर हॉलमध्ये गेला. तिथे टेबलावर एक बाटली होती. शेजारी टोपी व दाणे पडलेले होते. पायरोने ते उचलले. त्यावर A H अशी आद्याक्षरे होती.

पायरो स्वतःशी पुटपुटला, “टोनीची बाटली रिकामी आहे?”

त्याने ती हळूच हलवली. त्यातून उत्तेजक पेयाचा आवाज आला नाही. त्याने झाकण उघडले.

टोनी हॉकरची बाटली पूर्ण भरलेली होती --- पांढरी पावडर ---

## सहा

हर्क्युल पायरो कार्मिचेल बाईसाहेबांच्या घराच्या गच्चीत उभा राहिला आणि मुलीला भावनिक आवाहन करू लागला. तो म्हणाला,

"बाईसाहेब, तुम्ही अगदी तरुण आहात. माझा असा विश्वास आहे, की तुम्ही व तुमच्या बहिणी काय करत आहात, हे खरे तर तुम्हाला समजतच नाही आहे. डिओमेडसच्या घोडींसारखे तुम्ही मानवी मासावर वाढत आहात.

शैलाने हुंदके देत खांदे शहारवले. ती बोलली, "हे भयंकर वाटते आहे, असेच म्हणायला हवे. आणि हे खरे आहे की लंडनमधील त्या संध्याकाळपर्यंत, डॉ स्टोडार्ट माझ्याशी बोलेपर्यंत, मला त्याची भीषणता कळलीच नाही. तो इतका थंड --- इतका गंभीर होता. नंतर मला समजले, मी किती वाईट गोष्ट करत होते --- त्यापूर्वी मला वाटत होते की ती --- ओहो! अनेक तासांनी मला वाटले, इतर पेयांसारखेच ते विकत घेऊन मिळत असेल. पण ते असे असेल, असे मला कधीच वाटले नाही."

पायरो म्हणाला, "आणि आता?"

शैला ग्रँट म्हणाली, “तुम्ही म्हणाल तसे मी करेन. मी --- मी इतरांशी बोलेन --- मला वाटत नाही, की डॉ स्टोडार्ट माझ्याशी परत बोलतील -- “

पायरो म्हणाला, “उलट आम्ही दोघे डॉ स्टोडार्ट व मी तुम्हाला पुन्हा नव्याने सर्वतोपरी मदत करायला तयार आहोत. तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा. पण एक गोष्ट केली पाहिजे. एका माणसाला नष्ट केले पाहिजे --- पूर्णपणे नष्ट केले पाहिजे. फक्त तुम्ही आणि तुमच्या बहिणी ते करू शकता. तुमचा पुरावा आणि तुमचा पुरावाच त्याला नष्ट करू शकेल.”

“तुम्हाला माझे वडील म्हणायचे आहे का?”

“बाईसाहेब, तुमचे वडील नव्हे. मी तुम्हाला सांगितले नाही का, की हर्क्युल पायरोला सर्व काही माहिती आहे? कार्यालयात तुमचा फोटो सहज ओळखला गेला. तुम्ही अनेक वर्षांपूर्वी सुधारगृहात पाठवल्या गेलेल्या, दुकानातून मालाची उचलेगिरी करणाऱ्या शैला केली असल्याचे ओळखले गेले. जेव्हा तुम्ही सुधारगृहातून बाहेर आलात, तेव्हा स्वतःला जनरल ग्रँट म्हणवणाऱ्या माणसाने तुम्हाला हे काम दिले. ‘कन्येचे’ काम. ‘तिथे खूप काम व पैसा असेल व वेळ चांगला जाईल’, असे तो म्हणाला. तुमचे काम काय होते, तर तुमच्या मित्रमैत्रिणींमध्ये या

पेयाचा प्रचार करायचा. नेहमी असे भासवायचे, की कुणा दुसऱ्याने ते तुम्हाला दिले आहे. तुमच्या बहिणींना पण तुमच्यासारखेच या जाळ्यात ओढण्यात आले.”

पायरो म्हणाला, “बाईसाहेब, आता या मनुष्याला पकडून, तुरुंगात पाठवले पाहिजे आणि त्यानंतर --- “

“हं, त्यानंतर काय?”

पायरो खोकला व हसून बोलला, “तुम्हाला देवाच्या सेवेकरता वाहिले जाईल --- “

## सात

मायकेल स्टोडार्टने पायरोकडे रोखून बघितले. तो म्हणाला, “जनरल ग्रँट?

जनरल ग्रँट?”

“अर्थात, माझ्या मित्रा. तुला माहिती आहे, दृष्याचे नेपथ्य फार बोगस होते, असे तू म्हणणार. बुद्ध, बनारस ब्रास, भारतीय नोकर! आणि गाउट सुद्धा! तो आता जुना झाला. गाउट असलेला फार म्हातारा माणूस, हा त्या तरुण मुलींचा बाप नव्हता.

“शिवाय मी अगदी खात्रीने सांगतो. मी बाहेर पडलो, माझे पैसे खर्च केले, गाउट असलेल्या पायाचा शोध घेतला. मी जे म्हणतो

आहे, त्यामुळे तो म्हातारा मनाने इतका खचला आहे, की त्याला काही कळत नाही आहे.”

खरेच तो जनरल अतिशय बोगस आहे. आणि तरीही ती चमकदार कल्पना आहे. कॉलरा झाल्यासारख्या स्वभावाचा तो निवृत्त इंग्रज- भारतीय जनरल, प्रसिद्ध विनोदी पात्र, इथे स्थाईक झाला आहे. इतर निवृत्त इंग्रज-भारतीय सैन्यदलातील ऑफिसर लोकांबरोबर नव्हे – ओहो नाही, तो समाजात मिसळायला म्हणून फार महाग ठकाणी जातो, की जे निवृत्त इंग्रज-भारतीय सैन्यदलातील ऑफिसर लोकांना परवडणार नाही. तिथे लंडनमधील श्रीमंत लोक जातात. ते माल विकण्यासाठी चांगले कुरण आहे. त्याने या चार तरुण चटपटीत मुलींना का हेरले? जर काही बाहेर आलेच, तर त्यांना मादक पदार्थ सेवन करणाऱ्या म्हणून ओळखले जाईल, याची त्याला खात्री होती.”

“तुम्ही त्या दुष्ट म्हाताऱ्याला भेटायला गेलात, तेव्हा तुमची काय कल्पना होती? तुम्ही त्याला अटक करणार होतात का?”

“हो. मला तसे करून काय होते, हे बघायचे होते? मला फार वाट बघावी लागली नाही. मुलींना त्याच्या आज्ञा होत्या. अँथनी हॉकर हा त्यांच्या कारवाईला फशी पडलेला एकजण होता. त्याच्यावर या प्रकरणाचे खापर फोडले जाणार होते. शैला मला

हॉलमधील बाटलीबद्दल सांगणार होती. तिला जवळजवळ ते करणे शक्य झाले नाही. पण दुसऱ्या मुलीने रागावलेल्या शैलाला गुद्दे मारून खाली पाडले.”

मायकेल स्टोडार्ट उठला व वरखाली फेऱ्या मारू लागला. तो बोलला,

“तुम्हाला माहिती आहे, मी त्या मुलीला दृष्टीआड होऊन देणार नाही. मला या कुमारवयातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर चांगली उपपत्ती मिळाली आहे. तुम्ही घरगुती आयुष्य पाहिलेत, तर तुम्हाला नेहमी ती सापडेल --- “

पायरो मध्येच बोलला, “अरे मित्रा, मला तुझ्या शास्त्राबद्दल पूर्ण आदर आहे. मिस शैला केलीच्या बाबतीत तुझी उपपत्ती नक्की लागू पडेल.”

“दुसऱ्यांच्या बाबतीतही.”

“दुसऱ्यांच्या बाबतीत कदाचित. कदाचित पडेलही. मी फक्त लहानशा शैलाबद्दल खात्री बाळगतो. तू तिला सुधारू शकशील. त्याबद्दल काही संशय नाही. तिला तुझी चपराक आधीच बसलेली आहे --- “

लाजत मायकेल स्टोडार्ट म्हणाला, “पायरो, तुम्ही काहीही बोलता.”

# THE GIRDLE OF HYPPOLITA
# हिप्पोलिटाचा कंबरपट्टा



## एक

हर्क्युल पायरोला असे म्हणायला आवडते, की एका गोष्टीतून दुसरी गोष्ट निघते. तो पुढे म्हणतो, हे चोरलेल्या रुबेनच्या केसइतके कुठल्याच केसमध्ये स्पष्ट झालेले नाही.

खरेतर त्याला रुबेनमध्ये फारसे स्वारस्य नव्हते. रुबेनची तो फार वाखाणणी करत नव्हता. त्यामुळे चोरीची परिस्थिती अगदी सर्वसामान्य होती. तो या जुन्या गाजलेल्या कलाकृतीशी संबंधित

नव्हता असे नाही. पण अलेक्झांडर सिम्पसन या त्याच्या मित्रासाठी त्याने ही खासगी केस घेतली.

चोरीनंतर अलेक्झांडर सिम्पसनने पायरोला बोलावले व त्याचे सर्व दुःख त्याला कथन केले. रुबेन हा अलीकडचा शोध होता, व अलीकडेपर्यंत त्याची कारागिरी श्रेष्ठ प्रकारची असल्याचे कोणाला माहिती नव्हते. आणि त्याच्या खरेपणाबद्दल काही संशय नव्हता. सिम्पसन गॅलरीत तो प्रदर्शनात ठेवला होता आणि दिवसाढवळ्या त्याची चोरी झाली. जेव्हा बेकार लोक त्यांच्या रिट्झ चौकातील रस्त्यावर झोपण्याच्या युक्त्याप्रयुक्त्या लढवत होते, तेव्हा हे घडले. त्यांच्यातील काही लोक सिम्पसन गॅलरीत येऊन तिथे ‘कलादालन ही चैन आहे. भुकेल्याला अन्न द्या’ अशा घोषणा देत होते. तिथे पोलिसांना पाचारण केले गेले. प्रत्येकजणाने तिथे उत्सुक चौकसपणे गर्दी केली होती. शेवटी कायदेशीर रीत्या निदर्शकांना हटवण्यात आले. तेव्हा लक्षात आले की नवीन रुबेन त्याच्या कोंदणातून काढून पळवण्यात आला होता.

मिस्टर सिम्पसनने स्पष्टीकरण दिले, “असे बघा, तो अगदी लहानसा रुबेन होता. सगळ्यांचे लक्ष त्या मोर्चातील बेकार लोकांकडे असतांना एखादा माणूस ते त्याच्या काखेत लपवून बाहेर पडू शकला असता.”

चोरी करण्यासाठी एका माणसाला पैशांचे आमिष दाखवण्यात आल्याचे समजले. तो सिम्पसन गॅलरीतील त्या मोर्चात निदर्शने करणारा होता. पण असे करण्याचे कारण त्याला नंतर देखील माहिती नव्हते.

पायरोला वाटले की ही एक मनोरंजक युक्ती आहे, पण त्यासाठी काय करावे लागेल, हे त्याला कळत नव्हते. या सरळ सरळ झालेल्या चोरीची केस पोलिसांवर सोपवणे ठीक राहिले असते.

अलेक्झांडर सिम्पसन म्हणाला, "पायरो, माझे ऐक. मला माहिती आहे रुबेन कोणी चोरला आणि तो कुठे चालला आहे."

सिम्पसन गॅलरीच्या मालकाच्या म्हणण्याप्रमाणे, तो रुबेन आंतरराष्ट्रीय टोळीतील मूर्खांनी कुणा लखपतीच्या वतीने चोरला आहे. त्या लखपतीला या कलाकुसरीच्या वस्तू आश्चर्यकारक रीत्या कमी किमतीत घायची इच्छा होती आणि त्याबद्दल काही प्रश्न विचारले गेले नाहीत. सिम्पसन बोलला की रुबेन चोरून बहुधा फ्रान्सला त्या लखपतीकडे सोपवण्यात आला असावा. इंग्लिश आणि फ्रेंच पोलीस सज्ज होते. तथापि सिम्पसनचे मत असे होते, की त्याना यश आले नसावे. "आणि एकदा तो या भिकार कुत्र्याच्या हातात गेला, की तो मिळवणे अजून अवघड होऊन

बसणार आहे. श्रीमंत माणसांना मानाने वागवावे लागते. तिथे तुझे काम आहे. परिस्थिती नाजूक आहे. तूच त्या कामासाठी योग्य आहेस.”

शेवटी फारसा उत्साह नसतांना, पायरोला हे काम अंगावर घेण्यास राजी करण्यात आले. तो लगेच फ्रान्सला जायला तयार झाला. तो त्याच्या मोहिमेत पूर्णपणे रुची घेत नव्हता, पण त्यामुळे त्याला हरवलेल्या शाळेत जाणाऱ्या मुलीची केस माहिती झाली आणि त्यात त्याला खूप रुची वाटू लागली.

पायरो जेव्हा त्याच्या नोकराने बांधलेल्या सामानाला पसंती देत होता, तेव्हा त्याला ती केस प्रथम पोलीस इन्स्पेक्टर जापकडून माहिती झाली.

जाप बोलला, “काय रे, तू फ्रान्सला चालला आहेस?”

पायरो बोलला, “अरे मित्रा, तुला स्कॉटलंड यार्डकडून हे चांगले माहिती आहे.”

जाप हसला व म्हणाला, “तुझ्याबरोबर आमचे हेर असतील. सिम्पसनने तुझ्यामागे ही रुबेनची केस लावून दिली आहे. त्याचा आमच्यावर विश्वास नाही, असे दिसते. ठीक आहे. हे म्हणजे इथे नाही आणि तिथेही नाही. पण मला तुझ्याकडून काय करून घ्यायचे आहे, ते वेगळेच आहे. जर तू पॅरीसला चाललाच आहेस, तर तू

एका दगडात दोन पक्षी मारू शकतोस. तेथील गुप्तहेर इन्स्पेक्टर हर्न फ्रेंच लोकांशी संपर्क साधून आहे. तुला तो माहिती आहे का? तो चांगला माणूस आहे --- पण कदाचित फार तर्क लढवणारा नाही. मला त्या केसबद्दल तुझे मत घ्यायला आवडेल.”

“ही काय केस आहे?”

“मुलगी नाहीशी झाली आहे. आज संध्याकाळचा वर्तमानपत्रात ती बातमी येईल. असे दिसते आहे, की तिचे अपहरण केले गेले आहे. क्रँचेस्टरच्या कॅनॉनची [ चर्चमधील पवित्र ग्रंथांशी संबंधित माणूस ] ती मुलगी आहे. तिचे नाव किंग आहे. विनी किंग.”

तो गोष्ट सांगू लागला. मिस पोपच्या इंग्लिश व अमेरिकन मुलींसाठी असणाऱ्या शाळेची वाट, म्हणजे पॅरीसची वाट, विनी चालत होती. ती लवकरच्या गाडीने, क्रँचेस्टरपासून आली होती --- एल्डर सिस्टर्स लिमिटेड नावाची कंपनी एका स्टेशनवरुन दुसरीकडे जाणाऱ्या मुलींवर लक्ष ठेवत असे. त्यांनी तिला लंडनहून निघालेले पाहिले होते. या कंपनीत अधिकारात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या मिस बरशॉकडे व्हिक्टोरियाला ही जबाबदारी देण्यात आली होती. मिस बरशॉच्या हाताखाली अजून अठरा मुली होत्या. त्या सर्व बोटीने व्हिक्टोरियापासून निघाल्या. एकोणीस मुलींनी

खाडी पार केली. कॅलेला कस्टम्समधून गेल्या. पॅरीसला गाडीत बसल्या. गाडीतच जेवण घेतले. पण जेव्हा पॅरीसबाहेर मिस बरशॉने डोकी मोजली, तेव्हा ती अठराच भरली.

पायरोने मान हलवत म्हटले, “आहा! गाडी कुठे थांबली होती का?”

“ती अमिएन्सला थांबली होती. पण त्यावेळी मुली गाडीतील खानपानाच्या डब्यात होत्या. त्या सगळ्या सांगत आहेत, की तेव्हा विनी त्यांच्यात होती. तिथून परत त्याच्या बसायच्या जागी येताना, ती कुठेतरी हरवली. म्हणजे इतर पाच मुलींबरोबर ती तिच्या बसायच्या जागी आली नाही. त्याना असे झाल्याचे लक्षात आले नाही. त्याना वाटले ती इतर मुलींबरोबर दुसऱ्या डब्यात असेल.”

पायरोने मान हलवली.

“म्हणजे तिला शेवटचे कधी पाहिले गेले?”

जाप थोडा खोकत बोलला, “अमिएन्स गेल्यावर दहा मिनिटांनी. तेव्हा ती गाडीतील स्वच्छतागृहात शिरत होती.”

पायरो पुटपुटला, “साहजिकच आहे. अजून काही नाही?”

जापचा चेहरा गंभीर झाला होता. “हो. एक गोष्ट. तिची टोपी रेल्वे रूळांशेजारी पडलेली सापडली --- साधारण अमिएन्सपासून चौदा मैलांवर.”

“पण प्रेत नाही?”

“नाही.”

पायरोने विचारले, “तुला या बाबतीत काय वाटते?”

“काय ते जाणून घेणे अवघड आहे. तिचे प्रेत न सापडल्याने --- ती गाडीतून पडली नसणार.”

“अमिएन्स गेल्यावर गाडी कुठे थांबली होती का?

“नाही. एकदा ती सिग्नल असल्यामुळे, हळू झाली होती, पण थांबली नव्हती. आणि जखमी न होता उडी मारण्याइतका तिचा वेग कमी नव्हता. तिने भांबावून जाऊन पळण्याचा प्रयत्न केला असेल का? ही तिची पहिली सहामाही होती आणि घरच्या आठवणीने व्याकूळ झाली असेल, हे असू शकते. पण ती साडेपंधरा वर्षांची होती --- तसे हे वय समज आलेले असते. सबंध प्रवासात, ती चांगल्या मनस्थितीत होती. व्यवस्थित गप्पा मारत होती.”

पायरोने विचारले, “गाडीत तिला शोधले का?”

खूप निराशेने जाप बोलला, “हो तर, नॉर्ड स्टेशन येण्यापूर्वी, पूर्ण गाडीभर हिंडून त्यांनी पाहिले. ती गाडीत नव्हती, एवढे नक्की! ती एकदम हवेत नाहीशीच झाली. मिस्टर पायरो, याला काही अर्थ नाही. हे वेड्यासारखेच झाले.”

“ती कुठल्या प्रकारची मुलगी होती?”

“मला माहिती आहे त्याप्रमाणे, सर्वसामान्य अशी मुलगी होती.”

“म्हणजे दिसायला कशी होती?”

“तिचा एक फोटो माझ्याकडे आहे. ती काही फार सुंदर नव्हती.”

त्याने फोटो पायरोकडे दिला व त्याने त्याचा शांतपणे अभ्यास केला.

ती बारीक आणि उंच दिसत होती. तिचे केस दोन भागात विभागलेले होते. हा फोटो मुद्दाम काढलेला दिसत नव्हता. तिचे लक्ष नसतांना काढलेला वाटत होता. ती सफरचंद खात होती. तिचे ओठ फाकलेले होते. दात पुढे आलेले असून त्याला दंतवैद्याने तार लावलेली दिसत होती. तिने चष्मा घातला होता.

जाप बोलला, “साधारण दिसणारी मुलगी होती. पण त्या वयात त्या तशाच असतात. मी काल माझ्या दंतवैद्याकडे गेलो होतो. तिथे या ऋतूतील सुंदरी मार्सिया गॉन्टचे चित्र काढलेले पाहिले. मला ती पंधरा वर्षांची असतांना पाहिलेली आठवली. तेव्हा मी अनधिकृत रीत्या घुसलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात राजवाड्यात घुसलेल्यांच्या बाबतीत काही काम करत होतो.

बावरलेली, डाग पडलेली, दात बाहेर आलेली व केस विस्कटलेली अशी ती तेव्हा दिसत होती. त्या एका रात्रीत सौदर्यवती होतात --- मला माहिती नाही, त्या हे कसे करतात! हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे."

पायरो हसला. तो बोलला, "बायका या चमत्कारिक असतात. या मुलीच्या कुटुंबाबद्दल काय? त्यांनी आपल्याला मदत होईल, असे काही सांगितले आहे का?"

जापने नकारार्थी मान हलवली. " आपल्याला मदत होईल, असे काही नाही. तिची आई अपंग आहे. गरीब म्हतारा किंग फारच हतबल आहे. तो शपथेवर सांगतो, की मुलगी पॅरीसला जायला घाबरत होती पण उत्सुक होती --- कधी जायचे, त्याची वाट बघत होती. तिला चित्रकला आणि संगीत किंवा तत्सम काही शिकायचे होते. मिस पोपच्या मुली कॅपिटालमध्ये कलाशाखेकडे जाणार होत्या. तुला माहिती असेल, की मिस पोपची निवासी शाळा प्रसिद्ध आहे. तिथे खूप मुली जातात. ती कडक आहे. अगदी ड्रॅगनसारखी आहे. आणि खूप खर्चिक --- आणि प्रवेश देण्याच्या बाबतीत बरीच परीक्षा घेणारी आहे."

पायरोने सुस्कारा टाकला. "मला तो प्रकार माहिती आहे. आणि मुलींना इंग्लंडहून नेणारी मिस बरशॉ?"

"ती डोक्याने उद्दीपित होणारी नव्हती. मिस पोप म्हणेल, की ही तिची चूक होती, असे वाटून, ती घाबरली होती."

पायरो विचारपूर्वक बोलला, "यात कोणी तरुण नाही का?"

जापने फोटो पाहून, शब्दाऐवजी हावभाव केले. "ती अशी दिसते आहे का?"

"नाही. पण तिचा अवतार बघवत नाही. तिचे हृदय अद्भुतरम्य असेल. पंधरा म्हणजे फार तरुण नाही."

जाप म्हणाला, "ठीक आहे. जर अद्भुतरम्य हृदयामुळे, तिने गाडीतून उडी मारली असेल, तर मला स्त्रियांच्या कादंबऱ्या वाचायला हव्यात."

त्याने आशापूर्णतेने पायरोकडे पाहिले. "तुला काही सुचत नाही का?"

पायरो मान हलवत बोलला, "नाही. काही कारणाने तिचे बूटदेखील रेल्वे रूळाशेजारी सापडले का?"

"बूट? नाही. पण का?"

पायरो पुटपुटला, "एक कल्पना आहे --- "

## दोन

हर्क्युल पायरो त्याच्या टॅक्सीकडे चालला होता, तेव्हा फोन वाजला. त्याने तो घेतला. “हॅलो?

जापचा आवाज आला, “छान, तू सापडलास. हे सर्व त्या म्हाताऱ्याबद्दल आहे. मी परत आलो, तेव्हा मला यार्डमधून निरोप मिळाला. मुख्य रस्त्याच्या कडेला, अमिएन्सपासून पंधरा मैलांवर मुलगी सापडली आहे. ती गोंधळलेली व घाबरलेली आहे. तिच्याकडून धड काही समजत नाही आहे. डॉक्टर म्हणतात तिने मादक द्रव्य घेतले आहे --- तरीही ती तशी हुशारीत आहे. तिला विशेष काही झालेले नाही.”

पायरो हळू बोलला, “म्हणजे मग तुम्हाला माझ्या मदतीची गरज नाही आहे?”

“हो, तसे दिसते आहे. तुला त्रास दिल्याबद्दल क्षमस्व!”

जाप त्याच्या शहाणपणाला हसला आणि फोन ठेवला.

पायरो हसला नाही. त्याचा चेहरा काळजीत पडल्यासारखा होता.

## तीन

गुप्तहेर इन्स्पेक्टर हर्नने पायरोकडे चौकसपणे पाहिले. तो म्हणाला, “सर, तुम्हाला या केसमध्ये इतके स्वारस्य असेल, हे मला माहिती नव्हते.”

पायरो बोलला, “मुख्य इन्स्पेक्टर जापने मी तुझ्याबरोबर या केसमध्ये काम करणार असल्याचे तुला काही सांगितले का?”

हर्नने मान डोलावली. “तो म्हणाला, तुम्ही काही कामासाठी इथे येणार आहात आणि मला तुम्ही ही समस्या सोडवायला मदत कराल. पण आता ही समस्या सुटली आहे आणि त्यामुळे मला तुमच्या मदतीची गरज नाही. मला वाटते, तुम्ही तुमच्या कामात मग्न असाल.”

पायरो म्हणाला, “माझे काम मी नंतर करू शकतो. पण या मुलीच्या अपहरणाच्या केसमध्ये मला रुची आहे. तुम्ही त्याला समस्या म्हणता आणि ती आता सुटल्याचे म्हणता. पण अजूनही समस्या असल्याचे दिसते.”

“ठीक आहे, सर. मुलगी तर परत मिळाली आहे. तिला काहीही झालेले नाही. हीच मुख्य गोष्ट आहे.”

“पण तुम्हाला ती कशी परत मिळाली, यामुळे समस्या सुटत नाही, नाही का? ती स्वतः काय म्हणते? डॉक्टरने तिला तपासले नाही का? ते काय म्हणाले?

“ते म्हणाले तिने मादक द्रव्य घेतले आहे. ती अजूनही त्याच्या अंमलाखाली आहे. क्रँचेस्टरहून निघाल्यापासून कायकाय झाले, हे सांगण्याच्या मनस्थितीत ती सध्या नाही. नंतरच्या सर्व घटना पुसल्या गेल्या आहेत. डॉक्टरना वाटते आहे, ती तात्पुरती बेशुद्ध आहे किंवा फार गोंधळलेली आहे. तिच्या डोक्याच्या मागे जखम आहे. त्यामुळे तिला स्मृतीभ्रंश झाला आहे.”

पायरो बोलला, “हे एखाद्याला फार सोयीस्कर आहे.”

इन्स्पेक्टर हर्न संशयाने म्हणाला, “सर, तुम्हाला हे खरे वाटत नाही का?”

“तुम्हाला वाटते का?”

“नाही. मला तसे वाटत नाही. ती चांगली मुलगी आहे --- वयाने जरा लहान आहे.”

मान हलवत पायरो म्हणाला, “नाही. ती नाटक करत नसावी. पण ती गाडीबाहेर कशी गेली, हे मला जाणून घ्यायचे आहे. त्यासाठी कोण जबाबदार आहे --- आणि का?”

“का याचे उत्तर मी असे देईन, की तो अपहरणाचा प्रयत्न होता. त्यांनी तिला सोडण्यासाठी पैशांची मागणी केली असावी.”

“नाही तसे काही झाले नाही.”

“तिच्या रडण्याने व स्वभावाने ते चिडले असावेत. त्यामुळे त्यांनी तिला झटपट रस्त्याच्या कडेला सोडून दिले असावे.”

पायरोने संशयाने विचारले, “क्रँचेस्टरच्या चर्चच्या कॅनॉनकडून त्याना काय खंडणी मिळणार होती? इंग्लिश चर्चचे प्रमुख लोक काही लखपती नाहीत”.

गुप्तहेर इन्स्पेक्टर हर्न आनंदाने म्हणाला, “माझ्या मते, या पूर्ण गोष्टीकडे तुम्ही निष्काळजीपणे बघा.”

“आहा, हे तुझे मत झाले.”

त्याचा चेहरा लाल होत, हर्न बोलला, “सर, तुमचे काय?”

“मला हे जाणून घ्यायचे आहे, की ती गाडीतून बाहेर कशी गेली?”

त्या पोलिसाचा चेहरा काळा पडला. “तेच खरे गूढ आहे. एका मिनिटापूर्वी ती खायच्या डब्यात इतर मुलींशी गप्पा मारत बसलेली होती आणि पाच मिनिटात, ती नाहीशी झाली --- अक्षरशः क्षणार्धात --- जणू काही जादू झाली.”

"खरोखर, जणू काही जादू झाली. मिस पोपने राखून ठेवलेल्या त्या डब्यात अजून कोणकोण होते?"

इन्स्पेक्टर हर्नने मान हलवली. "सर, हा चांगला मुद्दा आहे. महत्वाचा आहे. तो विशेष महत्वाचा आहे, कारण तो गाडीचा शेवटचा डबा होता. सर्व लोक खायच्या डब्यातून परत आले की डब्यांमधील दारे कुलुपबंद होतात --- खरे तर हे खायच्या डब्यात गर्दी होऊ नये, म्हणून असते आणि जेवण व चहा यामध्ये त्यांना आवराआवरी करायला मिळावी म्हणून असते. विनी किंग इतर मुलींबरोबर तिच्या डब्याशी आली. त्यांचे राखून ठेवलेले तीन डबे होते."

"आणि गाडीचे इतर डबे?

हर्नने त्याची डायरी काढली.

"मिस जॉर्डन आणि मिस बटर्स --- दोन मध्यमवयीन लग्न न झालेल्या, स्विझर्लंडला जाणाऱ्या स्त्रिया --- त्यात काही चुकीचे नाही. त्या जिथून आल्या त्या हँपशायरमध्ये त्या मोठा मान असलेल्या व प्रसिद्ध आहेत. दोन व्यापारी प्रवासी, एक लयॉन्सचा व दुसरा पॅरीसचा. दोघेही सभ्य व मध्यमवयीन. जेम्स इलीयट नावाचा तरुण व त्याची बायको --- ती चांगली गुबगुबीत होती. काही नको त्या व्यवहारात गुंतलेला संशयित असा तो, वाईट

कीर्तीचा व पोलिसांना हवा असलेला --- पण कधी कुणाचे अपहरण न केलेला. पण त्याच्या डब्याची तपासणी केली गेली. तो कशात अडकलेला नाही हे दाखवण्यासाठी, त्याच्या हातातील सामानात काही सापडले नाही. ते तसे कसे काय झाले कुणास ठाऊक! आणखी इतर प्रवासी म्हणजे फक्त एक पॅरीसला निघालेली, मिसेस व्हॅन सुयडर नावाची अमेरिकन स्त्री होती. तिच्याबद्दल काही माहिती नाही. ती ठीक वाटत होती. एवढेच लोक होते.”

पायरो बोलला, “हे नक्की होते का, की अमिएन्सनंतर गाडी कुठे थांबली नाही?”

“अगदी खात्रीने. एकदा ती हळू झाली, पण कुणी उडी मारून बाहेर पडण्याइतकी नाही. असे कुणी केल्यास तो चांगलाच जखमी झाला असता किंवा मेलाही असता.”

पायरो पुटपुटला, “त्यामुळेच तर ही समस्या जास्त रुचीपूर्ण झाली आहे. शाळेत जाणारी मुलगी अमिएन्सबाहेर हवेत विरून जाते व मग हवेतून परत तिथे दृष्यायमान होते. मधल्या वेळात, ती कुठे असते?”

इन्स्पेक्टर हर्नने डोके हलवले.

”हे वेड्यासारखे आहे. ओहो, तसेही मला समजले, की तुम्ही त्या मुलीच्या बुटांबद्दल काही विचारत होतात. ती सापडली तेव्हा तिच्या पायात व्यवस्थित बूट होते. पण रेल्वे रुळांवरदेखील एक बुटांची जोडी सिग्नल देणाऱ्या माणसाला सापडली. ते चांगल्या स्थितीत असल्याने , तो घरी घेऊन गेला. दणकट काळे बूट!”

पायरो समाधानाने बोलला, “आहा!”

इन्स्पेक्टर हर्न उत्सुकतेने बोलला, “मला या बुटांचे काही कळत नाही. त्यांचा काही वेगळा अर्थ आहे का?”

पायरो म्हणाला, “ते एक उपपत्ती सिद्ध करतात, जादू कशी केली गेली.”

## चार

मिस पोपची न्युइली येथील शाळा इतर शाळांसारखीच होती. पायरो त्या इमारतीच्या पुढील भागाकडे बघत असतांना, एकदम मुलींचा घोळका तेथील गेटमधून बाहेर पडला.

त्याने त्या पंचवीस असल्याचे मोजले. गडद निळा कोट व स्कर्ट घातलेल्या आणि आरामशीर न दिसणाऱ्या निळ्या ब्रिटीश टोप्या डोक्यावर असलेल्या अशा त्यांच्या टोपीभोवती, मिस पोपच्या आवडीचा गडद जांभळ्या व सोनेरी रंगाचा पट्टा

आवळलेला होता. त्या चौदा ते अठरा वयाच्या होत्या. काही जाड तर काही बारीक होत्या. काही गोऱ्या तर काही काळ्या होत्या. काही लाजऱ्या तर काही डौलदार होत्या. शेवटी एका तरुण मुलीबरोबर करड्या केसांची, खोचक अशी बाई चालली होती. ती मिस बरशॉ असल्याचे पायरोने ताडले.

पायरो त्यांच्याकडे एक मिनिट बघत राहिला मग त्याने घंटी वाजवली आणि मिस पोपला भेटायचे असल्याचे सांगितले.

मिस लव्हीनिया पोप तिच्या कनिष्ठ पदावर असलेल्या मिस बरशॉपेक्षा अगदी वेगळी होती. मिस पोपला तिचे असे व्यक्तिमत्व होते. मिस पोप आश्चर्यकारक रीत्या चालना देणारी होती. पालकांपुढेही ती डौलदारपणे ताठ उभी राही. सर्व जगात श्रेष्ठ असल्याची भावना ती राखून होती. एखाद्या शाळाशिक्षिकेसाठी हा फार मोठा ठेवा होता. तिचे करडे केस उठून दिसत होते. तिचे कपडे कडक फॅशनेबल होते. ती जाणकार व पुरेशी क्षमता असलेली होती.

ज्या खोलीत तिने पायरोचे स्वागत केले, ती एका सुसंस्कृत स्त्रीची खोली होती. त्यात छान फर्निचर, फुले, काही तसबिरी व काही तिच्या नावाजलेल्या विद्यार्थ्यांच्या सहीचे फोटो होते --- त्यातील बरेच जण पदवी किंवा तत्सम काही पुरस्कार घेण्याचा

गाउनमध्ये व मानचिन्हांसकट होते. भिंतींवर जगातील गाजलेली कलात्मक चित्रे होती आणि काही रंगवलेली चित्रे होती. सर्व जागा एकदम स्वच्छ आणि चकचकीत होती. धुळीचा कण नाही. जणू काही असल्या पवित्र स्थळी धुळीला येणे प्रशस्त वाटत नसावे.

मिस पोपने कधी अंदाज न चुकणाऱ्या, मोठ्या आत्मविश्वासाने पायरोचे स्वागत केले.

"मिस्टर हर्क्युल पायरो? अर्थात, मला तुमचे नाव माहिती आहे. मला वाटते, तुम्ही त्या दुर्दैवी मुलीच्या, विनी किंगच्या बाबतीत काही चौकशी करायला आलेले असणार. ती फार दुःखद घटना आहे."

मिस पोप दुःखी दिसत नव्हती. तिने ते जसे घ्यायला पहिजे तसे घेतलेले दिसले. त्या दुःखाबरोबर ती तिच्यातील मोठ्या क्षमतेने लढून ते नगण्य असल्याचे भासवीत होती. ती म्हणाली, "अशी गोष्ट यापूर्वी झाली नाही." ती हे अशा डौलात म्हणाली, की जणू तिला म्हणायचे होते, "आणि परत कधी होणार नाही."

पायरो म्हणाला, "या मुलीची इथे पहिली सहामाही होती, नाही का?"

"हो."

“तुम्ही विनी व तिच्या पालकांची प्राथमिक मुलाखत घेतली असेल, बरोबर?”

“अलीकडे नाही. दोन वर्षांपूर्वी. मी क्रँचेस्टरजवळ बिशपकडे रहात होते.” खरे तर --- तिचे हावभाव दर्शवत होते, [ “कृपया, इकडे लक्ष द्या. मी बिशपबरोबर रहाणारी व्यक्ती आहे.” ] “मी तिथे असताना, मी तिच्या आई वडिलांशी ओळख करून घेतली. मिस्टर किंग अपंग आहेत. ती फार चांगल्या तऱ्हेने वाढवलेली, कलात्मक दृष्टीकोन अंगी बाणवलेली मुलगी आहे. मी मिसेस किंगला म्हटले की जेव्हा तिचा सर्वसामान्य अभ्यासक्रम पूर्ण होईल, तेव्हा एक दोन वर्षात मी तिला आमच्या शाळेत घेते. मिस्टर पायरो, आम्ही इथे कला आणि संगीताचे विशेष शिक्षण देतो. मुलींना नृत्यनाट्य बघायला, फ्रेंच प्रहसने बघायला घेऊन जातो. त्यांचा रिकामा वेळ त्या लूव्र येथे भाषण ऐकण्यासाठी देऊ शकतात. इथे संगीतातील, चित्रकलेतील मोठी नामांकित मंडळी काही शिकवण्यासाठी येतात. विस्तारित दृष्टिकोनावर आमचा भर असतो.”

मिस पोपला अचानक आठवले, की मिस्टर पायरो काही पालक नाहीत. त्यामुळे ती मध्येच बोलली, “मिस्टर पायरो, मी तुमच्यासाठी काय करू शकते?”

“मला हे जाणून घ्यायला आवडेल की, आता विनी कशी आहे?”

“कॅनॉन किंग अमिएन्सहून इथे आले होते. ते विनीला त्यांच्याबरोबर घरी घेऊन जाणार आहेत. त्या मुलीला जो धक्का बसला असेल, त्यानंतर ते शहाणपणाचे ठरेल. आम्ही इथे नाजूक मुलींना घेत नाही. आमच्याकडे अपंग मुलींच्या देखरेखीसाठी विशेष व्यवस्था नाही. मी तिच्या वडिलांना तिला घरी घेऊन जाण्याची परवानगी दिली.

पायरोने थंडपणे विचारले, “मिस पोप, तुमच्या मते नक्की काय झाले?”

“मिस्टर पायरो, मला काहीही माहिती नाही. मला सांगण्यात आलेली माहिती अविश्वसनीय वाटते. मला हे समजत नाही, की माझ्या शाळेतील त्या बाबतीत जबाबदार असलेल्या शिक्षिकेला दोष द्यावा --- फक्त कदाचित तिला मुलगी नाहीशी झाल्याचे लगेच लक्षात यायला हवे होते.”

पायरो म्हणाला, “कदाचित तुमच्याकडे पोलीस येऊन गेले असतील का?”

मिस पोपच्या खानदानी अंगावर एक शहारा उमटून गेला. ती थंडपणे बोलली, “मी या प्रकरणावर काही प्रकाश टाकू शकते का,

हे विचारण्यासाठी मला मिस्टर लेफार्ग नावाच्या या भागातील इन्स्पेक्टरचा फोन आला होता. इतर मुलींबरोबर इथे आलेली विनीची बॅग तपासायची परवानगी त्यांनी मागितली. मी त्यांना सांगितले, की ती आधीच पोलिसांकडून तपासली गेली आहे. मला वाटते, त्याच्या विभागांमध्ये सुसूत्रता नसावी. नंतर काही दिवसात मला परत फोन आला. ते म्हणत होते, की तुम्ही विनीच्या ताब्यातील सर्व वस्तू आम्हाला दाखवल्या नाही. मी त्यांच्यावर फारच चिडले. सरकारकडून असा त्रास होणे मला अपेक्षित नव्हते.''

एक दीर्घ श्वास घेऊन पायरो म्हणाला, ''तुमचा स्वभाव उत्साही आहे. त्याबद्दल मी तुमचे कौतुक करतो. मी असे गृहीत धरतो, की विनी परत आल्यावर तिची बॅग पूर्ण रिकामी करून बघितली गेली असेल, नाही का?''

मिस पोपचा चेहरा थोडा विरोध दर्शवणारा वाटला.

ती म्हणाली, ''रोजचे काम! आमचे आयुष्य रोजच्या कामाने कडकपणे बांधलेले असते. मुली आल्यावर त्यांच्या बॅगा रिकाम्या करुन, त्यातील सामान जिथे ठेवायचे, तिथे ठेवले गेले. विनीचे सामनाही इतर मुलींबरोबर जागेवर ठेवले गेले. अर्थात परत तिची

बॅग होती तशी भरली गेली व ती आली तेव्हा ती जशी होती, त्या अवस्थेत तपासणीसाठी दिली गेली.”

पायरो म्हणाला, “बरोबर होती तशी?” त्याची नजर भिंतीवरून फिरली. “नक्कीच हे लांबवरून दिसणारे चर्चबरोबरचे क्रँचेस्टर पुलाचे चित्र असणार.”

“तुमचे बरोबर आहे. मिस्टर पायरो, विनीने ते चित्र मला आश्चर्यचकित करायला दिले होते. ते तिच्या बॅगेत झाकलेले होते आणि त्यावर असे लिहिलेले होतेः ‘मिस पोपसाठी विनीकडून’ त्या मुलीचा हा फार गोड स्वभाव होता.”

पायरो बोलला, “आणि एक चित्र म्हणून ते तुम्हाला कसे वाटले?”

त्याने स्वतः क्रँचेस्टर पुलाची अनेक चित्रे पाहिलेली होती. कलादालनात असली चित्रे नेहमी बघायला मिळत --- कधीकधी तैलरंगात तर कधीकधी पाण्याच्या रंगात! त्याने उत्तम, मध्यम व वाईट अशी चित्रे पाहिलेली होती. पण हे आताचे चित्र फारच नैसर्गिक रीत्या काढलेले होते.

मिस पोप उदारपणे हसत होती. ती म्हणाली, “एखाद्याने स्वतःच्या विद्यार्थिनीला नाराज करू नये. अर्थात तिला उत्तेजन दिल्यास, ती अजून चांगले काम करू शकेल.”

पायरो विचारपूर्वक बोलला, "तिच्यासाठी हे पाण्याच्या रंगाने रंगवणे खूपच नैसर्गिक होते, नाही का?"

"हो. मला माहिती नव्हते, की ती ते तैलरंगात रंगवण्याचा प्रयत्न करणार होती."

पायरो म्हणाला, "ओहो, बाईसाहेब, तुम्ही मला परवानगी द्याल?"

त्याने ते चित्र उघडून खिडकीजवळ नेले व तपासले. मग वर बघत तो म्हणाला, "बाईसाहेब, तुम्ही मला हे चित्र नेण्याची परवानगी द्याल का?"

"ठीक आहे, खरे तर मिस्टर पायरो --- "

"तुम्ही असे म्हणू शकणार नाही की ते तुमच्या फार जवळचे आहे. हे चित्र नैतिक अधःपतन करणारे आहे."

"हो. यात कलात्मकता नाही. पण हे विद्यार्थिनीने काढलेले आहे आणि --- "

"बाईसाहेब, मी तुम्हाला खात्री देतो, की इथे तुमच्या भिंतीवर टांगून ठेवण्यासाठी, ते योग्य नाही."

"मिस्टर पायरो, तुम्ही असे का म्हणता, मला समजत नाही."

"मी तुम्हाला लगेच ते सिद्ध करून दाखवतो."

त्याने खिशातून एक बाटली, काही चिंध्या आणि स्पंज काढला. तो बोलला, "मी तुम्हाला प्रथम एक लहानशी गोष्ट सांगणार आहे. बाई साहेब एका कुरूप बदकाचे रुपांतर हंसात होते, या गोष्टीशी तिचे साम्य असेल." हे बोलत असतांना तो काम करत होता. टरपेन्टाइनचा वास खोलीभर दरवळला.

"एखाद्या घटनेशी किंवा वस्तूशी संबंधित अशा नाचगाण्याच्या कार्यक्रमाला तुम्ही फारशा जात नसाल, नाही का?"

"नाही. असले कार्यक्रम मला फालतू वाटतात --- "

"फालतू. हो. पण कधीकधी ते काही सुचवणारे असतात. मी एक असा छान कार्यक्रम पाहिला आहे. त्यात त्या कलाकाराने नवलपूर्ण रीतीने तिचे व्यक्तिमत्व बदलले होते. एका चित्रात ती सुंदर, नाजूक झगमगाटी अशी कॅबरे नर्तिका होती ते दहा मिनिटानंतरच्या दुसऱ्या फटकाऱ्यात तिने स्वतःला फिकुटलेली, गालगुंड झालेली व बिनहाताचे कपडे घातलेली अशा चित्रात दाखवले. अजून दहा मिनिटांनी ती चिंध्या पांघरलेली, तांड्यामध्ये भविष्य सांगणारी जिप्सी झाली."

"शक्य आहे. काही संशय नाही. पण मला असे दिसते आहे --- "

पण मी तुम्हाला दाखवतो, की गाडीत कशी जादू झाली. शाळेत जाणारी विनी तिची छानशी वेणी, चष्मा, तिला कुरूप बनवणारी दातातील तार, यासकट स्वच्छतागृहात जाते. तिथून ती शाळेच्या गणवेषावरून खांद्यावरून बंद असणारे रेशमी पायघोळ गाउनसारखे वस्त्र घालून व उंच टाचांचे बूट घालून, इन्स्पेक्टर हर्नच्या भाषेत ‘गुबगुबीत गाठोडे’ बनून, पाऊण तासाने बाहेर पडते. वर मिंक कोट असतो. तिच्या कुरळ्या केसांवर छोटीशी मखमली टोपी असते. आणि हो, चेहरा पावडर, लाली, लिपस्टिक व मस्कारा लावून, पूर्णपणे वेगळा दिसत असतो. खरा चेहरा कसा असतो देव जाणे! बाईसाहेब, तुम्हाला माहिती असेल, की एखादी शाळेत जाणारी मुलगी चमत्कार व्हावा, अशा तऱ्हेने आकर्षक आणि फॅशनेबल अशी उच्च स्तरातील तरूण स्त्री भासते.”

मिस पोपचा आ वासलेला राहिला. “म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की विनी वेषांतर करून --- “

“विनी किंग नव्हे --- नाही. विनीला लंडनच्या रस्त्यावर पळवून नेले गेले. बेमालूम वेषांतर केलेल्या कलाकार मुलीने तिची जागा घेतली. मिस बरशॉने विनीला पाहिलेले नसते. छानशी वेणी, चष्मा व तिला कुरूप बनवणारी दातातील तार, घातलेली विनी ती नव्हतीच, हे मिस बरशॉला कसे समजणार? इतके झाले ते झाले.

पण तुम्हाला खऱ्या विनीची ओळख करून दिल्यावर इथे फसव्या लबाड माणसाला येण्याचे काय कारण होते? पण विनी स्वच्छतागृहातून घाईघाईने जिम इलियट नावाच्या माणसाची बायको म्हणून बाहेर येते. त्याच्या पासपोर्टवर बायकोला प्रवासाची परवानगी असते. छानशी वेणी, चष्मा, मोजे घातलेली व दातात तार, घातलेली विनी --- ती हवेत विरून गेली. पण जाड बेढब बूट आणि टोपी --- ती कडक ब्रिटीश टोपी --- कुठेतरी टाकून द्यायला हवी होती. त्या वस्तू खिडकीतून टाकून दिल्या जातात. नंतर खऱ्या विनीला खाडी ओलांडून आणले जाते. कोणालाच आजारी, मादक द्रव्य घेतलेली, मुलगी इंग्लंडहून फ्रान्सला आली आहे, हे कळत नाही. ती मुख्य रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या मोटारीत बसून, निघून जाते. जर ती मादक द्रव्याच्या अंमलाखाली असेल, तर तिला तिच्या बाबतीत काय घडले आहे, हे काही आठवणार नाही.”

मिस पोप पायरोकडे रोखून बघत होती. तिने मागणी केली, “पण का? असे भावनारहित ढोंग करायचे कारण काय?”

पायरोने थंडपणे उत्तर दिले, “विनीचे सामान! या लोकांना इंग्लंडहून फ्रान्सला काही नको ते सामान गुप्तपणे न्यायचे होते. ते असे सामान होते की ते कस्टममध्ये पकडले गेले असते. खरे तर

चोरलेले सामान! शाळेत जाणाऱ्या मुलीच्या बॅगपेक्षा अधिक सुरक्षित काय असू शकते? मिस पोप, तुम्हाला चांगले माहिती आहे की, तुमच्या शाळेचे नाव खूप चांगले आहे. मुलीच्या अपहरणानंतर मुलीचे सामान खोट्या तऱ्हेने पण खरे भासवत, योग्य जागी पाठवण्याव्यतिरिक्त अजून नैसर्गिक काय असू शकत होते?"

पायरो हसला. "पण नशीबाने, शाळेचा असा नियम होता की गावाहून परतलेल्या मुलींच्या बॅगा तपासायच्या. आणि विनीकडून तुम्हाला मिळालेली भेट --- ती विनीने क्रँचेस्टरला बांधलेली भेट नसते."

तो तिच्याजवळ आला. "तुम्ही ही भेट मला दिली आहे. आता निरीक्षण करा. तुम्हाला कबूल करावे लागेल, की तुमच्या चांगल्या शाळेसाठी ती योग्य नाही!"

त्याने चित्राचे बंधन सोडवले. जणू काही जादूने क्रँचेस्टरचा पूल नाहीसा झाला व त्याऐवजी तिथे उच्च प्रतीचे फिकट रंगातले दृष्य अवतरले.

पायरो मृदुपणे म्हणाला, "हिप्पोलिटाचा कंबरपट्टा. हिप्पोलिटा हर्क्युलसला तो कंबरपट्टा देते आहे. त्या कंबरपट्ट्यावर रुबेनचे चित्र आहे. मोठी अफलातून कलाकारी! तथापि तुमच्या शाळेच्या खोलीला योग्य नाही."

मिस पोप थोडीशी लाजली.

हिप्पोलिटाचा हात तिच्या कंबरपट्ट्यावर होता. तिच्या अंगात अजून काहीही नव्हते --- हर्क्युलसच्या एका खांद्यावर सिंहाचे कातडे हलकेच पांघरलेले होते. रुबेनची लकाकी उच्च दर्जाची व लैंगिक दृष्ट्या आकर्षक होती ---

मिस पोपने तिचा डौलदार स्थिरपणा परत आणत म्हटले, "किती छान कलाकुसर --- पण तरीही तुम्ही म्हणता त्याप्रमाणे --- शेवटी पालकांच्या संशयी स्वभावाचा विचार केला गेला पाहिजे. त्यातील काहीजण कोत्या मनाचे असतात --- मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला समजले असेल --- "

## पाच

पायरो शाळा सोडत असतांना, अचानक हल्ला झाला. त्याला घेरले गेले, व त्याला बाहेर पडता येईना. त्याला काळ्या, गोऱ्या, जाड्या, बारीक मुलींनी, भावनेने भारलेल्या मुलींनी घेरले होते.

पायरो पुटपुटला, अरे देवा, हा खरोखर हा लढवय्या स्त्रियांचा हल्ला आहे."

एक उंच गोरी मुलगी ओरडत होती, "सगळीकडे अफवा पसरली आहे –-- "

त्या अजून जवळ आल्या. त्यांनी पायरोला घेरून टाकले. तो जोराच्या तरुण स्त्रीलाटेमध्ये दिसेनासा झाला. वेगवेगळ्या पट्टीतील पंचवीस आवाज उसळले. पण सगळ्याजणी एकच महत्वाचे वाक्य ओरडत होत्या. “मिस्टर पायरो, तुम्ही माझ्या डायरीत सही कराल का? --- “

THE FLOCK OF GERYON

# गेरयॉनचा कळप



***[ गेरयॉन म्हणजे ग्रीक पुराणातील हर्क्युलसने मारलेला तीन डोकी असलेला राक्षस. ]***

## एक

"मिस्टर पायरो, मी असे मध्येच येऊन तुम्हाला त्रास दिल्याबद्दल माफी मागते."

मिस कारनॅबायने अस्वस्थपणे तिच्या हातातील बॅगेभोवती विळखा घालत व पुढे झुकत, उत्सुकतेने पायरोच्या चेहऱ्याकडे पाहिले. नेहमीप्रमाणे ती दमलेली वाटत होती.

हर्क्युल पायरोच्या भुवया उंचावल्या गेल्या.

ती काळजीने बोलली,

“तुम्ही मला ओळखता, नाही का?”

हर्क्युल पायरोने डोळे मिचकावले. तो म्हणाला,

“मी तुम्हाला मी पकडलेली सर्वात यशस्वी गुन्हेगार म्हणून ओळखतो. ”ओहो, प्रिय मिस्टर पायरो, तुम्ही अशा गोष्टी बोलल्याच पाहिजेत का? तुम्ही माझ्यावर इतकी दया दाखवलीत. एमिली आणि मी नेहमी तुमच्याबद्दल बोलतो. आणि आम्ही तुमच्याविषयी काही वर्तमानपत्रात वाचले, तर ते कापून एका वहीत चिकटवून ठेवतो. ऑगस्टसला, आमच्या कुत्र्याला आम्ही एक नवीन युक्ती शिकवली आहे. आम्ही म्हणतो,

‘शेरलॉक होम्ससाठी मरा, मिस्टर फॉरच्युनसाठी मरा, सर हेन्री मेरीव्हेल साठी मरा आणि मिस्टर हर्क्युल पायरोसाठी मरा. मग तो खाली जाऊन एखाद्या लाकडाच्या ओंडक्यासारखा पडून रहातो. आम्ही काही शब्द उच्चारेपर्यंत तो हालचाल न करता तसाच स्थिर रहातो.”

पायरो बोलला, “मी समाधान पावलो. आणि तुझा आवडता ऑगस्टस काय म्हणतो आहे?”

मिस कारनॅबायने तिचे हात गुंफले व तिने मांडीवर घेतलेल्या छोट्या कुत्र्याची स्पष्टपणे स्तुती करू लागली.

“ओहो, मिस्टर पायरो, तो फार हुशार आहे. त्याला सर्व काही माहिती आहे. मी परवा पाळण्यातील एका बाळाचे कौतुक करत होते. अचानक मला हिसका बसला आणि तो मला ओढून कुठेतरी नेण्याच्या प्रयत्नातील ऑगस्टस होता. ही त्याची हुशारी नव्हती का?”

पायरोने डोळे मिचकावले व बोलला,

“आपण आता गुन्हेगारी प्रवृत्तीबद्दल बोलत होतो, तीच ऑगस्टस जणू दाखवत होता, असे मला वाटले.”

मिस कारनॅबाय हसली नाही. तर तिच्या फुगीर चेहऱ्यावर काळजी व उदासी दिसू लागली. ती एक प्रकारे धापा टाकत म्हणाली,

“ओहो मिस्टर पायरो, मी इतकी काळजीत आहे.”

पायरो दयाळूपणे बोलला,

“कसली काळजी?”

"तुम्हाला माहिती आहे का, मी घाबरते --- खरेच घाबरते --- की मी नक्कीच पक्की गुन्हेगार असले पाहिजे --- जर हा शब्द बरोबर असेल तर. माझ्या मनात कल्पना येतात."

"कुठल्या प्रकारच्या कल्पना?"

"अगदी असामान्य अशा कल्पना. उदाहरणार्थ, काल खरेच पोस्ट कार्यालय लुबाडायची एक फार व्यवहार्य योजना माझ्या डोक्यात आली. मी त्याचा विचार करत नव्हते --- ती अशीच आपली डोक्यात आली. आणि दुसरी कस्टमचे पैसे न भरता, सटकायची फार शोधक स्वरूपाची कल्पना --- माझी खात्री पटली --- पूर्णपणे खात्री पटली --- की ती नक्की यशस्वी होईल."

पायरो कोरडेपणे म्हणाला, "ती कदाचित होईलही. तुझ्या कल्पना धोकादायक आहेत."

"मिस्टर पायरो, त्या मला काळजीत पाडतात. मी जर या कल्पना, कडक तत्वे पाळून अंमलात आणल्या, तर अशा खऱ्याखुऱ्या दुष्ट व कायद्याचे उल्लघन करणाऱ्या कल्पना माझ्या डोक्यात याव्यात, हे माझी चलबिचल वाढवते. मला वाटते, हा त्रास थोडेसे असे दर्शवतो, की मला सध्या भरपूर रिकामा वेळ आहे. मी हॉगिन बाईसाहेबांकडचे काम सोडले आहे आणि सध्या एका वयस्क बाईला वाचून दाखवण्याचे व रोज तिची पत्रे लिहिण्याचे

काम करते. पत्रे लगेच लिहून होतात व मी वाचायला सुरवात केली की ती झोपून जाते आणि मी नुसती बसून रहाते --- रिकाम्या मनाने --- आपल्याला माहिती आहे --- रिकामे मन सैतानाचे घर.”

पायरो म्हणाला, “हो. हो.”

अलीकडे मी एक पुस्तक वाचले --- जर्मनमधून भाषांतरीत केलेले खूप आधुनिक पुस्तक. ते गुन्हेगारी प्रवृत्तीवर रुचीपूर्ण प्रकाश टाकते. त्यामुळे, मला वाटते, प्रत्येकाने आपापल्या अंतःप्रवृत्तींचे उदात्तीकरण केले पाहिजे. आम्ही म्हणूनच तुमच्याकडे आलो आहोत.”

पायरो बोलला, “अस्स!”

“म्हणजे असे बघा मिस्टर पायरो, काही उत्तेजित अवस्थेसाठी तरसावे, तेवढा काही हा दुष्टपणा नाही. दुर्दैवाने माझे आयुष्य फार कंटाळवाणे व एकसुरी आहे. मला कधीकधी वाटते, की छोट्या कुत्र्याची मोहीम एवढेच खरे आयुष्य जगणे आहे. अर्थात फार नापसंतीदर्शक पण माझे पुस्तक म्हणते, त्याप्रमाणे कुणी सत्याकडे कधी पाठ फिरवू नये. मिस्टर पायरो, मी अशा समजुतीने तुमच्याकडे आले आहे, की माझ्या उत्तेजित अवस्थेसाठी तरसण्याचे देवदूतासारखे उदात्तीकरण व्हावे.”

पायरो म्हणाला, “हे म्हणजे तू स्वतःला देवदूताची मैत्रिण म्हणवण्यासारखे झाले, नाही का?”

मिस कारनॅबाय लाजली. ”हे मी माझ्या योग्यतेच्या मर्यादा फार ओलांडल्यासारखे होते आहे, हे मला समजते आहे. पण तुम्ही इतके दयाळू आहात --- ”

ती थांबली. तिचे निळे डोळे मालवले. त्यात कुत्र्याला फिरायला नेण्याच्या आशेला उद्देशून काही उत्तर होते. त्याविषयी काही तक्रार होती.

हर्क्युल पायरो हळू बोलला,

“एक कल्पना आहे.”

मिस कारनॅबायने स्पष्ट केले, “मी इतकी हुशार नाही. पण माझ्या भावना व विचार चांगले आहेत. ते असायलाच पाहिजेत --- नाहीतर मला त्या वयस्क बाईची सहकारी असण्याच्या नोकरीतून ताबडतोब डच्चू मिळेल. मला नेहमी असे आढळून आले आहे, की तुम्ही आहात त्यापेक्षा थोडे मूर्ख असलेले दाखवणे बरे असते.”

हर्क्युल पायरो हसला. तो म्हणाला,

“मिस, तुम्ही मला भूल घालता.”

“ओहो! माझ्या आवडत्या पायरो, तुम्ही किती दयाळू आहात. तुम्ही मला आशावादी रहायला प्रवृत्त करता, नाही का? असे झाले, की मला आताच वारसा हक्काने काही रक्कम मिळाली --- लहानशी रक्कम --- पण त्यामुळे मी आणि माझी बहीण, चांगल्या प्रकारे जगू शकतो. मी जो पगार मिळवते, त्यावरच फक्त माझा उदरनिर्वाह अवलंबून नाही.”

पायरो म्हणाला, “तुझ्या गुणांना पुरेसा वाव मिळेल असे काम, तुझ्यासाठी मला शोधायला हवे. तुला स्वतःला तशी काही कल्पना नसावी, बरोबर?”

मिस्टर पायरो, तुम्ही नक्की विचारपूर्वक वागणारे असणार. मी सध्या माझ्या एका मैत्रिणीच्या काळजीत आहे. त्याबद्दल मी तुमचा सल्ला घेणार आहे. अर्थात तुम्ही म्हणू शकता, की हे काहीतरी खूळ आहे, फक्त कल्पना! एखाद्याला कदाचित थोडे चढवून सांगायची व मनात आकृतीबंध तयार करायची सवय असते. तो निव्वळ योगायोग असू शकतो.”

“मिस कारनॅबाय, तुम्ही अतिशयोक्ती करत असाल, असे मला वाटत नाही. तुमच्या मनात काय आहे, ते मला सांगा.”

“ठीक आहे. माझा अगदी खूप जवळची मैत्रिण आहे. तरी अलीकडे अनेक वर्षात मी तिला भेटले नाही. तिचे नाव इमिली

क्लेग आहे. तिने उत्तर इंग्लंडमधील एका माणसाशी लग्न केले आणि काही वर्षांपूर्वी तो तिच्यासाठी भरपूर पैसे मागे ठेऊन वारला. त्याच्या मृत्यूनंतर ती एकाकी व दुःखी झाली. आता मला भीती वाटते, की ती थोडी मूर्ख व भोळसर बाई झाली आहे. मिस्टर पायरो, धर्म जगण्यासाठी खूप मदत करू शकतो. पण म्हणजे मला पुराणमतवादी धर्म म्हणायचे आहे."

पायरो बोलला, "म्हणजे तुला जुने ग्रीक चर्च म्हणायचे आहे का?"

मिस कारनॅबायला धक्का बसला.

"नाही. नाही. इंग्लंडचे चर्च. आणि मी रोमन कॅथॉलीकला फारसे पसंत करत नाही, तरी त्यांना मान्यता आहे. आणि जॉन वेस्लेपासूनचे लोक व प्रोटेस्टंट मंडळी --- ती सगळी प्रसिद्ध व निदान मान्यवर आहेत. मी जुन्या सनातन धर्माबद्दल बोलते आहे. तो असाच उगवला आहे. त्यांना भावनिक बंध आहे. पण कधीकधी मला फार मुलभूत प्रश्न पडतो, की त्यांच्यामागे खरेच काही धार्मिक भावना आहे तरी की नाही?"

"तुला असे म्हणायचे आहे का, की तुच्या मैत्रिणीला या लोकांनी फशी पाडले आहे?"

“हो. मला तसेच म्हणायचे आहे. ते स्वतःला मेंढ्यांचा कळप मानतात. त्यांचे मुख्य ठिकाण डेव्होन्शायर इथे रमणीय जागी समुद्राकाठी आहे. त्यांच्या पंथातले लोक तिथे ते ज्याला मनःशांती म्हणतात, त्यासाठी जातात. तो पंधरा दिवसांचा काळ असतो --- त्यात धार्मिक सेवा व विधी असतात. त्यांचे वर्षातून तीन मोठे सण असतात. कुरणाकडे येणे, पूर्ण कुरण आणि पीक कापणे.”

पायरो म्हणाला, “ते शेवटचे मूर्खपणाचे आहे. कारण कुरण कुणी कापत नाही.”

मिस कारनॅबाय मवाळपणे म्हणाली, “ते सर्वच मूर्खपणाचे आहे. कारण कुरण कुणी कापत नाही. हे सर्व चळवळीशी संबंधित आहे. त्यांचा मुख्य धनगर म्हणजे डॉ अँडरसन आहे. तो अलीकडील फार देखणा माणूस आहे, असे मी समजते.”

“त्याच्याकडे स्त्रिया आकर्षित होतात, बरोबर?”

मिस कारनॅबाय एक सुस्कारा टाकून म्हणाली, “ते तसे आहे व भीतीदायक आहे. माझे वडील फार देखणे होते. कधीकधी ते लहानशा गावातील चर्चमध्ये फार लाजीरवाणे वाटे. चर्चमधील धार्मिक मंडळींच्या पायघोळ झग्यावरील कलाकुसर करण्यावरून व कामाच्या वाटपावरून, टोकाचे मतभेद असत.”

तिने जुन्या गोष्टी आठवून, तिचे डोके हलवले.

“त्या गटातील सभासद बहुधा बायका असत का?”

“मला वाटते, निदान तीन चतुर्थांश तरी असत. तिथे असलेले पुरुष बहुधा चक्रम असतात. चळवळीचे यश त्यातील बायकांवर व त्यांच्याकडील पैशांवर अवलंबून असते.”

पायरो म्हणाला, “ओहो, आता आपण मुद्द्याकडे आलो. तू मोकळेपणे असा विचार करतेस, की ही सगळी निसरडी गोष्ट आहे?”

“मिस्टर पायरो, “मोकळेपणे सांगायचे, तर हो. आणि दुसरी एक गोष्ट मला काळजी उत्पन्न करते. मला हे माहिती आहे की माझी बिचारी मैत्रिण धर्मात इतकी बांधली गेली आहे, की तिने अलीकडे तिचे इच्छापत्र केले. त्यात तिने सर्व संपत्ती चळवळीसाठी दिली आहे.”

पायरो तीक्ष्णपणे म्हणाला,

“तसे तिला सुचवले गेले का?”

“नाही तसे काही नाही. ही सर्वस्वी तिची कल्पना होती. धर्मप्रमुखाने तिला जीवनाचा एक नवीन मार्ग दाखवला --- त्यामुळे तिच्या मरणानंतर तिचे सगळे धन चांगल्या कामासाठी वापरले जाणार होते. मला कसला त्रास होतो तर --- “

“हं, पुढे बोल.”

“भक्तगणांमध्ये खूप श्रीमंत बायका आहेत. मागील वर्षी त्यातील तिघी वारल्या.”

“त्यांनी त्यांची सगळी संपत्ती यासाठी दान केली का?”

“हो.”

“त्यांच्या नातेवाईकांनी काही तक्रार केली नाही का? मला असे वाटले, की त्यांनी काही कायदेशीर कारवाई केली असेल.”

“असे बघा मिस्टर पायरो, इथे सहसा एकाकी बायका येतात. त्यांना जवळचे कुणी नातेवाईक वा मित्र नसतात.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली. मिस कारनॅबायने चालू ठेवले,

“अर्थात मला काही सुचवण्याचा हक्क नाही. मला जितके शोधता आले, त्याप्रमाणे, त्या स्त्रियांच्या मरणाबद्दल काही वेडेवाकडे झालेले नव्हते. एकीला मला वाटते प्रथम फ्ल्यू आणि नंतर न्युमोनिया झाला होता. आणि दुसरीला अल्सर झाला होता. तिथे अजिबात काही संशयाचे वातावरण नव्हते. गिन हिल दवाखान्यात हे मृत्यू झाले नाहीत. तर घरीच झाले. मला काय म्हणायचे आहे, ते तुम्हाला कळले असेल. मला ते नैसर्गिक मृत्यु असल्याबद्दल काही शंका नाही. पण तरीही इमीला काही झालेले मला आवडणार नाही.”

तिने पायरोकडे बघत, हाताची घडी घातली.

पायरो काही वेळ गप्प होता. तो बोलला, तेव्हा त्याचा आवाज बदलला होता. तो खोल व गंभीर होता.

तो बोलला,

“अलीकडे वारलेल्या तेथील सभासदांची नावे व पत्ते तू मला देशील का?”

“हो, मिस्टर पायरो.”

पायरो हळू बोलला,

“अग मुली, मला वाटते, तुम्ही मैत्रिणी मोठ्या धीराच्या व पक्क्या निश्चयाच्या आहात. तुम्हाला अभिनयाचे अंग आहे. तुम्ही एक थोडे धोकादायक असे काम अंगावर घ्याल का?”

साहसी मिस कारनॅबी बोलली, “मला आवडेल.”

पायरो दरडावणी देत म्हणाला,

“त्यात धोका असून ते गंभीर आहे. तुला समजते आहे का --- ही गुंतागुंतीची गंभीर परिस्थिती आहे. त्यासाठी तुम्हाला त्या पंथाचे सभासद बनावे लागेल. मला वाटते, तुला अलीकडे वारसा हक्काने मिळालेले पैसे तू फुगवून सांगावेस. आता तू एक सुखवस्तू स्त्री आहेस आणि जीवनातील तुझे ध्येय काही पक्के नाही. तू तुझी

मैत्रिण इमिली हिच्याबरोबर तिने आपल्याशा केलेल्या या पंथाबद्दल वाद घाल --- तिची खात्री पटव, की हे सगळे भोंगळ आहे. ती तुला सभासद करून घ्यायला उत्सुक असेल. तू तिच्याबरोबर ग्रीन हिल्स संकुलामध्ये जा. तिथे तुम्ही तुम्हाला त्या पंथात ओढणाऱ्या डॉ अँडरसनसारख्या लोकांना तुमचे मन वळवण्याला बळी पडा. मला वाटते, मी निर्धास्तपणे हे काम तुमच्यावर सोपवू शकतो, नाही का?"

मिस कारनॅबाय नम्रपणे हसली व पुटपुटली,

"मी हे सहज नीटपणे करू शकेन."

## दोन

"छान, माझ्या मित्रा, तू माझ्यासाठी काय आणले आहेस?"

इन्स्पेक्टर जापने विचारपूर्वक त्या प्रश्न विचारणाऱ्या छोट्या माणसाकडे बघितले. तो खंत करत बोलला,

"पायरो, मला हे लोक मुळीच आवडत नाहीत. या लांब केसवाल्या धार्मिक लोकांचा मी विषासारखा द्वेष करतो. त्याने ते बायकांना भीती दाखवून घाबरवून सोडतात. पण हा मनुष्य काळजी घेणारा दिसतो आहे. इथे अटक करण्यासारखे काही नाही. सर्व काही थोडे वेड्यासारखे पण त्रासदायक नसलेले दिसते आहे."

“तुम्ही या डॉ अँडरसनबद्दल काही जाणून घेतले आहे का?”

“मी त्याचा मागील इतिहास वाचला. तो एक हुशार औषध दुकानदार होता. त्याला जर्मन विद्यापीठातून हाकलण्यात आले होते. त्याची आई बहुधा ज्यू होती. तो नेहमी पुराणकालीन दंतकथा व धार्मिक गोष्टींवर त्याचा रिकामा वेळ घालवत असे. आणि त्यविषयी त्याने काही लेख लिहिले होते --- त्यातील काही लेख मला चांगलेच मूर्खपणाचे वाटले.”

“त्यामुळे असे म्हणणे शक्य आहे का, की तो खरेच एककल्ली धर्मवेडा होता.”

“असे असण्याची शक्यता आहे.”

“मी तुला दिलेल्या नावे व पत्त्यांचे काय?”

“त्याचे अजून मी काही केले नाही. मिस इव्हेरीट्ट अल्सर व कोलायटीसने मेली. त्यात काही बेकायदेशीर नसल्याबद्दल डॉक्टर ठाम होते. मिसेस लॉइड श्वासनलीकेच्या न्युमोनियाने मेली. वेस्टन बाईसाहेब क्षयरोगाने मेल्या. या गटात सामील होण्याच्या आधीपासून तिला हा त्रास होता. मिस ली विषमज्वराने मेली. उत्तर इंग्लंडमध्ये तिने खाल्लेल्या सॅलडला तिने त्याबद्दल दोष दिला. त्यांच्यापैकी तिघी त्यांच्या स्वतःच्या घरात वारल्या आणि मिसेस लॉइड दक्षिण फ्रान्समधील एका हॉटेलमध्ये वारली. या सर्व

मरणांमध्ये अँडरसनच्या डेव्होन्शायर येथील जागेचा किंवा त्या गटाचा काही संबंध नव्हता. हा निव्वळ योगायोग होता. सर्व काही ठीक होते.”

हर्क्युल पायरोने सुस्कारा टाकला व तो बोलला,

“आणि तरीही माझ्या मित्रा, मला असे वाटते की हे हर्क्युलसचे दहावे साहस आहे. आणि हा डॉ अँडरसन राक्षस गेरयॉन आहे. त्याला संपवायचे माझे ध्येय आहे.”

जापने त्याच्याकडे काळजीपूर्वक पाहिले.

“पायरो, इकडे पहा. तू अलीकडे काही निरनिराळ्या, लेस्बियन, गे इत्यादी लिंगप्रकारांबद्दलचे साहित्य वाचले आहेस का?”

पायरो मान राखून बोलला,

“माझे शेरे नेहमी योग्य व बरोबर मुद्द्याला धरून असतात.”

जाप म्हणाला, “इकडे बघ. तू स्वतःच्या अशा एका नवीन विश्वासावर नवीन धर्म चालू करू शकतोस. हर्क्युल पायरोइतके हुशार कुणीच नाही आहे. असो. तू तो स्वीकारायला लोकाना परत परत प्रवृत्त करू शकतोस.

## तीन

मिस कारनॅबाय जोरात श्वासोच्छवास करत बोलली, “इथली शांतता मला आश्चर्यकारक वाटते.

इमिली क्लेग बोलली, “मी तुला तसे सांगितले होते, ॲमी.”

दोघी मैत्रिणी डोंगरउतारावर निळ्या छान समुद्राकडे बघत बसल्या होत्या. गवत हिरवेगार होते. जमीन व डोंगरकडा चमचमते तांबडे होते. आता ग्रीन हिल्स म्हणून ओळखली जाणारी शांत जागा सहा एकरांची होती. मुख्य भूमीला ही फक्त निमुळत्या जमिनीने जोडली गेली होती. म्हणजे ते जवळजवळ बेटच होते.

मिसेस क्लेग भावनापूर्णतेने गुणगुणलीः

“चमकती व प्रगतीशील --- लाल जमीन --- तिथे तिहेरी नशीब घडते आहे.”

मिस कारनॅबाय सुस्कारा टाकत म्हणालीः

“मला वाटते मागील रात्री देवाने हे खूप सुंदर जग निर्माण करुन ठेवले आहे.”

तिची मैत्रिण म्हणाली, “आजच्या रात्रीच्या सणासाठी थांब. कुरण पूर्ण फुललेले दिसेल.”

मिस कारनॅबाय बोलली, “मी त्याचीच वाट बघते आहे.”

तिच्या मैत्रिणीने तिला ठासून सांगितले, "तुला तो नवलपूर्ण अध्यात्मिक अनुभव येईल."

मिस कारनॅबाय एक आठवड्यापूर्वी ग्रीन हिल्स या जागी आली होती. इथे येतानाचा तिचा दृष्टीकोन असा होताः हे काय बेकार प्रकरण आहे! खरच इमी, तुझ्यासारखी विचारी स्त्री --- इत्यादी इत्यादी."

डॉ अँडरसनबरोबरच्या प्राथमिक मुलाखतीत, तिने तिच्या सद्सदविवेक बुद्धीला स्मरून, तिचा हेतू स्पष्ट केला.

"डॉ अँडरसन, मी इथे काही खोट्या कामाला आले आहे, असे तुम्हाला वाटत कामा नये. माझे वडील इंग्लंडच्या चर्चमध्ये काम करत असत. आणि मी माझा विश्वास कधी डळमळीत होऊ दिला नाही. माझ्या श्रद्धा काही वेगळ्या नाहीत."

सोनेरी केसांचा मोठा माणूस तिच्याकडे बघून हसला --- खूप सुंदर आणि समजूतदार हास्य! त्याने उदारपणे खुर्चीत बसलेल्या फुगीर गालांच्या, थोड्या आक्रमक आकृतीकडे पाहिले.

तो म्हणाला, "प्रिय मिस कारनॅबाय, तुम्ही मिसेस क्लेगच्या मैत्रीण आहात. त्यामुळे तुमचे स्वागत आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. आमची तत्वे, इतरांसारखी नाहीत. इथे सर्व धर्मांचे स्वागत आहे. सर्वांना सारखाच मान आहे."

थॉमस कारनॅबाय या अलीकडील धर्मगुरूची प्रामाणिक व कामसू मुलगी म्हणाली, “मग त्यांनी कुणाचा अनमान करू नये.”

त्याच्या खुर्चीत मागे वाकून, तो त्याच्या भारदस्त आवाजात म्हणाला,

“मिस कारनॅबाय, माझ्या वडीलांच्या इमारतीत खूप सदनिका आहेत, हे लक्षात ठेवा.”

ते तिथून निघाल्यावर मिस कारनॅबाय तिच्या मैत्रिणीच्या कानात पुटपुटली, “तो खरेच खूप देखणा मनुष्य आहे.”

इमिली क्लेग बोलली, “हो. आणि नवलपूर्णतेने अध्यात्मिकदेखील आहे.”

मिस कारनॅबायने कबूल केले. ते खरे होते. तिला ते जाणवले होते. त्याच्याभोवती अध्यात्मिकतेचे, या जगातले न भासणारे तेजोवलय होते –

तिने स्वतःला सावरले. ती इथे महान धर्मगुरूच्या आकर्षणात, अध्यात्मिक वा दुसरे कसले, वाहून जायला आलेली नव्हती. तिने हर्क्युल पायरोची दृष्टी आत्मसात केली. तो फार लांब आणि चौकसपणे तटस्थ भासत होता.

मिस कारनॅबाय स्वतःशी बोलली, ‘स्वतःवर ताबा ठेव. तुझा इथे येण्याचा उद्देश विसरू नकोस.”

पण जसजसे दिवस गेले, तसतसे, शांतता, साधेपणा, चविष्ट पण साधे जेवण, सेवाभावातील सुंदरता, प्रेमाची व प्रार्थनेची जादू, मानवतेचा परमोच्च संदेश देणारे धर्मगुरूचे साधे पण आतून हलवणारे शब्द, अशा ग्रीन हिल्सची तिला सहजपणे भुरळ पडते आहे, असे तिला आढळून आले.

--- इथे सर्व कुरूपता, राग, कडूपणा, दुमत सारे काही नष्ट झाले होते. इथे फक्त शांती आणि प्रेम होते.

आणि आज रात्री उन्हाळ्यातील कुरण बहरल्याचा मोठा उत्सव होता. या उत्सवात ॲमी कारनॅबाय उत्साहाने भाग घेत होती. त्या गटात सामावली गेली होती.

पांढऱ्या शुभ्र, चकचकीत, सिमेंटच्या इमारतीत तो उत्सव होता. पवित्र चर्चशी संबंधित लोकांनी त्याचे आयोजन केले होते. थोडेसे सूर्यास्तापूर्वी भक्तगण जमले. त्यांनी मेंढ्यांच्या कातडीचे कोट व पायात चपला घातल्या होत्या. त्यांचे हात भुंडे होते. मध्यभागी उभारलेल्या मंचावर सोनेरी केसवाला, निळे डोळे असलेला, छानशी दाढी ठेवलेला मोठा माणूस, डॉ अँडरसन त्याच्या देखण्या आकृतीसकट उभा होता. तो कधी नाही इतका आकर्षक दिसत होता. त्याने हिरवा झगा घातला होता आणि त्याने

हातात घनगराची काठी घेतली होती. त्याने त्याचा हात वर उचलला आणि सगळीकडे मरणप्राय शांतता पसरली.

“माझे भक्तगण कुठे आहेत?”

गर्दीमधून उत्तर आले,

“धर्मगुरू, आम्ही इथे आहोत.”

“तुमची मने आनंदाने व आभार प्रदर्शनाने भरून टाका. ही आनंदाची मेजवानी आहे.”

“या आनंदाच्या मेजवानीत आम्ही आनंदी आहोत.”

“आता इथे तुमच्यासाठी अजून दुःख असणार नाही. अजून वेदना नाहीत. सर्वत्र आनंद भरून राहिला आहे.”

“सर्व काही आनंदमय आहे --- “

“धर्मगुरूला किती डोकी आहेत?”

“तीन डोकी, एक सोन्याचे, एक चांदीचे व एक वाजणाऱ्या ब्रासचे.”

“भक्तगणांना किती अंगे आहेत?”

“तीन अंगे, एक मासाचे अंग, एक भ्रष्टाचाराचे अंग, आणि एक प्रकाशाचे अंग.”

“तुम्ही गटात सामावलेले कसे रहाल?

“रक्ताच्या धार्मिक विधीने.”

“तुम्ही त्या विधीसाठी तयार आहात का?”

“आम्ही तयार आहोत.”

“तुमचे डोळे बंद करा आणि तुमचा उजवा हात पुढे करा.”

गर्दीने आज्ञाधारकपणे त्या कारणासाठी दिलेल्या हिरव्या रुमालाने डोळे बंद केले. इतरांसारखाच मिस कारनॅबायने तिचा उजवा हात पुढे केला.

धर्मगुरू ओळींमधून फिरत होता. तिथे लहानसे रडण्याचे, दुःखाचे किंवा अती आनंदाचे आवाज येत होते.

मिस कारनॅबाय घाबरून स्वतःशी बोलली,

“हे सर्व खोटेपणाचे आहे. असल्या प्रकारचा धार्मिक उद्दीपनाच्या भावना प्रक्षोभाचा निषेध असो. मी पूर्णपणे शांत राहून, दुसऱ्या लोकांच्या प्रतिसादांचे निरीक्षण करेन. मी वहावत जाणार नाही --- मी अजिबात वहावत --- “

धर्मगुरू तिच्याजवळ आला. तिने तिचा हात घेऊन धरलेला पाहिला. सुई टोचल्यासारखी, तीक्ष्ण चावा घेतल्यासारखी वेदना तिला झाली. धर्मगुरू पुटपुटला,

“रक्ताच्या धार्मिक विधीने आनंद होतो --- “

तो पुढे गेला.

एक आज्ञा ऐकू आली.

“अज्ञानाचा पडदा दूर करून चैतन्याचा आनंद घ्या.”

नुकताच सूर्यास्त होत होता. मिस कारनॅबायने तिच्या आजूबाजूला पाहिले. तिला एकाएकी हवेत तरंगल्यासारखे आनंदी वाटू लागले. ती एका मऊ, हिरवळीच्या तटावर विसावली. तिला आपण एकाकी, दूर लोटलेली मध्यमवयीन स्त्री असल्यासारखे का वाटू लागले? आयुष्य नवलपूर्ण होते --- ती स्वतःदेखील नवलपूर्ण होती. तिच्यात विचारांचे --- स्वप्ने बघण्याचे --- सामर्थ्य आले. तिला अशक्य असे काहीही नव्हते!

ती फार उद्दीपित झाली. तिने तिच्याभोवती तिचे सहकारी भक्तगण पाहिले. अचानक ते तिला खूप उंच झाल्यासारखे वाटले.

मिस कारनॅबाय स्वतःशी बोलली, “झाडे चालल्यासारखे वाटते आहे --- “

तिने हात उचलला. हे तिने मुद्दाम केले --- असे करून तिला पृथ्वीला आज्ञा देता आली असती. सीझर, नेपोलिअन, हिटलर हे तर गरीब बिचारे, गोंधळलेले, छानसे लोक होते. ॲमी कारनॅबाय काय करू शकते, हे त्याना माहिती नव्हते. उद्या ती जागतिक शांततेसाठी व आंतरराष्ट्रीय बंधुप्रेमासाठी खूप काही करू शकते.

आता पृथ्वीवर लढाया नसतील, गरिबी नसेल व रोगराईदेखील नसेल. ॲमी कारनॅबाय नवीन जग निर्माण करू शकते.

पण तिने घाई करायला हवी. काळ अनंत आहे --- मिनिटामागून मिनिटे पळत आहेत. तासामागून तास जात आहेत! मिस कारनॅबायचे हात जड झाले. पण तिचे मन मोकळेपणे हलके व आनंदी होते. ते स्वेच्छेने पूर्ण विश्वात संचार करू शकत होते. ती स्वप्ने बघत झोपली --- मोठ्या जागा --- विस्तीर्ण इमारती --- नवीन व नवलपूर्ण जग --- हळूहळू जग आक्रसले. मिस कारनॅबायने जांभई दिली. तिचे जड झालेले हात हलवले. कालपासून काय झाले होते? काल रात्री तिला स्वप्न पडले. तिथे चंद्र होता. मिस कारनॅबाय तिच्या घड्याळातील आकडे जेमतेम पाहू शकत होती. तिच्या संभ्रमावस्थेतून तिला आठ दहा झाल्याचे कळले. फक्त एक तास व पस्तीस मिनिटांपूर्वी? अशक्य. आणि तरीही ---

मिस कारनॅबाय स्वतःशी बोलली, "फारच उल्लेखनीय!

## चार

हर्क्युल पायरो म्हणाला,

“तुम्ही माझ्या सूचना काळजीपूर्वक पाळल्या पाहिजेत. समजले का?”

“हो. मिस्टर पायरो. त्या बाबतीत तुम्ही निर्धास्त रहा.”

“तुम्ही त्या गटाला फायदा करून देण्याचा तुमचा विचार असल्याचे बोललात, बरोबर?”

“हो, मिस्टर पायरो. मी धर्मगुरूशी, डॉ अँडरसनशी तसे बोलले. मी अगदी भावनातिरेकाने त्याना म्हणाले की काय आश्चर्यकारक सुटकेचा सर्व अनुभव होता. मी कशी फसवली गेले आणि माझा सर्व गोष्टींवर विश्वास बसला. मी --- खरे तर हे म्हणायला अगदी नैसर्गिक वाटते आहे. तुम्हाला माहिती आहे का, डॉ अँडरसनकडे काही चुंबकीय शक्ती आहे.”

हर्क्युल पायरो कोरडेपणे बोलला, “मलाही असेच वाटते आहे.”

त्याची पद्धत भूल घालणारी होती. एखाद्याला असेच वाटेल, की त्याला पैशांची काही पर्वा नाही. तो त्याच्या नवलपूर्ण पद्धतीने हसत हसत म्हणाला, “तुम्हाला देणे शक्य असेल, तेवढे द्या.

तुम्हाला जर काही देणे शक्य नसेल तरी काही हरकत नाही. तुम्ही सर्वजण गटामध्ये समानच आहात." मी म्हणाले, "ओहो, डॉ अँडरसन, मी इतकी काही कफल्लक नाही. मला अलीकडेच दूरच्या एका नातेवाइकाकडून वारसाहक्काने बरेच पैसे मिळाले आहेत. अजून सर्व कायदेशीर बाबी पूर्ण होईपर्यंत, मी त्या पैशांना हात लावू शकत नाही. पण एक गोष्ट मला तातडीने करायची आहे." मग मी स्पष्ट केले की मी इच्छापत्र करते आहे आणि माझ्याकडे आहे, ते सर्व मला माझ्या भाईबंदांना द्यायचे आहे. मी स्पष्ट केले, की मला जवळचे नातेवाईक कोणी नाहीत."

आणि त्याने मोठ्या डौलाने ते म्हणणे मान्य केले?"

"तो त्या बाबतीत फार कोरडा होता. तो म्हणाला की त्यात खूप वर्षे जातील व मी खूप काळ आनंदापासून व अध्यात्मिक पूर्णत्वापासून वंचित राहीन. तो खरेच खूप हृदयाला हात घालणारे बोलतो."

"असे दिसते आहे खरे!"

पायरोचा आवाज कोरडा होता. त्याने चालू ठेवले,

"तुम्ही तुमच्या तब्येतीविषयी सांगितले?"

"हो, मिस्टर पायरो. मी त्याला मला फुफ्फुसांचा त्रास असल्याचे सांगितले. आणि तो दुसऱ्यांदा परत उपटल्याचेही

सांगितले. मी काही वर्षांपूर्वी एका विश्रांती केंद्रामध्ये उपचार घेतल्याचे व त्यामुळे मी बहुधा बरी झाल्याचेही सांगितले."

"छान!"

"माझी फुफ्फुसे पूर्ण बरी असतानाही मला हे सांगायची का जरूर पडली, की मी क्षयरोगी आहे, हे मला कळत नाही."

"लक्षात घे, ते जरुरीचे होते. तू तुझ्या मैत्रीणीला सांगितलेस?"

हो. प्रिय इमिलीला तिच्या नवऱ्याकडून मिळालेल्या तिच्या भाग्याशिवाय तिच्या खूप जवळच्या आत्याकडूनही तिला लवकरच त्याहून मोठी रक्कम मिळणार आहे."

"ठीक आहे. त्यामुळे मिसेस क्लेग तात्पुरती सुरक्षित राहील."

"ओहो, मिस्टर पायरो, तुम्हाला खरेच त्यात काही चुकीचे वाटते का?"

"तेच तर मला शोधून काढायचे आहे. तुम्ही स्वस्थघरात [santuary] मिस्टर कोलेना भेटलात का?

"मी मागे तिथे गेले तेव्हा मिस्टर कोले होते. मोठा विशेष प्रकारचा माणूस! तो हिरवी अर्धी चड्डी घालतो व फक्त कोबी खातो. तो फार उत्साही व भावनाशील व्यक्ती आहे."

“अरे, पण ते असे कसे काय करू शकतात? सर्व काही ठीक चालले आहे. तू केलेल्या कामाबद्दल मी तुझे अभिनंदन करतो. आता तेथील हिवाळ्याच्या उत्सवासाठी सर्व तयारी झाली आहे.”

## पाच

मिस कारनॅबाय --- एक मिनिट.”

तेजस्वी पण ताप आलेल्या डोळ्यांनी मिस्टर कोले यांनी मिस कारनॅबाय यांना मिठी मारली.

“मला दूरदृष्टी आहे. फार उल्लेखनीय दूरदृष्टी आहे. मला तुम्हाला त्याबद्दल सांगितले पाहिजे.”

मिस कारनॅबायने सुस्कारा टाकला. तिला मिस्टर कोले व त्यांच्या दूरदृष्टीची भीती वाटत होती. काही क्षण तिला नक्की असे वाटून गेले होते, की मिस्टर कोले वेडे आहेत.

त्यांची ही दूरदृष्टी फार लाजलावणी असल्याचे तिला आढळले होते. डेवोनला येण्यापूर्वी, त्या विशिष्ट आधुनिक जर्मन पुस्तकातील अर्धजागृत मनासंबंधीचा गाजलेला परिच्छेद त्यांनी तिला वाचून दाखवला होता, त्याची त्यांनी आठवण केली.

मिस्टर कोले यांचे डोळे चकाकत होते. ओठ थरथरत होते. ते उद्दीपित होऊन बोलू लागले.

“मी ध्यान करत होतो --- आयुष्याच्या कृतकृत्यतेबद्दल व अत्युच्च एकात्मतेबद्दल विचार करत होतो --- आणि मग माझे डोळे उघडले व मी पाहिले --- “

मिस कारनॅबायने स्वतःला सावरले. मिस्टर कोले यांनी मागच्या वेळी बघितलेले आता यावेळी बघितले नसेल, अशी आशा केली. ते पुरातन सुमेरियामधील देवदेवतांच्या लग्नाचे विधी होते.

मिस्टर कोले यांचे डोळे [ खरोखर ] वेडे दिसत होते. ते तिच्यावर झुकून, धापा टाकत बोलले, “दैवी गुरु इलीजाह अग्नीसारख्या लाल ज्वाळांच्या रथात बसून स्वर्गातून खाली येत असलेला मी पाहिला.”

मिस कारनॅबायने सुटकेचा निःश्वास टाकला. इलीजाह पुष्कळ बरा. त्याना तो दिसायला तिची काही हरकत नव्हती.

मिस्टर कोले पुढे म्हणाले, “ते देवाला नैवेद्य दाखवायचे टेबल होते. तशी शेकडो होती. मला एक आवाज ओरडलेला ऐकू आला. “तू पहाशील ते नीट बघ, लिही आणि परीक्षा कर --- “

ते थांबले आणि मिस कारनॅबाय पुटपुटली, “हो?”

‘त्या टेबलावर बिचारा बळी बांधलेला होता. तो सुऱ्याची वाट बघत होता. शेकडो व्हर्जिन --- तरूण, सुंदर, वस्त्रहीन व्हर्जिन --- “

मिस्टर कोर्लेनी चुंबनासारखा आवाज काढत ओठ फाकवले. मिस कारनॅबाय लाजली.

मग रॅव्हेन आले, ओडीनचे रॅव्हेन उत्तरेकडून उडत आले. ते इलीजाहच्या रॅव्हेनला भेटले ---एकत्रपणे त्यांनी आकाशात वर्तुळ काढून खाली सूर मारला. त्यांनी बळीचे डोळे उचकटले --- तिथे किंकाळी उमटली दात विचकले गेले. आणि जोरात आवाज आला, ‘बळीला थांबवा --- कारण आजच्या दिवसापासून जेहोवाह व ओडीन रक्ताचे भाऊ असतील!’ मग धर्मगुरू सुरा उगारून, बळीवर तुटून पडले व त्याला ठार केले --- “

मिस कारनॅबाय हताशपणे तिला छळणाऱ्यापासून दूर झाली. तो भावनाक्षोभाने लाळ गाळत, मालक असल्यासारखा तिच्यावर चालून येत होता.

“एक मिनिट.”

ती घाईने जवळ असलेल्या लॉजवाल्या लीप्सकोंबकडे गेली. तो त्याच्या लॉजवरून जाणाऱ्या ग्रीन हिल्समधील लोकांना त्याच्या लॉजमध्ये रहायला जागा देत असे.

ती बोलली, “मला नवल वाटते. तुम्हाला कदाचित माझे खांद्यावर झळकणारे सुंदर पदक मिळाले असेल. माझ्या हातून ते जमिनीवर कुठेतरी पडले असणार.”

गोडव्याचा लवलेश नसलेला व ग्रीन हिल्सजवळील लॉजचा मालक असलेला, लीप्सकोंब गुरगुरत म्हणाला की त्याने असले काही पाहिले नाही. कुठे काय पडले आहे, हे बघत बसण्याचे त्याचे काम नसल्याचे, तो बोलला. त्याने मिस कारनॅबायला फुटवायला बघितले. पण ती तिथे तिला छळणाऱ्या मिस्टर कोलेपासून सुरक्षित अंतर ठेवत, तिचे सुंदर पदक शोधत राहिली.

त्याच क्षणी सर्वश्रेष्ठ महान धर्मगुरू तिथे अवतरला. त्याच्या दयाळू व धीर देणाऱ्या हास्याने मिस कारनॅबाय तिच्या मनातले सांगण्याचे साहस करू शकली.

त्याला असे वाटत होते का, की मिस्टर कोले खूप --- खूप ---

त्या महान धर्मगुरूने तिच्या खांद्यावर हात ठेवला.

तो म्हणाला, “तू तुझ्या मनातली भीती घालवली पाहिजेस. खरे प्रेम भीतीला पळवून लावते --- “

“पण मला वाटते, मिस्टर कोले वेडे आहेत. त्यांची दूरदृष्टी --- “

महान धर्मगुरू म्हणाला, “तरीही त्याच्या कामातुर स्वभावामुळे, त्याची दृष्टी अपूर्ण आहे --- पण एक दिवस असा येईल, की तो दुसऱ्या व्यक्तीकडे अध्यात्मिक दृष्टीने पाहू शकेल.”

मिस कारनॅबायला लाज वाटली. अर्थात त्या परिस्थितीत तिने स्वतःचा बचाव करायचा प्रयत्न केला.

ती म्हणाली, “खरे तर लीप्सकोंबला एवढे उद्धटपणे कठोर वागायचे काय कारण होते?”

महान धर्मगुरूने परत त्याचे स्वर्गीय हास्य दाखवले.

तो बोलला, “लीप्सकोंब हा आमचा विश्वासू माणूस आहे. तो थोडा चढेल आहे. जरा मागासलेला आहे. पण विश्वासू आहे. फारच विश्वासू.”

तो लांब ढांगा टाकत चालू लागला. मिस कारनॅबायने त्याला मिस्टर कोलेच्या खांद्यावर हात टाकलेला पाहिला. तिने अशी आशा केली की त्यामुळे कदाचित मिस्टर कोले यांची दूरदृष्टी सुधारेल.

तसेही आता हिवाळ्यातील सणाला एक आठवडाच उरला होता.

## सहा

सणाच्या आधीच्या दिवशीच्या दुपारी, न्यूटॉन वूडबरी या झोपाळू शहरातील चहाच्या दुकानात, मिस कारनॅबाय हर्क्युल पायरोला भेटली. तिचे गाल आरक्त झाले व ती नेहमीपेक्षा जास्त अवाक् झाली. ती घोट घोट चहा पित राहिली आणि तिच्या बोटांनी कडक पावाचे तुकडे करत राहिली.

पायरोने तिला बरेच प्रश्न विचारले. त्याना तिने एका शब्दात उत्तरे दिली.

मग तो म्हणाला,

"त्या सणासाठी तिथे किती लोक असणार आहेत?"

"मला वाटते, एकशे वीस. अर्थात इमेलीन तिथे आहे आणि मिस्टर कोले --- खरे तर आता ते खूप म्हातारे झाले आहेत. त्यांना दूरदृष्टी आहे. ती असल्याचे त्यांनी मला मागे सांगितले होते. मला आशा आहे --- नक्कीच आशा आहे की ती खूप वाईट नसावी अशी मी आशा करते. ती विशिष्ट प्रकारची असावी. नंतर तिथे साधारण वीस नवीन सभासद असतील."

"छान! तुम्हाला काय करायचे आहे, ते तुम्हाला माहिती आहे का?"

मिस कारनॅबायने विचित्र आवाजात काही म्हणण्यापूर्वी तिथे क्षणभर शांतता होती.

“मिस्टर पायरो, तुम्ही मला काय सांगितले, ते मला माहिती आहे --- “

“छान!”

मग ॲमी कारनॅबाय मोठ्याने व स्पष्टपणे म्हणाली,

“मी ते करणार आहे.”

हर्क्युल पायरोने तिच्याकडे रोखून बघितले. मिस कारनॅबाय उठून उभी राहिली. तिचा आवाज भरभर व भावनाक्षोभ झाल्यासारखा येत होता.

“तुम्ही मला इथे डॉ अँडरसनवर लक्ष ठेवायला पाठवले आहे. तुम्हाला त्याचा सर्व बाबतीत संशय आहे. पण तो एक नवलपूर्ण मनुष्य आहे --- महागुरु आहे. माझा त्याच्यावर पूर्णपणे विश्वास आहे. मी याउप्पर तुमचे हेरगिरीचे काम करणार नाही आहे. मिस्टर पायरो, तो धर्मगुरू असलेल्या गटाची मी सभासद आहे. जगासाठी आता त्याचा काही नवीन संदेश आहे. मी त्याला मनापासून मानते. आणि कृपया हे माझे मला ठरवू द्या.”

एवढे बोलून मिस कारनॅबायने पैसे टेबलावर ठेवले व घाईने दुकानाबाहेर पडली.

हर्क्युल पायरो बोलला, “सर्व देवांच्या नावाने ठणाणा!”

तिने बिल दिलेले त्याला समजण्यापूर्वी वेटरला त्याला दोनदा विचारावे लागले. पुढील टेबलावर बसलेल्या वाईट स्वभावाच्या माणसाच्या रुचीपूर्ण नजरेचा सामना करत, तो लाजला व पैसे देऊन बाहेर पडला.

तो रागारागाने विचार करत होता.

## सात

परत एकदा सर्व भक्तगण मोठ्या संख्येने जमले. प्रश्नोत्तरांचा विधी पार पडला.

“तुम्ही धार्मिक विधीसाठी तयार आहात का?”

“आम्ही तयार आहोत.”

“तुमचे डोळे मिटा व उजवा हात वर करा.”

हिएव्या झग्यातील मोठा धर्मगुरू थांबलेल्या लोकांच्या ओळींमधून पुढे आला. मिस कारनॅबायच्या पुढे असणाऱ्या, कोबी खाणाऱ्या, दूरदृष्टीच्या मिस्टर कोलेने त्याला सुई टोचल्यावर एक दुःखी किंकाळी मारली.

महाधर्मगुरू मिस कारनॅबायच्या जवळ उभा होता. त्याचे हात तिच्या दंडाला लागत होते.

“नाही, तू नको. तू यातील काही करू नकोस --- “

विश्वास बसणार नाही, असे शब्द --- वेळेआधी न उच्चारलेले भांडण, रागाने केलेली गर्जना. डोक्यावरचे हिरवे कापड डोळ्यातील अंगारांनी फाडले जात होते --- हे बघणे अविश्वासार्ह होते --- मेंढीच्या कातड्याचा कोट घातलेल्या व इतर भक्तांनी धरलेल्या मिस्टर कोलेंना धर्मगुरूने कसेबसे पकडले होते. होते.

आधीचे धर्मगुरू, मिस्टर कोले व्यावसायिक आवाजात भरभर बोलत होते,

“--- आणि इथे माझ्या हातात तुमच्यासाठीचे पकड वॉरंट आहे. मी तुम्हाला ताकीद देतो की तुम्ही जे बोलाल, ते तुमच्याविरुद्ध पुरावा म्हणून सुनावणीच्या वेळी वापरले जाईल.”

आता तिथे दाराशी इतरजण जमायला लागले होते --- निळे गणवेषधारी!

कुणीतरी किंचाळले, “हे पोलीस आहेत. ते घर्मगुरुला पकडून नेत आहेत. ते घर्मगुरुला पकडून --- “

प्रत्येकाला धक्का बसतो. बापरे! --- त्यांच्यासाठी महाधर्मगुरू म्हणजे धर्माचा त्रासलेला शहीद होता. भोवतालच्या

अज्ञानी व छळीक लोकांमुळे, सर्व महान गुरूंना त्रास भोगावा लागतो ---

मध्यंतरीच्या काळात, गुप्तचर इन्स्पेक्टर कोले, महाधर्मगुरूच्या हातून पडलेल्या, त्वचेखाली द्यायच्या इंजेक्शनच्या सुया काळजीपूर्वक गोळा करत होता.

## आठ

माझ्या शूर मित्रानो!”

पायरोने मिस कारनॅबायला हाताने हळू हलवले व इन्स्पेक्टर जापची तिच्याशी ओळख करून दिली.

मुख्य इन्स्पेक्टर जाप बोलला, “मिस कारनॅबाय, तुम्ही छान काम केले. हे खरे आहे, की तुमच्याशिवाय आम्ही हे करू शकलो नसतो.”

मिस कारनॅबाय तिच्या स्तुतीने बावरून बोलली, “तुम्ही असे म्हणालात, हा तुमचा मोठेपणा आहे. तुम्हाला माहिती आहे, की खरे तर मला सांगायला संकोच वाटतो. पण हे करतांना मला मजा आली. हे करतांना माझे औत्सुक्य वाढत होते. काही वेळा मी वहावत गेले. मी त्या मूर्ख स्त्रियांपैकीच असल्यासारखे मला वाटू लागले होते.”

मिस कारनॅबाय पायरोकडे वळली.

“चहाच्या दुकानातील क्षण भयंकर होते. काय करावे, ते मला समजत नव्हते. मी जणू काट्यांवर चालत होते.”

पायरो दिलासा देत बोलला, “तू मोठे धैर्य दाखवलेस. एका क्षणी मला वाटले, तू किंवा मी शहाणपणा सोडला आहे. क्षणभर विचार करून मला समजले की तू तो सोडला आहेस.”

मिस कारनॅबाय बोलली, “आपण आत्मविश्वासाने बोलत असतांना, तो माझ्यासाठी मोठा धक्का होता. मी पाहिले की लॉजवाला लीप्सकोंब माझ्यामागील टेबलावर बसलेला आहे, तेव्हा मला कळले नाही, की हा अपघात आहे, की तो माझा पाठलाग करत आला आहे. मी म्हणते तसे, मला त्या क्षणी शक्य तेवढे उत्तम ते करायचे होते. माझा विश्वास आहे की तुम्हाला समजते आहे.”

पायरो हसला.

“मला समजले. आमचे बोलणे ऐकण्यासाठी एकच व्यक्ती पुरेशी जवळ बसली होती. आणि मी चहाच्या दुकानातून बाहेर पडल्याबरोबर, आम्ही त्या व्यक्तीचा पाठलाग केला. जेव्हा ती व्यक्ती सरळ त्या उत्सवाच्या ठिकाणी गेली, तेव्हा मला समजले की आम्ही तुझ्यावर अवलंबून राहू शकतो. आणि तू मला खाली

बघायला लावणार नाहीस --- पण मला भीती होती, की त्यामुळे तुझा धोका वाढत होता.”

“तिथे खरेच धोका होता का? इंजेक्शनच्या सुईत काय होते?”

जाप म्हणाला,

“तू सांगतो आहेस की मी सांगू?”

पायरो कडकपणे बोलला,

“मिस, ही डॉ अँडरसनची लोकांना लुटायची व खून करण्याची परिपूर्ण योजना होती --- शास्त्रीय खून! त्याचे बरेचसे आयुष्य जीवाणूंच्या संशोधनामध्ये गेले. वेगळ्या नावाने तो शेफिल्डमधील प्रयोगशाळा चालवत होता. तिथे त्याने निरनिराळ्या प्रकारचे जीवाणूंची कृत्रिम रीत्या वाढ करून, त्याची इंजेक्शने तयार केली. उत्सवामध्ये त्याचा लहानसा पण पुरेसा डोस, हशीश किंवा भांग या नावाने त्याच्या भक्तगणांना टोचत असे. त्यामुळे त्याना परीणामकारकपणे भ्रामक सुखाची संवेदना होत असे. त्यामुळे ते भक्त त्याला चिकटून रहातात. हा अध्यात्मिक अनुभव असल्याचे तो त्याना खोटेच सांगे.”

मिस कारनॅबाय बोलली, “बापरे! फारच उल्लेखनीय अनुभव!”

हर्क्युल पायरोने मान डोलावली.

“हे त्याच्या व्यापारातील सामान्य धक्का देणे होते --- आक्रमक व्यक्तिमत्व, लोकांच्या समूहावर त्याना भूल घालून वर्चस्व गाजवणे आणि या रसायनाने त्याना भारून टाकणे हे त्याचे उद्योग होते. पण त्याचा एक दुसरा उद्देशही होता.

“एकाकी स्त्रियांच्या भावनिक गाभ्याला हात घालून, त्याना ऋणाईत केल्याचे भासवून, त्यांच्या इच्छापत्रामार्फत त्यांचा पैसा त्याच्या गटासाठी जमवायचा. एक एक करून या स्त्रिया मरत व आणि त्याला पैसा मिळे. त्या त्यांच्या घरी नैसर्गिकपणे मरत. जास्त तांत्रिक भाषेत न शिरता, मी स्पष्ट करतो. विशिष्ट जीवाणू विशिष्ट पद्धतीने वाढवून त्यांचे सखोल संशोधन करणे शक्य असते. अशा खास समूहांचा एक गट बनवला जातो. उदाहरणार्थ, अल्सरयुक्त कोलायटीस ज्यामुळे होतो, तो समूह. तसेच सशक्त माणसाला होणारा त्रासदायक नसलेला पण जखमी माणसाला घातक असलेला जुनाट क्षयरोग. तुम्ही माणसाची हुशारी ओळखू शकता? हे मृत्यू देशाच्या विविध भागात विविध डॉक्टरांच्या देखरेखीखाली होतात. त्याबद्दल काही संशयही घेतला जात नाही. मला वाटते, त्याने हळूहळू घातक परिणाम करणारा असा काही जीवाणूंचा समूह शोधून काढला.”

जाप म्हणाला, “तो राक्षस आहे.”

पायरोने चालू ठेवले,

“माझ्या सांगण्यावरून, तुम्ही त्याला सांगितलेत, की तुम्हाला क्षयरोग झालेला आहे. कोलेने त्याला पकडले, तेव्हा इंजेक्शनमध्ये क्षयरोगाचे जीवाणू सूक्ष्मरुपात होते. तुम्ही सशक्त व्यक्ती असल्याने, तुमच्यावर त्याचा काही परिणाम झाला नाही. म्हणूनच मी तुम्हाला तसे सांगायला सांगितले होते. मला भीती आहे की तो अजूनही वेगळ्या प्रकारचे काही जीवाणू वापरून नवीन इंजेक्शन तयार करू शकेल. पण मला तुम्हाला धोका घ्यायला उद्युक्त करावे लागले. मी तुमच्या धैर्याचे कौतुक करतो.”

मिस कारनॅबाय बोलली, “ते ठीक आहे. मला आव्हाने पेलायला आवडतात. मी फक्त शेतातील बैलांना व तशा गोष्टींना घाबरते. पण या लबाड माणसाला पकडण्यासाठी तुमच्याकडे पुरेसे पुरावे आहेत का?”

जाप तोंडभरून हसला. तो म्हणाला, ‘खूप पुरावे आहेत. आम्हाला त्याची प्रयोगशाळा, त्याचे प्रयोग आणि सर्व धागेदोरे मिळाले आहेत.”

पायरो म्हणाला,

“मला वाटते, त्याने अनेक खून करायचे ठरवले असावे. पण त्याची आई ज्यू असल्यामुळे तो जर्मन विद्यापीठातून हाकलला

गेला नव्हता, तर ती फक्त तो इथे कसा आला याबद्दल सांगितली जाणारी गोष्ट आहे, जेणेकरून त्याच्याबद्दल सहानुभूती निर्माण व्हावी. मला वाटते, खरे तर तो शुद्ध आर्यन वंशाचा असावा.”

मिस कारनॅबायने सुस्कारा सोडला.

पायरोने विचारले, “काय झाले?”

मिस कारनॅबाय म्हणाली, “मला पहिल्या उत्सवानंतर पडलेल्या छानशा स्वप्नाचा मी विचार करत होते. मला वाटते, हशीशमुळे!. त्या स्वप्नात मी इतके सुंदर जग बघितले होते. त्यात लढाया, गरिबी, रोगराई, कुरूपता काही नव्हते --- “

जाप हेवा करत बोलला, “ते छान स्वप्न असले पाहिजे.

मिस कारनॅबाय उडी मारून बोलली,

“मला घरी गेले पाहिजे. इमिली काळजीत असेल. आणि प्रिय ऑगस्टसला पण माझा विरह झाला असेल.”

हर्क्युल पायरो हसून म्हणाला,

“कदाचित तो घाबरला असेल. त्याच्यासारखेच तू हर्क्युल पायरोसाठी खोटे खोटे मरणार की काय!”

# The Apples Of Hesperides

## सोनेरी सफरचंदे



मोठ्या महोगनी टेबलापलीकडील माणसाच्या चेहऱ्याकडे पायरोने विचारपूर्वक पाहिले. त्याच्या दाट भुवया, निर्दयी तोंड, जबड्याची लोभी रेष आणि भेदक दूरदृष्टी दाखवणाऱ्या डोळ्यांची त्याने नोंद घेतली. त्याला त्या माणसाकडे पाहून समजले की हा आर्थिक सम्राट कसा बनला असेल.

टेबलावरील त्याच्या लांब नाजूक सुंदर घाट असलेल्या हातांवर नजर पडल्यावर, त्याला समजले की त्याने संग्राहक म्हणून कीर्ती कशी कमावली असेल. अटलांटिकच्या दोन्ही बाजूस, तो कलारसिक म्हणून प्रसिद्ध होता. त्याची कलेतील रुची ऐतिहासिक गोष्टींशी हातात हात घालून होती. वस्तू नुसती सुंदर असणे, त्याच्यासाठी पुरेसे नव्हते --- तिला परंपरादेखील पाहिजे, असा त्याचा आग्रह असे.

इमेरी पॉवर बोलत होता. त्याचा आवाज शांत होता --- नुसत्या मोठ्या आवाजापेक्षा त्याचा लहानसा, स्पष्ट आवाज जास्त परिणामकारक होता.

“तुम्ही अलीकडे बऱ्याच केसेस घेता, हे मला माहिती नव्हते. पण मला वाटते, ही केस तुम्ही नक्की घ्याल.”

“हे या क्षणाचे मोठे प्रकरण आहे का?”

इमेरी पॉवर बोलला,

“माझ्यासाठी ते अती महत्त्वाचे आहे.”

एका बाजूला डोके कललेला पायरो चौकशी करायच्या मनस्थितीत होता. तो विचारमग्न रॉबिन पक्षासारखा दिसत होता.

दुसऱ्याने चालू ठेवले.

“हे कलात्मक वस्तूच्या पुनरुज्जीवनासंबंधी आहे. स्पष्ट सांगायचे तर असे म्हणतात की पुनर्जागरणा [ Renaissance ] पासूनचा हा धर्मगुरू अलेक्झांडर सहावा, रोडेरीगो बोर्गिया याने वापरलेला कप आहे. तो कधीकधी त्याच्या खास पाहुण्याला त्यातून पेय प्यायला देत असे. पायरो, पण तो पाहुणा सहसा मरत असे.”

पायरो पुटपुटला, “चांगला इतिहास आहे!”

त्या कपाचे जीवन नेहमी रक्तरंजिततेने भरलेले होते. तो अनेकदा चोरला गेला होता. त्याचा ताबा मिळण्यासाठी खून केले गेले. अनेक वर्षे तेथे रक्ताचा सडा पडत होता.”

“त्याच्या किंमतीसाठी की दुसऱ्या काही कारणाने?”

“त्याची किंमत तर महत्वाची होतीच. पण त्याची कारागिरी फारच सुंदर होती. [असे म्हणतात की ती बेन्व्हेनुटो सेलिनी याने केली होती.] त्यात एक झाड होते. त्याभोवती हिरे मढवलेल्या सापाने वेटोळे घातले होते आणि झाडावरील सफरचंदे बहारदार पाचूंची बनवलेली होती.”

रुची वाटल्यामुळे पायरो जाणवेल इतक्या घाईने पुटपुटला,

“सफरचंदे?”

पाचू फारच छान आहेत व सापावरील लाल माणके देखील तशीच आहेत. पण त्या कपाची खरी किंमत त्याचे ऐतिहासिक लागेबांधे, ही आहे.

१९२९ मध्ये, मार्चीस डी सॅन व्हेरॅट्रीनोने तो लिलावात काढला होता. ग्राहकांमध्ये आपापसात बोली लावली जात होती. शेवटी मी तीस हजार पौंडांवर [ विनिमय दराने ] सौदा तोडला.”

पायरोने त्याची भुवई उंचावली व पुटपुटला,

“खरोखर, ही मोठी रक्कम आहे. मार्चीस डी सॅन व्हेरॅट्रीनो नशीबवान होता. इमेरी पॉवर बोलला,

“मिस्टर पायरो, जेव्हा मला खरेच एखादी वस्तू हवी असते, तेव्हा मी तिची किमत मोजायला तयार असतो.”

हर्क्युल पायरो मवाळपणे म्हणाला,

“तुम्ही स्पॅनीश म्हण ऐकली असेल, ‘देव म्हणतो, तुम्हाला हवे ते घ्या --- आणि त्याची किंमत चुकती करा.

क्षणभर तो हसला --- त्याच्या डोळ्यात हलकासा राग तरळला. तो कोरडेपणे बोलला,

“मिस्टर पायरो, तुम्ही एक प्रकारचे तत्वज्ञ आहात.”

“मिस्टर मी सिंहावलोकन करायच्या युगामध्ये जन्माला आलो आहे.”

“नक्कीच. पण माझा कप माझ्यासाठी टिकवून ठेवेल, असे हे युग नाही.”

“नाही, असे तुला का वाटते?”

“मला वाटते, काही कृतीची जरुरी आहे.”

हर्क्युल पायरोने शांतपणे मान हलवली.

“खूप लोक हीच चूक करतात. पण मिस्टर पॉवर, मी तुमचे लक्ष वेधू इच्छितो. आपण चालू असलेल्या गोष्टीपासून, भरकटतो आहोत. तुम्ही म्हणत होतात, की तुम्ही मार्चीस डी सॅन व्हेरॅट्रीनोकडून तो कप आणलात?”

“बरोबर. मला तुम्हाला आता असे सांगायचे आहे, की माझ्याकडे तो येण्यापूर्वी चोरीला गेला होता.”

“ते कसे झाले?

“मार्चीसचा राजवाडा लिलावाच्या रात्री फोडला गेला आणि आठ दहा महागाईच्या वस्तू चोरीला गेल्या. त्यातच तो कपदेखील गेला.”

“मग त्यासंबंधी काय पाऊले उचलली गेली?”

पॉवरचे खांदे शहारले.

“अर्थात पोलीसांनी त्यात लक्ष घातले. प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय टोळीतील चोरांचे हे काम असल्याचे ओळखले गेले. त्यातील एक डब्ले नावाचा फ्रेंच माणूस होता व एक रीकोव्हेट्टी नावाचा इटालियन माणूस होता. त्याना पकडून त्यांच्याविरुद्ध केस चालवली गेली. चोरलेला काही माल त्यांच्याकडे सापडला.”

पण बोर्गीया कप सापडला नाही का?”

“बोर्गीया कप सापडला नाही. पोलीसांनी खात्री केल्याप्रमाणे, खरे तर त्यात तिघांचा सहभाग होता. तिसरा पॅट्रीक नावाचा आयरिश माणूस होता. हा तिसरा इमारतींवर चढण्यात माहीर होता. तोच खरे तर या वस्तू चोरणारा होता. डब्ले हा टोळीचा मुख्य मेंदू होता. त्याने सर्व बनाव यशस्वीपणे आखला होता. रीकोव्हेट्टीने गाडी चालवली व माल गाडीत भरला आणि जाण्यासाठी थांबून राहिला.”

“आणि चोरलेला माल तिघाजणांनी वाटून घेतला का?”

“बहुतेक. ज्या वस्तू परत मिळाल्या, त्या कमी किमतीच्या होत्या. जास्त महागाईच्या उल्लेखनीय वस्तू घाईने देशाबाहेर पाठवल्या गेल्या.”

“तिसऱ्या माणसाचे, कॅसेचे [ पॅट्रीकचे टोपण नाव ] काय? त्याला पकडून कोर्टात खेचले गेले नाही का?”

“तू म्हणतो आहेस, त्या अर्थाने नव्हे. तो फार तरुण नव्हता. पूर्वीपेक्षा त्याचे स्नायू कडक झाले होते. दोन आठवड्यांनी तो एका इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडला व तत्काळ मेला.”

“हे कुठे झाले?”

“पॅरीसमध्ये. तो डुव्हूग्लीअर नावाच्या एका लखपती बँकरच्या घरी चोरी करायला गेला होता.”

“तेव्हापासून तो रत्नजडीत कप कधी दिसलाच नाही का?”

‘बरोबर.”

‘तो कधी लिलावात निघाला नाही?”

माझी खात्री आहे, की कधीच नाही. मी असे म्हणू शकतो, की फक्त पोलिसच नव्हे तर खासगी दलालसुद्धा त्याची चौकशी करत होते.”

“तू भरलेल्या पैशांचे काय?”

नेहमी योग्य वागणाऱ्या मार्चीसने कप चोरीला गेल्याने, मला पैसे परत करायची तयारी दर्शवली.”

“पण तू ते घेतले नाहीस?”

“नाही.”

“तू असे का केलेस?”

“आपण असे म्हणू शकतो, की ही बाब मला माझ्याच हातात ठेवायची होती?”

“म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की जर तू मार्चीसकडून पैसे घेतले असतेस, तर कप परत मिळाल्यास, आणि कायदेशीर रीत्या तर तो तुझा असताना, त्याच्या मालकीचा ठरला असता का?”

“बरोबर.”

“तुझ्या या दृष्टीकोनामागे काय विचार होता?”

पॉवर हसून बोलला,

“मिस्टर पायरो, ठीक आहे. तुम्हाला ती बाब कौतुकास्पद वाटते, हे अगदी साधे आहे. मला वाटते, तो कप खरा कुणाच्या ताब्यात आहे, हे मला माहिती आहे.”

“हे खूपच रुचीपूर्ण आहे. आणि तो कोण आहे?’

“सर रुबेनम मरोसेनथाल. तो फक्त कप बाळगणाराच नव्हता, तर तो एके काळी माझा व्यक्तिगत शत्रू होता. तो अनेक उद्योगांमध्ये शत्रू होता --- आणि सरते शेवटी मला त्याने तो कप विकला.

आमचे कडक शत्रुत्व बोर्गीय कप या एकाच गोष्टीसाठी टोकाचे विकोपाला गेले. प्रत्येकाने तो स्वतःकडेच हवा, असे ठरवले होते. तो मानाचा प्रश्न होऊन बसला होता. आमचे नेमलेले दलाल एकमेकांवर कुरघोडी करत लिलावात बोली लावत.”

“आणि तुमच्या दलालांनी शेवटी लिलावात बाजी मारून, तो खजिना हस्तगत केला का?”

“खरे तर नाही. मी दुसरा एक दलाल नेमायची काळजी घेतली --- त्या धंद्यातील पॅरीसच्या माणसाचे प्रतिनिधित्व करणारा एक खरा वाटेल असा दलाल मी नेमला. तुम्हाला समजते आहे का, की आमच्यापैकी कोणीच दुसऱ्याला तो कप द्यायला तयार नव्हते, पण तिसऱ्या एकाला नंतर गुपचूप भेटून द्यायला तयार होते --- पण ती वेगळी गोष्ट होती.”

“खरे तर लहानशी फसवणूक!”

“तेच.”

“हे यशस्वी ठरले --- सर रुबेन रोसेनथालला कसे फसवण्यात आले, हे नंतर लगेच त्याच्या लक्षात आले का?”

पॉवर हसला.

ते उघड करणारे हसू होते.

पायरो म्हणाला, “आता मला काय झाले ते समजत आहे. तुमचा विश्वास होता, की सर रुबेनने मार खायचे नाकारले व मुद्दाम चोरी घडवून आणली का?”

पॉवरने हात वर केला.

“ओहो, नाही. नाही. ते इतके वाईट नव्हते. ते असे झाले --- सर रुबेनने नंतर लगेचच इतिहासातील पुनर्जागरण कप विकत घेतला असावा. पण कुठल्या राज्यातून घेतला त्याचा काही उल्लेख नाही.

“त्याचे वर्णन पोलिसांनी प्रसृत केले होते का?”

“तो कप उघडपणे दाखवला गेला नसावा.”

“तुमच्या मते सर रुबेनला तो कप त्याच्याकडे असल्याचे केवळ दाखवणे पुरेसे होते का?”

“हो. शिवाय जर मार्चीसची मागणी मान्य केली असती, तर सर रुबेनला नंतर काही खासगी व्यवस्था करून कप कायदेशीरपणे त्याच्या ताब्यात घेता आला असता.”

क्षणभर तो थांबला व मग बोलला,

“पण मी तो कायदेशीरपणे माझ्याकडे ठेवला असता, तरी माझी मालमत्ता मिळवण्यामध्ये काही शक्यता उरल्या असत्या.”

पायरो धारदारपणे म्हणाला, “तुम्ही तो सर रुबेनकडून चोरल्याचे तुम्हाला दाखवता आले असते.”

‘मिस्टर पायरो, चोरलेला नव्हे. मी फक्त माझ्या मालमत्तेचे पुनरुज्जीवन करत होतो.”

“पण मला समजले, त्याप्रमाणे तुम्ही त्यात यशस्वी झाला नाहीत, नाही का?”

“फार चांगल्या कारणासाठी. रोसेनथालच्या ताब्यात तो कप कधीच नव्हता.”

“तुम्हाला कसे माहिती?”

अलीकडे तेलाच्या रुचीमध्ये काहीजणांचे एकत्रीकरण झाले होते. रोसेनथालचे व माझे स्वारस्य एकवटले. आम्ही शत्रू नसून मित्र असल्याचे आमच्या लक्षात आले. मी त्याच्याशी मोकळेपणे बोललो आणि त्याने ताबडतोब मला असे खात्रीपूर्वक सांगितले, की कप कधीच त्याच्या ताब्यात नव्हता.”

“आणि तू त्याच्यावर विश्वास ठेवलास?”

“‘हो.”

पायरो विचारपूर्वक बोलला,

“मग या देशात म्हटले जाते, तसे जवळ जवळ दहा वर्षे तुम्ही चुकीच्या झाडावर भुंकत होतात का?”

तो पैसेवाला कडूपणे बोलला,

“हो. मी बरोबर तेच करत होतो.”

“आणि आता --- सर्व काही पहिल्यापासून सुरु करायचे आहे?”

दुसऱ्याने मान डोलावली.

आणि तेव्हा मी यात आलो? तुम्ही कोरड्या --- ठार कोरड्या वासावर माझ्यासारख्या कुत्र्याला सोडले आहे.”

पॉवर कोरडेपणे बोलला,

“जर प्रकरण सोपे होते, तर मला तुम्हाला बोलावण्याची काही गरज नव्हती. अर्थात जर तुम्हाला अशक्य असेल तर --- “

त्याला योग्य शब्द सापडले. हर्क्युल पायरो उठून उभा राहिला व थंडपणे बोलला,

“मिस्टर, माझ्या कोशात अशक्य हा शब्द नाही. मी मला फक्त एवढाच प्रश्न विचारतो --- मी यात लक्ष घालण्यासाठी हे प्रकरण पुरेसे रुचीपूर्ण आहे की नाही?

इमेरी पॉवर परत हसला व बोलला,

“तुम्ही तुमची फी सांगू शकता --- तीच रुचीपूर्णता असेल.”

छोट्या माणसाने मोठ्या माणसाकडे पाहिले. तो हळूवारपणे बोलला,

“तुम्हाला हे कलात्मक काम करायची इतकी इच्छा आहे का? नक्कीच नाही!”

इमेरी पॉवर बोलला,

“हे समजून चाला, की तुमच्यासारखीच मीही हार मान्य करत नाही.”

हर्क्युल पायरोने त्याचे डोके झुकवले. तो म्हणाला,

“हो --- ते बाजूला ठेवा --- मला कळते --- “

## दोन

इन्स्पेक्टर वॅगस्टॅफेला स्वारस्य होते.

“व्हेरॅट्रीनो कप? मला त्याबद्दल सर्व काही आठवते आहे. त्या व्यवसायाच्या या बाजूचा सर्वेसर्वा मी होतो. तुम्हाला माहिती आहे, मी इटॅलीआनोबद्दल थोडे बोललो. मग गेलो आणि मिस्टर मॅक्रोनीसबरोबर सभा घेऊन चर्चा केली. त्या दिवसानंतर आजपर्यंत आम्ही कधी भेटलो नाही. गंमत आहे, नाही का?”

“तुमचे स्पष्टीकरण काय आहे? खासगी विक्री?”

व्हॅगस्टॅफेने मान हलवली.

“मला संशय आहे. अर्थात ते दुरून शक्य आहे --- नाही, माझे स्पष्टीकरण फार सोपे आहे. भविष्यासाठी माल लपवून ठेवला --- आणि तो कुठे लपवला आहे हे जाणणारा माणूस मेला.”

“तुम्हाला कॅसे म्हणायचे आहे का?”

“हो. त्याने कदाचित तो इटालीत कुठेतरी लपवून ठेवला असेल. किंवा तो देशाबाहेर पाठवण्यात तो यशस्वी झाला असेल. पण त्याने तो लपवला व तेव्हापासून तो तिथेच आहे.”

हर्क्युल पायरोने सुस्कारा टाकला.

“ही अद्भुतरम्य गोष्ट आहे. गिलाव्यात बसवलेले मोती --- काय गोष्ट आहे --- नेपोलिअनचा छातीपर्यंतचा पुतळा, नाही का? पण या बाबतीत ते हिरे नव्हते --- तो मोठा सोन्याचा कप होता. एखाद्याला वाटेल की तो लपवायला कठीण आहे.”

व्हॅगस्टॅफे गुळमुळीतपणे म्हणाला,

“ओहो, मला माहिती नाही. मला वाटते, ते करता येईल. लाकडी तक्तपोशीखाली किंवा तसेच काहीतरी.”

“कॅसेचे स्वतःचे घर होते का?”

तो रुंद जिवणीने हसत बोलला, “हो. लिव्हरपूलमध्ये. ते लाकडी तक्तपोशीखाली नसल्याची खात्री आम्ही केली होती.”

“त्याचे कुटुंब?”

“बायको चांगली स्त्री होती. ती क्षयरोगाने ग्रस्त होती. तिच्या नवऱ्याच्या व्यवहारांनी गांजलेली होती. ती धार्मिक होती --- पक्की कॅथॉलिक --- पण त्याला सोडून जाण्याचा धीर करू शकली नाही. ती अनेक वर्षांपूर्वी वारली. तिच्यानंतर तिची मुलगी जोगीण झाली. मुलगा वेगळा होता --- तो अगदी त्याच्या पालकांसारखा होता. मी शेवटी त्याच्याबद्दल ऐकले, तेव्हा तो अमेरिकेत होता.

हर्क्युल पायरोने त्याच्या लहानशा वहीत लिहिले. अमेरिका. तो म्हणाला, “कॅसेच्या मुलाला कदाचित तो कप लपवलेली जागा माहिती असेल का?”

“मला असे वाटत नाही. नाहीतर आतापर्यंत तो बाहेर आला असता.”

“तो वितळवला गेला नसेल ना?”

वॅगस्टॅफे नीतीमत्तापूर्णतेने म्हणाला, “असेलही. मी म्हणेन, शक्य आहे. पण मला माहिती नाही --- त्याची मोठी रक्कम कलेक्टरकडे गेली असेल. --- आणि कलेक्टर मंडळींचा विनोदी व्यवहार चालतो --- तुम्हाला आश्चर्य वाटेल. कधीकधी मला वाटते, त्याना नीतीची काही चाड नसते.”

“ओहो! उदाहरणार्थ तुम्ही कधी सर रुबेन रोसेनथालला अशा नीतीची काही चाड नसलेल्या व्यवहारात असलेले पाहिले असते, तर आश्चर्यचकित झाला असता का?”

वॅगस्टॅफे जिवणी फाकवून हसला.

“मला नाही वाटत तो असा असेल. जिथे कलात्मकतेचा संबंध आहे, तिथे तो खूप काळजीपूर्वक वागणारा आहे.”

“टोळीमधील इतर लोकांचे काय?”

“रीकोव्हेट्टी व डब्ले यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. माझ्या कल्पनेप्रमाणे, ते आता सुटतील.”

“डब्ले हा फ्रेंच माणूस आहे ना?”

“हो. तो या टोळीचा सूत्रधार, डोके लढवणारा होता.”

“यात अजूनही लोक होते का?”

“यात एक मुलगी होती --- रेड काटे --- असे तिला म्हणत. तिने नोकराणी म्हणून काम पत्करले व फसव्या लोकांबद्दल सर्व काही शोधून काढले. माल कुठे ठेवला जातो वगैरे. टोळी फुटल्यावर मला वाटते, ती ऑस्ट्रेलियाला गेली.”

“आणखी कुणी?”

“युगोयुअन नावाचा एक माणूसही त्यांच्याबरोबर असल्याचा संशय होता. तो खरेदीविक्री करणारा होता. मुख्य कार्यालय स्तमबाउलला होते पण त्याचे दुकान पॅरीसला होते. पण त्याच्याविरुद्ध काही सिद्ध झाले नाही --- पण तो खात्रीचे गिऱ्हाईक नव्हता.

पायरोने सुस्कारा टाकला. त्याने त्याची लहानशी वही पाहिली. त्यात लिहिले होतेः

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इटाली, फ्रान्स, टर्की ---

तो पुटपुटला,

“मी पृथ्वीभोवती पट्टा आवळेन --- “

“इन्स्पेक्टर वॅगस्टॅफेम बोलला, “काय?”

हर्क्युल पायरो बोलला, “मी निरीक्षण करत होतो, की जगाची सफर दाखवल्यासारखी वाटते आहे.”

## तीन

हर्क्युल पायरोचा सक्षम खासगी नोकर, जॉर्ज याच्याबरोबर केसची चर्चा करायची त्याला सवय होती. म्हणजे हर्क्युल पायरो काही गोष्टी निरीक्षणासाठी जॉर्जवर सोडून देत असे. पायरोच्या

सहवासात राहून, तो स्वतःच्या नैसर्गिक शहाणपणाने तेवढी गोष्ट शिकला होता.

पायरो बोलला, “विश्वातील पाच निरनिराळ्या भागांमध्ये तपास करायची गरज तुला पडली असती, तर तू ते कसे केले असतेस?”

“सर, जरी काहीजण म्हणत असले की त्यामुळे पोट बिघडते, तरी विमानाचा प्रवास फार झटपट होतो. पण मी काही सांगू शकत नाही.”

पायरो म्हणाला, “स्वतः स्वतःला विचारले तर हर्क्युलने काय केले असते?”

“म्हणजे तुम्हाला सायकल छाप, असे म्हणायचे आहे का?”

पायरोने चालू ठेवले, “किंवा एखादा विचारेल, की त्याने काय केले असते?

जॉर्ज, उत्तर असे आहे की तो त्याने झपाट्याने प्रवास केला असता. पण माहिती मिळवण्यासाठी, त्याला प्रवास संपवावा लागलाच असता. काहीजण म्हणतात तसे --- प्रोमेथिअसपासून [ पुरातन ग्रीक अग्नीदेवता ] --- काहीजण म्हणतात तसे --- नेरेअसपासून [ ग्रीक समुद्रदेव ]”

जॉर्ज म्हणाला, “खरेच, सर? मी या दोन गृहस्थांबद्दल कधीच ऐकले नव्हते. त्या प्रवासी कंपन्या आहेत का?”

स्वतःचा आवाजाची मजा अनुभवत, पायरो म्हणाला,

“माझा गिऱ्हाईक इमेरी पॉवरला एकच गोष्ट समजते. --- क्रिया! पण गरज नसलेल्या कामी आपली शक्ती वाया घालवणे हे निरुपयोगी आहे. जॉर्ज, जीवनाचा सोनेरी नियम आहे, दुसरे तुमच्याकरता जे करू शकतात, ते करण्यात वेळ घालवू नका.” उठून, पुस्तकांच्या मांडणीकडे जात पायरोने चालू ठेवले, “विशेषतः जेव्हा खर्चाचा काही प्रश्न नसतो.”

त्याने मांडणीमधून D अक्षर लिहिलेली फाईल काढून ‘विश्वासार्ह गुप्तहेर संस्था’ असे लिहिलेल्या पानावर उघडली.

तो पुटपुटला, “जॉर्ज, आधुनिक प्रोमेथिअस कंपनी इतकी दयाळू व मदतीस तत्पर अशी आहे, की ती माझ्यासाठी काही नावे व पत्ते काढून देईल. मेसर्स हॅन्केरटन, न्यूयॉर्क. मेसर्स लदेन व बोशर, सिडनी. सिग्नॉर गिओवानी मेझी, रोम. एम नहुम, स्तमबाउल. मेसर्स रोगेट आणि फ्रँकोनार्ड, पॅरीस.”

जॉर्जने ते संपवेपर्यंत तो थांबला. मग बोलला,

“आणि आता कृपया लिव्हरपूलला जाणाऱ्या गाड्या बघ.”

“हो, सर. तुम्ही लिव्हरपूलला चालला आहात, सर?”

मला वाटते मी चाललो आहे. जॉर्ज, मला पुढेही जावे लागेल. फक्त आताच नाही.''

## चार

तीन महिन्यांनंतर हर्क्युल पायरो खडकाळ जागी उभा राहून अटलांटिक सागराचे निरीक्षण करत होता. समुद्रपक्षी उडत होते व पुन्हा काही कारणाशिवाय दुःखी आवाज काढत, वेगाने खाली येत होते. हवा दमट व ओलसर होती.

हर्क्युल पायरोला वाटत होते, आयर्लंडच्या टोकाला पहिल्यांदा येणाऱ्या लोकांना ते जगाच्या टोकाला पोचले आहेत असे वाटणे, काही असाधारण नव्हते. त्याने त्याच्या आयुष्यात इतकी एकाकी, इतकी दुःखी, इतकी धिक्कारले गेल्याची व इतक्या अविश्वसनीय भूतकाळाची कल्पना कधी केली नव्हती. तिथे सौंदर्य होते, दुःखी, पछाडलेले सौंदर्य होते. सुनसान व अविश्वसनीय भूतकाळाचे सौंदर्य होते. इथे आयर्लंडच्या पश्चिमेला, रोमन्सनी कधी चढाई केली नव्हती. जोरात पाऊले वाजवत ते कधी चालले नव्हते. कधीही नाही. त्यांनी कधीच इथे वस्ती केली नव्हती. नीटनेटका, योग्य व उपयुक्त असा रस्ता कधी बांधला नव्हता. ही

अशी भूमी होती, जिथे सामान्य शहाणपणा आणि जीवनाची शिस्त कधी माहिती नव्हती.

पायरोने खाली त्याच्या चामड्याच्या बुटांकडे पाहिले व सुस्कारा टाकला. त्याला फार उदास आणि एकटे वाटले. ज्या दर्जाने तो रहात होता, तो काही कौतुक करण्यासारखा नव्हता. तिथे बाहेर कुठेतरी, समुद्रात टोक घुसलेले ते छोटे बेट, तारुण्याचा प्रदेश, इतके सवयीचे होते ---

तो स्वतःशी गुणगुणला,

“सफरचंदाचे झाड, गाणारे आणि सोन्याचे --- “

आणि अचानक, हर्क्युल पायरो पुन्हा भानावर आला --- त्याला पडलेली भूल उतरली. तो पुन्हा त्याच्या चामडी बुटांशी व छानशा, गडद करड्या रंगाच्या सूटाशी संधान बांधू लागला.

त्याला फार लांबून नव्हे, घंटेचे टोले ऐकू आले. त्याला तो आवाज समजला. त्याला तरुणपणापासून तो आवाज ओळखीचा होता.

तो कड्याच्या कडेने भरभर निघाला. दहा मिनिटात तो कड्यावरील इमारतीपाशी आला. त्याभोवती उंच भिंत होती. त्यात खिळ्यांनी ठोकलेले लाकडी दार होते. हर्क्युल पायरो त्या दाराशी आला व त्याने दार वाजवले. तिथे वाजवण्यासाठी मोठा लोखंडी

कोयंडा होता. मग त्याने काळजीपूर्वक एक गंजकी साखळी ओढली आणि एक लहानशी भेदक घंटी दरवाज्याच्या आतील बाजूस थोडा वेळ वाजली.

एक लहानसे दार ढकलले गेले व आत एक चेहरा दिसला. पिठासारख्या पांढऱ्या रंगातील तो संशयी चेहरा होता. वरच्या ओठावर ठळक मिशी होती. पण आवाज मात्र बाईचा होता. पायरो त्याला स्त्रीत्वाकडे झुकणारा भीतीदायक आवाज म्हणाला.

तो त्याच्याकडून कामाची अपेक्षा करत होता.

"हे सेंट मेरी व सर्व देवदूतांचे चर्च आहे का?"

बाईचा भीतीदायक आवाज मवाळ स्वरात म्हणाला,

"मग नाहीतर दुसरे काय आहे?"

हर्क्युल पायरोने त्या आवाजाला उत्तर द्यायचा प्रयत्न केला नाही. तो त्या राक्षसाला म्हणाला,

"मला मातेश्वरींना भेटायचे आहे."

तो राक्षस तयार नव्हता. पण शेवटी तो तयार झाला. गज सरकवून, दार उघडले गेले. हर्क्युल पायरोला पाहुण्यांसाठी असलेल्या, एका उजाड खोलीत नेले गेले.

एक जोगीण तिथे अवतरली. तिच्या कंबरेला जपमाळ लोंबत होती.

हर्क्युल पायरो जन्माने कॅथॉलिक होता. त्याला ते वातावरण परिचित होते.

तो म्हणाला, “मातेश्वरी, तसदीबद्दल क्षमस्व. पण मला वाटते, इथे एक काटे कॅसे नावाची जोगीण होती.”

मातेश्वरीने डोके लववून म्हटले,

“हो होती. जोगीण मेरी उर्सुला.”

हर्क्युल पायरो म्हणाला, “इथे काही चुकीचे झाले आहे. ते सुधारायचे आहे. मला वाटते, जोगीण मेरी उर्सुला मला मदत करू शकेल. तिच्याकडे अनमोल अशी माहिती असू शकेल.”

मातेश्वरीने शांतपणे मान हलवून भरल्या सुरात म्हटले,

“जोगीण मेरी उर्सुला तुम्हाला मदत करू शकणार नाही.”

“पण मी तुम्हाला खात्री देतो, की --- “

त्याचे बोलणे अर्धवट राहिले असतांना, मातेश्वरी बोलली,

“ती दोन महिन्यांपूर्वी वारली.

## पाच

जिमी डोनोव्हनच्या हॉटेलमधील बारमध्ये पायरो भिंतीला टेकून, अस्वस्थपणे बसला होता. ते हॉटेल त्याच्या पसंतीस उतरले नव्हते. त्याचा पलंग तुटलेला होता. त्याच्या खोलीच्या दोन खिडक्यांपैकी एका खिडकीची तावदाने फुटलेली होती. त्यामुळे रात्रीच्या गार हवेने पायरोला खूप त्रास झाला होता. त्याला दिले गेलेले गरम पाणी कोमट होते आणि त्याला मिळालेले जेवण जेऊन त्याच्या पोटामध्ये दुखू लागले होते.

बारमध्ये पाच माणसे होती. ती राजकारणावर बोलत होती. त्यातील बरेचसे पायरोला कळत नव्हते. पण त्याला त्याची फारशी पर्वा नव्हती.

आता त्याला असे आढळले, की त्याच्या शेजारी बसलेला एक माणूस इतरांपेक्षा थोड्या वेगळ्या स्तरातील वाटत होता. त्याच्यावर कुप्रसिद्धतेचा शिक्का दिसत होता.

तो फार सभ्यतेने बोलला,

'मी तुम्हाला सांगतो सर, मी सांगतो, पेगीनच्या गर्वाला काही संधी मिळाली नाही. संधी मिळाली नाही --- तिची सद्दी संपणार होती. संपणारच होती. तुम्ही माझे ऐका. प्रत्येकाने माझी सूचना ऐकली पाहिजे. सर, मी कोण आहे माहिती आहे का? ओळखा

बघू. ॲटलास --- सदासर्वकाळ कुरणावर रोखलेला डब्लिनचा सूर्य! मी लॅरीची मुलगी दिली नाही का? पंचवीसला एक --- पंचवीसला एक. ॲटलास बघा आणि तुमचा अंदाज चुकणार नाही.

हर्क्युल पायरोने त्याच्याकडे मान देऊन, पण विचित्रपणे पाहिले. तो थरथरत्या आवाजात बोलला,

“माझ्या मित्रा, हा अपशकुन आहे.

## सहा

काही तासांनंतर, ढगांमागे मधूनमधून चंद्र डोकावतांना दिसत होता. पायरो आणि त्याचा नवीन मित्र काही मैल चालले. पायरो धापा टाकत होता. त्याच्या मनात कल्पना चमकून गेली, की तिथे गावंढ्या गावात चालायला, त्याच्या चामड्याच्या बुटांपेक्षा चांगले बूट हवे होते. खरे तर जॉर्जने मान देऊन, खूपसे काही सांगितले होते. ‘ चांगल्या बुटांच्या जोडी’ बद्दल तो बोलला होता.

पायरोने त्या कल्पनेची पर्वा केली नव्हती. त्याला पायात चांगले, नीटनेटके बूट हवे होते. परंतु आता दगडाधोंड्यातून चालतांना, त्याच्या लक्षात आले की ते दुसरे बूटच ---

त्याचा सोबती अचानक बोलला,

“याकरता अशा तऱ्हेने माझ्यामागे लागणे धर्मगुरूला शोभते का? माझ्या सद्सदविवेकबुद्धीला स्मरून, मृत्युलोकात मी पाप करणार नाही.”

पायरो म्हणाला, “तू फक्त सीझरच्या ज्या गोष्टी होत्या, त्या कापून परत स्थापन करतो आहेस.”

ते चर्चच्या भिंतीशी आले. ॲटलासने त्याची भूमिका करायची तयारी ठेवली.

त्याच्याकडून तो पूर्णपणे नाश पावल्याचा, दुःखाचा व खोलवर उदासीचा हळूवार चित्कार उमटला.

हर्क्युल पायरो अधिकारवाणीने बोलला,

“शांत रहा. तुझ्यावर काही जगाचे ओझे पडलेले नाही. ते फक्त हर्क्युल पायरोचे ओझे आहे.”

## सात

ॲटलास दोन पाच पौंडाच्या नोटा उलगडत होता.

तो आशापूर्णने म्हणाला,

“कदाचित मला सकाळी हे आठवणार नाही, की मी हे कसे मिळवले. मला काळजी आहे की धर्मगुरू ओ’ रेली माझ्यामागे असतील.”

“माझ्या मित्रा, सर्व काही विसरले गेले. उद्याचे जग तुझे असेल.”

ॲटलास गुणगुणला,

“आणि मी त्याचे काय करेन? त्यांच्या कामाच्या मुलाकडे उमदा, छान घोडा आहे. आणि शैला बॉयने आहे. तिच्यावर मला ७ चे ११ मिळतील.”

तो थांबला.

“तू ख्रिश्चन, ज्यू किंवा मुस्लीम नसलेल्या देवाचे नाव खरेच घेतलेस, की मला तसा भास झाला, हर्क्युलस देवाचा विजय असो, असे तू म्हणालास. उद्या साडेतीन वाजता हर्क्युलस पळत असेल.”

पायरो म्हणाला, “माझ्या मित्रा, घोड्यावर तुझे पैसे लाव. मी सांगतो, हर्क्युलस हरणार नाही.”

आणि हे खात्रीने खरे होते, की दुसऱ्या दिवशी मिस्टर रोसलीन हर्क्युलस अगदी अनपेक्षितपणे बॉयनान शर्यत जिंकला, ज्याची बोली १ ची ६० होती.

# आठ

चटपटीत आणि कसबी पायरोने एक गाठोडे नीटपणे सोडवून उघडे केले. पहिल्यांदा पिवळसर कागद, मग कापड व शेवटी जनावरांच्या कातडीचा कागद होता.

इमेरी पॉवरच्या समोर टेबलावर, त्याने सोन्याचा चकाकता कप ठेवला. त्यावर हिरव्या पाचूंच्या सफरचंदाने लगडलेले झाड कोरलेले होते.

पैसे मोजणाऱ्याने एक खोल श्वास घेतला व म्हणाला,

“मिस्टर पायरो, मी तुमचे अभिनंदन करतो.”

हर्क्युल पायरो झुकला.

इमेरी पॉवरने हात पुढे केला. त्याने कपाच्या कडेला स्पर्श केला व त्यावरून बोट फिरवले. खोल आवाजात तो बोलला,

“माझा!”

हर्क्युल पायरोने कबूल केले.

“तुझा!”

इतरांनी सुस्कारा टाकला. तो खुर्चीत मागे झाला व व्यापाऱ्याच्या भाषेत बोलला,

“तुला हा कुठे सापडला?”

हर्क्युल पायरो उत्तरला,

“मला तो चर्चमधील बळीचा नेवैद्य दाखवायच्या कट्ट्यावर सापडला.

इमेरी पॉवरने निरखून बघितले.

पायरोने चालू ठेवले,

“कॅसेची मुलगी जोगीण होती. तिच्या वडीलांच्या मृत्युच्या वेळी ती शेवटची शपथ घ्यायच्या बेतात होती. ती अज्ञानी पण खोलवर धार्मिक प्रवृत्तीची होती. लिव्हरपूलमधील तिच्या वडीलांच्या घरात कप दडवलेला होता. मला वाटते तिने तो तिच्या वडिलांच्या पापांची भरपाई व्हावी म्हणून, तो चर्चमध्ये नेला. तिने तो देवाच्या सेवेसाठी वापरला. मला नाही वाटत की जोगीणींना कधी त्याची किंमत माहिती असेल. त्यांनी बहुधा तो कौटुंबिक वारसा म्हणून घेतला. त्यांच्या दृष्टीने, तो मोठा कप होता व त्यांनी तो तसाच वापरला.”

इमेरी पॉवर म्हणाला,

“असामान्य गोष्ट! तुम्हाला तिकडे जावे असे का वाटले?”

पायरोने त्याचे खांदे घुसळले.

“कदाचित --- वगळण्याच्या कृतीमधून --- आणि नंतर त्यात असामान्य बाब होती की कुणीही तो कप शोधायचा प्रयत्न केला

नव्हता. असे पहा, ते असे दिसत होते, की तिथे सामान्य वस्तूंची किंमत लागू पडत नव्हती. मला आठवले की पॅट्रीक कॅसेची मुलगी जोगीण होती.”

पॉवर मनापासून बोलला,

“ठीक आहे, मी पूर्वी बोललो, मी तुमचे अभिनंदन करतो. मला तुमची फी सांगा आणि मी तुम्हाला चेक देतो.”

हर्क्युल पायरो उत्तरला,

“फी काही नाही.”

सर्वजण त्याच्याकडे बघू लागले.

“म्हणजे काय?”

“तुम्ही लहानपणी कधी परीकथा वाचल्या आहेत का? त्यातील राजा म्हणतो, “तुला काय पाहिजे, ते माग.”

“मग तुम्ही काही मागत आहात?”

“हो. पण पैसे नाही. एक छोटीशी विनंती.”

‘ठीक आहे. ती काय आहे? तुम्हाला बाजारासाठी एखादी मौल्यवान सूचना हवी आहे का?”

“तो तर वेगळ्या रूपातील पैसाच असेल. माझी मागणी त्याहून साधी आहे.”

“ती काय आहे?”

“तो कप परत चर्चमध्ये पाठवा.”

तिथे शांतता पसरली. इमेरी पॉवर म्हणाला,

“तू ठार वेडा आहेस का?”

हर्क्युल पायरोने मान हलवली.

“नाही. मी वेडा नाही. हे बघा, मी तुम्हाला काही दाखवतो.”

त्याने कप उचलला. त्याच्या नखाने झाडाभोवती वेटोळे घातलेल्या सापाच्या तोंडात जोराने दाबले. कप धरायच्या पोकळ कानामधील भोकातून, कपाच्या आतील सोन्याचा थोडासा भाग निखळला.

पायरो म्हणाला,

“पाहिलेत, हा बोर्गीया धर्मगुरूचा प्यायचा कप होता. या लहानशा भोकातून पेयामध्ये आत विष जात असे. तुम्हीच म्हणालात, की या कपाचा इतिहास अनीतीमान आणि दुष्ट आहे. हा कप जवळ असणाऱ्यांच्या मनात रक्तपाताच्या व हिंसाचाराच्या पापी भावना तयार होतात. तुमच्यातदेखील तशा भावना निर्माण होतील.”

“काहीतरी अफवा! अंधश्रद्धा!”

‘असेलही. पण ही वस्तू हवीच, असा तुमचा आग्रह का? तिच्या सौदर्यासाठी तर नव्हे? तिच्या किंमतीसाठी तर नव्हे? तुमच्याकडे शेकडो, कदाचित हजारो सुंदर व दुर्मिळ वस्तू आहेत. ही वस्तू तुम्हाला तुमच्या अभिमानासाठी हवी आहे. तुम्ही असे ठरवले होते, की मी तो कप मिळवेनच. अरे मित्रा, तू हरला नाहीस. तू जिंकला आहेस. कप तुझ्या मालकीचा आहे. पण आता एक बलशाली गोष्ट का करू नये? जिथे तो दहा वर्षे शांतपणे राहिला, तिथे तो परत करून टाक. त्याचे पाप तिथे नाहीसे होऊ दे. एकदा तो चर्चमध्ये होता --- तो परत तिथेच गेलेला बरा! त्याला तिथे परत शुद्ध होऊ द्या. पापापासून मुक्त होऊ द्या. परत त्या वेदीवर विराजमान होऊ द्या. आपण अशी आशा करू, की माणसांनादेखील त्यांच्या पापापासून मुक्ती मिळून, ते पवित्र होतील.”

तो पुढे झुकला.

“मला तो जिथे सापडला, त्या जागेचे वर्णन करू द्या --- शांतीच्या बागेत, पश्चिमेच्या समुद्रावरून विसरलेल्या तारुण्याच्या स्वर्गाकडे व अमर सौदर्याकडे बघत असलेला, असा मला तो सापडला.”

तो साध्या शब्दात, पुढे बोलत राहिला. आयर्लंडच्या टोकाला असलेल्या समुद्रात घुसलेल्या निमुळत्या भागाबद्दल बोलत राहिला.

इमेरी पॉवरने मागे होऊन एक हात डोळ्यांवर धरला व शेवटी बोलला,

“मी आयर्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावर जन्मलो. मुलगा असताना, तिथून निघून अमेरिकेला आलो.”

पायरो सभ्यपणे म्हणाला,

“मी ते ऐकले आहे.”

पैसे देणारा ताठ बसला. त्याचे डोळे पुन्हा गर्विष्ठ झाले. तो ओठांवर फिकटसे हसू खेळवत बोलला,

“मिस्टर पायरो, तू विचित्र माणूस आहेस. तुझ्याकडे तुझ्या अशा वेगळ्या पद्धती आहेत. माझ्या नावाने चर्चमध्ये तो कप देणगी म्हणून देऊन टाक. चांगल्यापैकी महाग भेट. तीन हजार पौंड --- आणि त्या बदल्यात मला काय मिळेल?”

पायरो थंडपणे बोलला,

“जोगिणी तुझ्या आत्म्यासाठी प्रार्थना करतील.”

त्या श्रीमंत माणसाचे हास्य रुंदावले --- हावरट, अधाशी हास्य. तो म्हणाला,

“म्हणजे सरते शेवटी, ही एक गुंतवणूक म्हणावी लागेल. कदाचित मी केलेल्यांपैकी सर्वात उत्तम --- “

## नऊ

चर्चमधील लहानशा खोलीत, हर्क्युल पायरोने त्याची गोष्ट सांगितली. आणि मातेश्वरीला तो मोठा रत्नजडीत कप दिला.

ती गुणगुणली,

“त्याचे आभार मानल्याचे त्याला सांगा. आम्ही त्याच्यासाठी प्रार्थना करू.”

हर्क्युल पायरो सभ्यपणे बोलला,

“त्याला तुमच्या प्रार्थनेची गरज आहे.”

“तर मग तो दुःखी मनुष्य आहे का?”

पायरो बोलला,

“इतका दुःखी आहे, की आनंद म्हणजे काय तेच तो विसरून गेला आहे. तो इतका दुःखी आहे, की तो दुःखी आहे तेच विसरून गेला आहे.”

जोगीण मृदुपणे म्हणाली,

“ओहो, श्रीमंत मनुष्य --- “

हर्क्युल पायरो काही बोलला नाही --- कारण त्याला माहिती होते, बोलण्यासारखे काही नव्हते ---

*{खालील चित्र हे हेस्पेरीड्सच्या बागेतील सोनेरी सफरचंदाचे झाड आहे. हेराचे झिअससशी [ देवांचा राजा ] लग्न होते, तेव्हा तिला हे गेआकडून भेट म्हणून मिळते. लॅडॉन नावाचा ड्रॅगन त्याचे रक्षण करत असतो. बागेची देखरेख टायटन देवाच्या मुली असलेल्या संध्याकाळच्या पऱ्या करत असतात. ही ग्रीक पुराणातील कथा असून हे चित्र या गोष्टीतील कपावर कोरलेले असते. अशा तऱ्हेने या रत्नजडीत कपाला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असते.}*



# Capture of Cerberus

## सर्बेरस कुत्र्यावरील पकड



हर्क्युल पायरो ट्यूब रेल्वेमध्ये मागेपुढे होऊन लोकांवर आपटत होता. त्याने विचार केला की जगात फार लोक आहेत. खरेच लंडनच्या भूमीखालील रेल्वेच्या जाळयात, यावेळी [संध्याकाळचे ६-३० ] फारच गर्दी होती. उष्मा, आवाज, गर्दी व गोंधळ होता. हातांचा, दंडांचा, खांद्यांचा, शरीराचा नकोसा दाब! परक्या लोकांचा घेराव --- एकंदरीत [त्याने अरुचीने विचार केला.]

रुचीहीन परक्या लोकांची गर्दी! बहुतांश मानवता काही आकर्षक नव्हती. किती क्वचित एखादा बुद्धीने चमकणारा चेहरा दिसतो. हे किती दुर्दैव आहे! पोषक परिस्थिती नसलेल्या बायकांचे विणकाम करण्यास भाग पडणारे नशीब! विणताना बाई चांगली दिसत नाही. चष्मा लावून त्यात गुंतलेली व अथकपणे बोटे चालवणारी! रानटी मांजरासारखे सहजतेने भरभर विणणे व नेपोलियनसारख्या प्रबळ इच्छेने गर्दीच्या ट्यूब रेल्वेत विणत रहाणे. पण स्त्रिया ते जमवतात. जर त्या बसायला जागा मिळवू शकल्या तर लगेच त्यांची विणकामाची गुलाबी रंगाची पट्टी बाहेर पडते आणि विणायच्या सुयांचा क्लिक क्लिक आवाज सुरु होतो.

पायरोने विचार केला, विश्रांती नाही, स्त्रीत्वाचा डौल नाही. त्याचा वयस्क आत्मा ताणामुळे व आधुनिक जगाच्या घाईगर्दीमुळे, बंड करून उठला. त्याच्या आजूबाजूच्या सर्व तरुण स्त्रिया --- एकसारख्या एक, इतक्या गोडवारहित, आकर्षक/खानदानी स्त्रीत्वाची वानवा असलेल्या! त्याने त्यांच्याकडून आकर्षकतेमुळे येणाऱ्या आत्मविश्वासाची व नखऱ्यांची अपेक्षा केली. आहा, वागण्याच्या आधुनिक पद्धतींनी सुसज्ज, फॅशनेबल, सहानुभूतीपूर्ण, शहाणी --- शरीरावर वळणे असणारी, छानपैकी महागाईचे कपडे घातलेली बाई! पण आता --- आता ---

एका स्टेशनवर गाडी थांबली. लोक गर्दीने बाहेर पडले. त्यांनी पायरोला विणकामाच्या सुयांच्या टोकावर मागे ठेवले. त्याला सार्डीन माशासारखे त्याच्याशेजारील उतारूंच्या अजून जवळ सोडले. धक्का बसून, गाडी परत सुरु झाली. पायरो एका मोठे बोजे असलेल्या बळकट बाईच्या अंगावर फेकला गेला. तिथून उडून तो एका बारीक माणसाच्या बॅगेवर पाठीवर आदळला.

तो ‘माफ करा’ असे बोलला. त्याच्या मिशा ओल्या व सरळ झाल्याचे त्याला जाणवले. अरे बापरे, पुढच्या स्टेशनला त्याला उतरायचे होते. ते पिकॅडेली सर्कस असल्याने, त्या स्टेशनवर अजून शंभर दीडशे लोकांना उतरायचे होते. भरतीच्या मोठ्या लाटेप्रमाणे, ते सगळे फलाटावर ओतले गेले. परत पायरो वर जायच्या जिन्यावर भयानक गर्दीत सापडला.

पायरोने पाताळात असल्यासारखा विचार केला, की वर चढणाऱ्या माणसाची बॅग मागील बाजूने त्याच्या गुडघ्यात घुसल्याने किती जोराने दुखले!

त्याच क्षणी त्याला किंचाळून त्याचे नाव घेतलेले ऐकू आले. त्याने त्याचे डोळे उचलून वर पाहिले. पलीकडील खाली जाणाऱ्या जिन्यावर, त्याच्या आविश्वसनीय डोळयांनी भूतकाळातील एक दृष्य पाहिले. स्वतःच्या फॅशनच्या आत्मविश्वासाने दुसऱ्याला

आकर्षित करू बघणारी, तिच्या चैनबाज सोनेरी केसांवर स्ट्रॉंचा लहानसा मुगुट घातलेली, ठळकपणे रंगीत पिसांच्या पक्षांचा कपडा घातलेली व खांद्यावरून महागाईचे फर लोंबणारी एक स्त्री, त्याला दिसली.

तिचे लालसर तोंड आ वासलेले होते. तिच्या मोठ्या परदेशी आवाजाचा प्रतिध्वनी येत होता. तिची फुफ्फुसे दमदार असावीत. ती किंचाळली, "तो आहे! नक्कीच तो आहे! माझ्या मित्रा, हर्क्युल पायरो! मी आग्रह धरते, आपण परत भेटायला हवे."

पण दोन विरुद्ध दिशांनी जाणाऱ्या जिन्यांची वागणूक त्यांच्या नशीबापेक्षा जोरदार होती. संथपणे व अपराधी वाटून न घेता, पायरो वर गेला आणि ती उमरावाची बायको वाटणारी, वेरा रॉसाकोफ खाली आली

कडेने वाट काढत, कठड्यावर वाकत, पायरो आकांताने ओरडला, "बाईसाहेब, तुम्ही मला कुठे सापडाल?"

खालून तिचे बारीक आवाजात उत्तर आले, "पाताळात --- "
त्याची अपेक्षा नव्हती, तरी ते त्याक्षणी विचित्रपणे विरुद्ध वाटले.

पायरोने डोळे मिचकावले. परत मिचकावले. अचानक तो पायांनी सरकत वरती पोचला --- पायऱ्यांकडे नीट लक्ष दिले नाही. त्याच्याभोवती गर्दी जमली. थोड्या एका बाजूला गर्दीचा गठ्ठा

खाली जाणाऱ्या जिन्यासाठी धक्काबुक्की करत होता. त्याला त्यांच्यात मिसळायचे होते का? बाईसाहेबांना तसे म्हणायचे होते का? त्या गर्दीच्या वेळी पृथ्वीच्या पोटात वावरणे म्हणजे पाताळच होता. जर बाईसाहेबांना तसे म्हणायचे असेल, तर त्याचा नाईलाज होता ---

ठामपणे पायरोने वाट ओलांडली व खाली जाणाऱ्या गर्दीला तोंड देऊ लागला. असे करतांना परत खाली आला. जिन्याच्या तळाशी बाईसाहेबांचा काही पत्ता नव्हता. पायरोला निळे पिवळे प्रकाश दिसू लागले.

ती स्त्री पिकॅडेली लाईनवर होती की बॅकरलू? पायरो प्रत्येक फलाटावर आळीपाळीने गेला. तो गाडी पकडणाऱ्या अथवा गाडीतून उतरणाऱ्या गर्दीत चेचला गेला. पण कुठेच त्याला ती भपकेबाज रशियन स्त्री, वेरा रॉसाकोफ दिसली नाही.

दमलेला, धक्के खाल्लेला, भयंकर चिडलेला पायरो परत एकदा खाली आला आणि पिकॅडेली सर्कसच्या गर्दीत उतरला. आनंदाने उद्दीपित होऊन, तो घरी पोचला.

भपकेबाज व नखरेल स्त्री न भेटणे, हे त्या छोट्या माणसाचे दुर्दैव होते. त्याला त्या बाईचे किती आकर्षण होते, ते तो सांगू शकत नव्हता. जरी तो वीस वर्षांपूर्वी तिला शेवटचे भेटला होता, तरी ती

जादू अजून शिल्लक होती. जरी चित्रकाराने रंगवलेल्या सूर्यास्तासारखा तिचा मेकप दिसत असला, तरी त्याखालील स्त्री ,पायरोला अजूनही पूर्वीसारखीच श्रीमंत व छान दिसत होती. ती छोटीशी मध्यमवर्गीय स्त्री उमरावांमुळे अजूनही शहारून जात होती. ती मोठ्या खुबीने दागिने चोरून तिच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव करून घेत असे. तिला त्या संपत्तीबद्दल कर लावला गेला, तेव्हाचा तिचा ते कबूल करायचा मोठा आत्मविश्वास त्याला आठवला. हजारातील एखादी बाई --- लाखातील! ती त्याला दिसली आणि गुप्त झाली.

“पाताळात.” ती म्हणाली होती. त्याच्या कानांनी त्याला फसवले होते का? ती तसे म्हणाली होती का?”

पण त्याचा अर्थ काय होता? तिला लंडनची भूमीखालील रेल्वे, असे म्हणायचे होते का? की तिचे शब्द धार्मिक दृष्ट्या घ्यायचे होते? नक्कीच तिचे स्वतःचे जीवन जगणे, म्हणजे जीवनानंतरचे आयुष्य पाताळत काढायची हमी होती. नक्की --- नक्कीच तिचा रशियन नम्रपणा पायरो त्याच जागी भेटेल असे सुचवत नव्हता.

नाही. तिला नक्कीच वेगळे काही म्हणायचे होते ---हर्क्युल पायरो घाबरून कसनुसा झाला. जेव्हा ती अवतीर्ण होते, तेव्हा ती

काय करेल, याचा काही नेम नसतो. ती वरच्या पट्टीत ‘रिट्झ’ किंवा ‘क्लॅरीड्ज’ असे ओरडली असेल का? पण वेरा रॉसाकोफ अशक्यपणे उदास आवाजात ओरडली होती, ‘पाताळ’!”

पायरोने एक सुस्कारा टाकला. पण त्याने हार मानली नाही. त्याच्या गोंधळलेल्या अवस्थेत त्याने साधा आणि सरळसोट उपाय काढला. त्याने दुसऱ्या दिवशी सकाळी त्याची सचिव, मिस लेमन हिला विचारले.

मिस लेमन फारच कुरूप होती, पण फारच चटपटीत होती. तिच्यासाठी पायरो, कुणी खास नव्हता --- फक्त तिचा मालक होता. ती त्याचे काम उत्तम करे. तिचे खासगी विचार आणि स्वप्ने नवीन पद्धतीने कामाचे कागद एकत्र लावण्याबद्दल चालू होते. तिच्या मनातील मोकळया वेळात ती तोच विचार करत होती.

“मिस लेमन, मी तुम्हाला एक प्रश्न विचारू शकतो का?”

टंकलेखन करताकरता बोटे बाजूला घेऊन, पूर्ण लक्ष देऊन, ती बोलली, “मिस्टर पायरो, अर्थात विचारा.”

“जर तुम्हाला एखाद्या मित्राने पाताळात भेटूया, असे म्हटले तर तुम्ही काय कराल?”

नेहमीप्रमाणे, जराही न थांबता मिस लेमनला सर्व उत्तरे माहिती असल्याप्रमाणे, ती बोलली, “मला वाटते, त्या मित्राला फोन करणे ठीक राहील.

पायरो तिच्याकडे आश्चर्याने बघत राहिला. तो बेफिकीरीने बोलला, “तुम्ही तो --- फोन --- कराल --- का?”

मिस लेमनने मान डोलावून फोन तिच्याजवळ ओढला. “आज रात्री का?” असे विचारून व तो काही न बोलल्याने, तसे गृहीत धरून, तिने लगेच फोन नंबर फिरवला. “टेम्पल बार १४५७८? हे पाताळ आहे का? कृपया तुम्ही हर्क्युल पायरोच्या वतीने दोघांसाठी टेबल राखून ठेवाल का?”

तिने फोन ठेऊन दिला व परत तिची बोटे टंकलेखन करू लागली. तिच्या चेहऱ्यावर अगदी पुसटपणे अधीरपणाचे भाव तरळून गेले. तिने तिचे काम केले आणि तिच्याकडे बघून तिला असे म्हणायचे असल्याचे वाटले, की आता तिचा मालक तिला तिचे काम करू देईल का? पण पायरोला स्पष्टीकरण हवे होते.

त्याने विचारले, “हे पाताळ काय होते?”

मिस लेमनला थोडे नवल वाटले. “ओहो, मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती नाही का, की तो रात्रक्लब आहे --- अगदी नवीन व सध्याचा सर्वात चांगला क्लब आहे. मला वाटते, तो एक रशियन

बाई चालवते. मी या संध्याकाळपूर्वी सहज तुम्हाला त्याचे सभासद बनवू शकते.”

तर इतका वेळ फुकट घालवून [ असे तिला वाटणे क्रमप्राप्त होते. ] मिस लेमनने तिचे टंकलेखनाचे काम वेगाने सुरु केले.

त्या रात्री अकरा वाजता, पायरो वर एकेक अक्षर चमकत असलेल्या दाराशी पोचला. लाल कपड्यातील एका माणसाने त्याचे स्वागत करून, त्याचा कोट उतरवला. त्याने खाली जाणाऱ्या जिन्याकडे खूण केली. प्रत्येक पायरीवर एक वाक्प्रचार लिहिलेला होता. पहिला असा होता, “मी छान आहे”, दुसरा असा होता, “पहिली पाटी स्वच्छ पुसून नव्याने सुरवात करा.”, तिसरा होता, “मला आवडेल तेव्हा मी काहीही सोडू शकतो”

पायरो वाखाणणी करत पुटपुटला, “पाताळाकडे जातानाच्या रस्त्यावर हे चांगले लिहिले आहे. ही चांगली गोष्ट आहे.” तो जिना उतरला. खाली पाण्याचा तलाव होता. तिथे शेंदरी लिलीची झुडुपे होती. त्याच्यावरून जाणारा बोटीच्या आकाराचा पूल होता. पायरो त्यावरून गेला.

तिथे उजवीकडे संगमरवरी कृत्रिम गुहा होती. तिथे पायरोने कधी न बघितलेला असा भला दांडगा, कुरूप व काळा कुळकुळीत कुत्रा बसला होता. त्याने विचार केला, [ आणि आशा केली ]

कदाचित तो खरा नसेल. तो अगदी सरळ, पण वयाने थोडा वाकलेला असा, अचलपणे बसला होता. पण त्याच वेळी त्याने त्याचे कुरूप, भयानक डोके वळवले आणि त्याच्या काळ्या शरीरातून, एक खर्जातील गुरगुरण्याचा आवाज निघाला. तो आवाज भीतीदायक होता.

मग पायरोच्या लक्षात आले, की तिथे एक सजवलेली, गोल, लहानशी कुत्र्याच्या बिस्कीटांची टोपली होती व त्यावर सर्बेरससाठी असे लिहिलेले होते.

कुत्र्याचे डोळे त्याच्यावर खिळले गेले होते. परत एकदा खर्जातील गुरगुरण्याचा आवाज आला. पायरोने पटकन बिस्कीट उचलून त्या दांडग्या कुत्र्यापुढे फेकले. मोठ्या गुहेसारखे तोंड उघडले गेले. जबडा मिटताना अचानक काही तुटल्याचा आवाज आला. सर्बेरसने त्याचे खाणे स्विकारले होते. पायरो उघड्या दारातून आत शिरला.

आतील खोली फार मोठी नव्हती. त्यात छोटी छोटी टेबले टाकलेली होती. मध्यभागी नाचायचा मंच होता. तो लहान लाल दिव्यांनी सजवला होता. भिंतींवर चित्रे काढलेली होती. पलीकडे दूरवर शेवटी मोठ्या लोखंडी जाळीमागे शेपट्या व शिंगे असलेले जणू राक्षस वाटावेत, असे वेटर्स उभे होते.

वेरा रॉसाकोफने तिच्या जोरदार रशियन परिणामकारकपणे आकर्षक, भपकेबाज असे महागाईचे संध्याकाळचे कपडे घातले होते. हे सगळे पायरोने पूर्वी पाहिले होते. ती हात पसरून पायरोवर खाली वाकली.

“ओहो, तू आलास! माझ्या आवडत्या, फार प्रिय मित्रा, तुला परत पाहून किती आनंद झाला! किती वर्षांनी --- किती बरं? नाही, आपण ती मोजत बसणार नाही. माझ्यासाठी ते काल घडल्यासारखेच आहे. तू काही बदलला नाहीस --- तुझ्यात काहीच फरक पडलेला नाही.”

पायरो तिच्या हातावर झुकत म्हणाला, “प्रिय वेरा, तुझ्यातदेखील काही फरक पडलेला नाही. तरीही तो सावध होता शेवटी वीस वर्षे म्हणजे वीस वर्षे. खरे सांगायचे तर, ती थोडी खराब झाली होती. पण तरीही ती प्रेक्षणीय दिसत होती. उत्साह, जीवनानंद उपभोगण्याची लालसा, हे सर्व होतेच आणि एखाद्या माणसाला घायाळ कसे करावे, हे तिला चांगले माहिती होते. तिने पायरोला ओढत, अजून दोन माणसे बसलेल्या टेबलाशी नेले.

तिने जाहीर केले, “माझा मित्र, माझा प्रसिद्ध मित्र, पापी लोकांचा कर्दनकाळ असलेला मिस्टर हर्क्युल पायरो! एके काळी

मीदेखील त्याला घाबरत होते. पण आता मी टोकाचे गुणी व नीरस आयुष्य जगते, नाही का?

एक उंच वयाने मोठा माणूस बोलला, "नीरस असे कधी म्हणू नकोस."

तिने जाहीर केले, "ज्याला भूतकाळाबद्दल सगळे माहिती आहे व ज्याने मला हे पाताळ सजवण्यासाठी बहुमूल्य सूचना दिल्या, असा प्राध्यापक लीस्केआर्ड."

पुरातत्वशास्त्रज्ञ थोडा शहारला. तो पुटपुटला, "जर मला तुम्ही काय करत होतात, ते माहिती असते, तर परिणाम धक्कादायक झाला असता."

पायरोने भिंतीवरील चित्रे जवळून बघितली. त्याच्या समोरील भिंतीवर ऑरफेअस [ ग्रीक कवी व संगीतकार ] व त्याचा जाझचा बँड रंगवलेला होता, तर त्याच्या विरुद्ध भिंतीवर ओसिरीस आणि आयसीस यांची इजिप्शियन गुन्हेगारांच्या छुप्या जगाची बोटीतील मेजवानी रंगवली होती. तिसऱ्या भिंतीवर कोणी चमकदार तरुण नैसर्गिक अवस्थेत स्त्रियांबरोबर अंघोळीचा आनंद लुटत होते.

वेराने स्पष्ट केले, "तरुणांचा देश --- ही माझी छोटी ॲलीस."

पायरोने टेबलावरील चौकडीच्या कोटातील एक भयंकर दिसणाऱ्या मुलीला अभिवादन केले. तिने शिंगांचा चष्मा घातला

होता. वेरा म्हणाली, "ती खूप खूप हुशार आहे. ती पदवीधर असून मानसशास्त्रज्ञ आहे. तिला वेडे हे, वेडे का व कसे होतात, ते माहिती आहे. तुम्हाला वाटते तसे ते वेडे म्हणून वेडे नसतात. त्याची वेगवेगळी कारणे असतात. मला ते सर्व फार विशेष वाटते."

ती ॲलीस दयाळूने हसली. पण जरा मानभावीपणे! तिने प्राध्यापकाला ठाम आवाजात विचारले की त्याला नाचायला आवडेल का, तर तो गार पडून, कां कू करू लागला.

"अग तरुण मुली, मला फक्त वाल्ट्झ येते."

ॲलीस शांतपणे म्हणाली, "हे वाल्ट्झच आहे."

ते उठले व नाचू लागले. त्याना नीट नाचता येत नव्हते. वेरा रॉसाकोफने एक सुस्कारा टाकला. तिच्या विचारांच्या गाडीला अनुसरून, ती बोलली, "आणि तरीही ती दिसायला काही फार वाईट नाही --- "

पायरो कायदेशीरपणे बोलला, "ती फार नखरे करत नाही. वेरा ओरडली, "मला आताच्या तरुण मुलींचे काही कळतच नाही. त्या कुणाला खूष करायचा प्रयत्न करत नाहीत. माझ्या तरुणपणी मी नेहमी तसे करायची --- मला शोभणारे रंग --- फ्रॉकच्या आत थोडे पॅडीग वापरणे --- कंबरेभोवती घट्ट कापड गुंडाळणे --- केसांना जरा रुचीपूर्ण छटा देणे – " तिने कपाळावरील चमकदार सोनेरी बटा

मागे सारल्या --- ती अजूनही कसून --- अगदी कसून प्रयत्न करत होती! तुम्हाला नैसर्गिक रीत्या जे मिळाले आहे, त्यात समाधान मानणे --- हा मूर्खपणा आहे. हे चढेल पणाचे आहे. छोटी ॲलीस लैंगिकतेबद्दल लांबलचक शब्दांची पानेच्या पाने लिहिते. पण मी तुम्हाला विचारते, किती वेळा तिला कोणी मनुष्य असे सुचवतो, की आपण शनिवार रविवार ब्रिघटनला जायचे का? सर्व काही फक्त लांबलचक शब्द, आणि काम, कामगारांचे कल्याण आणि जगाचे भवितव्य! मी तुम्हाला विचारते, हे योग्य व आनंदी आहे का? आणि हे पहा, मी तुम्हाला विचारते, या तरुण मंडळींनी जग कसे अंधारी व नीरस करून टाकले आहे. सर्व ठिकाणी नियम आणि मनाई! मी तरुण असतांना असे नव्हते.''

''बाईसाहेब, मला यावरून आठवण झाली, तुमचा पुत्र कसा आहे? शेवटच्या क्षणी त्याने वीस वर्षे गेल्याचे स्मरून, छोटा मुलगा न म्हणता, पुत्र म्हटले. वेराचा चेहरा मातृसुखाच्या उत्साहाने उजळला. ती बोलली, 'माझा लाडका देवदूत! आता इतका मोठा झाला आहे. असे रुंद खांदे आणि देखणा. तो अमेरिकेला आहे. तो पूल, बँका व हॉटेले बांधतो. अमेरिकनांना हवे असलेले काहीही!''

पायरो थोडा कोड्यात पडलेला वाटला.

''म्हणजे तो इंजिनिअर आहे? की वास्तुविशारद?

वेरा म्हणाली, "“त्याने काय फरक पडतो? तो खूप आनंद मिळवतो आहे. तो लोखंडी सळयांमध्ये व यंत्रांमध्ये गुंतून पडला आहे. आणि ताण नावाच्या गोष्टीत. ताण ही काय गोष्ट आहे, हे मला जराही माहिती नाही. पण आम्ही नेहमीच एकमेकांवर प्रेम करतो व मान देतो. केवळ त्याच्यासाठी मी ॲलीसला थोडा मान देते. अरे हो. त्यांचे लग्न ठरले आहे. ते बोटीवर, गाडीत, विमानात किंवा कामगारांच्या कल्याणावर बोलतांना भेटले व प्रेमात पडले. आता जेव्हा ती लंडनला येते, तेव्हा मला भेटायला येते आणि मग मी तिला माझ्या हृदयाशी धरते. वेरा तिच्या हातांची फुल्ली करून छातीवर ठेवते व म्हणते, “तू आणि निकी एकमेकांवर प्रेम करता --- त्यामुळे मी पण तुमच्यावर प्रेम करते --- पण तू जर त्याच्यावर प्रेम करतेस, तर त्याला अमेरिकेत ठेऊन का आली आहेस? मग ती तिच्या कामाबद्दल व ती लिहित असलेल्या पुस्तकाबद्दल बोलते. खरे सांगायचे तर मला त्यातले काही समजत नाही. पण मी नेहमी म्हणते, “प्रत्येकाने सहनशील असले पाहिजे. माझ्या मित्रा, मी आता जे सांगितले, त्याबद्दल तुला काय वाटते?” हे सगळे ती एका दमात बोलली.

पायरो पसंती देत, त्याच्या आजूबाजूला पहात म्हणाला, “हे कल्पनारम्य आहे. हे फॅशनेबल व डौलदार आहे.”

ती जागा भरली होती. तिला बिनचेहऱ्याचे बिनचूक यश मिळाले होते. तिथे संध्याकाळच्या कपड्यात अशक्त जोड्या आलेल्या होत्या. बोहेमियन लोक चुण्या असलेल्या जाड सुती कपड्यात होते. सुदृढ सभ्य लोक सुटाबुटात होते. राक्षसासारखे कपडे केलेले बँडवाले छान संगीत वाजवत होते. तिथे पाताळ उभा केला गेला होता, यात काही संशय नव्हता.

वेरा बोलली, ‘आपल्याकडे सर्व प्रकारचे लोक आहेत. तसेच असायला पाहिजेत, नाही का?”

पायरो म्हणाला, “पाताळाचे दरवाजे सर्वांसाठी उघडे आहेत? मला वाटते फक्त गरीब सोडून सर्वांसाठी.”

वेरा हसली. “आपल्याला असे सांगितले जात नाही का, की श्रीमंतांसाठी स्वर्गाचे दरवाजे उघडणे अवघड आहे. त्यामुळे त्याला पाताळात सहज प्रवेश असणार.”

प्राध्यापक आणि ॲलीस टेबलाकडे परत येत होते. वेरा उठली. “मला अरीस्टीडेशी बोलायला हवे.” ती राक्षस झालेल्या नम्र मुख्य वेटरबरोबर काही बोलली व टेबलाटेबलांमधून पाहुण्यांशी बोलत फिरू लागली.

प्राध्यापकाने कपाळ पुसत व वाईनचा पेला घोटघोट पित शेरा मारला, “ती चांगल्या व्यक्तिमत्वाची मुलगी आहे, नाही का?

लोकांना तसे वाटते." तो माफी मागत दुसऱ्या टेबलावरील कुणाशी तरी बोलायला गेला. कडक ॲलीसबरोबर पायरो एकटाच राहिल्यामुळे व तिचे थंड निळे डोळे भेटल्यामुळे, थोडासा बावरून गेला. त्याच्या लक्षात आले, की खरे तर ती दिसायला चांगली होती. पण त्याला ती पूर्णपणे नाराज वाटली.

तो पुटपुटला, "मला अजून तुझे आडनाव माहिती झाले नाही."

"कनिंगहॅम. डॉ ॲलीस कनिंगहॅम. तुमची वेराशी ओळख गेल्या काही दिवसातील का?"

"मला वाटते, वीस वर्षांपूर्वीची असावी."

डॉ ॲलीस कनिंगहॅम बोलली, "मी आता लग्न करणार असलेल्या माणसाची आई म्हणून मला तिच्यात रुची आहे. पण मला तिच्या व्यावसायिकतेचीदेखील ओळख करून घ्यायची आहे."

"खरे का?"

"हो. मी गुन्हेगारी मानसशास्त्रावर एक पुस्तक लिहिते आहे .मला या रात्रक्लबमधील आयुष्य झगमगाटी वाटले. आमच्याकडे इथे गुन्हेगारी जगातले बरेच लोक नियमितपणे येतात. मी त्यांच्यापैकी काहीजणांजवळ त्यांच्या आधीच्या आयुष्याबद्दल

बोलले. अर्थात तुम्हाला वेराच्या गुन्हेगारी प्रवृत्ती माहिती आहेत --- म्हणजे ती चोऱ्या करत असे वगैरे?"

थोडे मागे होत पायरो बोलला, "का, हो --- मला माहिती आहे."

"मी याला मॅगपाय गंड म्हणते. तुम्हाला माहिती आहे, ती नेहमी चमचमणाऱ्या वस्तू घेते. पैसे कधीच नाही तर नेहमी रत्ने! मी असे शोधून काढले, की लहानपणी तिला खूप मजा घेत वाढवले गेले व सतत संरक्षितपणे ठेवले गेले. तिच्यासाठी आयुष्य असहनीय रीत्या सपक होते. तिच्या स्वभावानुसार तिला काही मोठे, नाटकी घडावे, असे वाटत असणार. त्यामुळे ती स्वतःला शिक्षा करून घेण्यासाठी तरसली होती. तिच्या चोऱ्यांच्या व मजेच्या मागे हे आहे. तिला स्वतःला महत्व हवे होते. म्हणून प्रसिद्ध होण्यासाठी शिक्षा करून घेणे आले --- येनकेन प्रकारेण!"

पायरोने हरकत घेतली, "रशियन क्रांतीच्या वेळी पुरातन काळातील सरकारी सभासद असल्याने, ती सुरक्षित होती आणि तिचे आयुष्य नीरस होते, असे असेल का?"

मिस कनिंगहॅमच्या फिकट निळ्या डोळ्यात मनोरंजन झाल्याचा भाव आला. ती म्हणाली, "ओहो, रशियन क्रांतीच्या

वेळी पुरातन काळातील सरकारी सभासद? तिने तुम्हाला हे सांगितले का?"

तिने तिच्या मागील आयुष्यातील सांगितलेल्या अस्वस्थ करणाऱ्या रानटी आठवणी मागे टाकत, पायरो प्रामाणिकपणे म्हणाला, "ती नक्कीच उमराव घराण्यातील असणार."

"एखाद्याची इच्छा असेल, तर त्याचा त्या गोष्टीवर विश्वास बसतो." व्यावसायिकतेने बघत मिस कनिंगहॅम बोलली.

पायरो सावध झाला. क्षणभरात त्याला कळले, की त्याचा वेराबद्दलचा ग्रह काय आहे, हे त्याने सांगावे. त्याने चेंडू पलीकडील भिडूच्या कोर्टात टाकायचे ठरवले. उमरावाच्या तोडीच्या साम्राज्यामुळे, त्याला वेराची सामाजिकता थोडीशी आवडत होती. एका मानसशास्त्रात पदवी मिळवलेल्या मोठ्या डोळ्यांच्या चष्मिस मुलीपायी तो त्याची करमणूक बिघडू देणार नव्हता!

त्याने विचारले, "मला आश्चर्यकारक काय वाटले, माहिती आहे का?"

ॲलीसने अनेक शब्द वापरून हे मान्य केले नाही, की तिला ते माहिती नाही. तिने कंटाळा आला होता, तरी उदारपणाचा आव आणून, स्वतःचे समाधान करून घेतले

पायरो बोलत राहिला, "याचे मला नवल वाटते, की जे तरुण आहेत --- ज्यांनी थोडे श्रम घेतले, तर ते छान दिसू शकतात --- तर मला याचे नवल वाटते, की तरी ते तसे करत नाहीत. तुम्ही गोल्फ खेळत असल्यासारखे खिसेवाला जड कोट आणि स्कर्ट घालता. पण हे गोल्फचे मैदान नाही. हे ७१ फॅरनहाईट तापमानाचे जमिनीखालील हॉटेल आहे. तुमचे नाक गरम होऊन चकाकत आहे. पण तुम्ही त्यावर पावडर लावत नाही. आणि तुम्ही लिपस्टिक लावताना ओठांच्या वर्तुळाकाराची पुरेशी काळजी घेत नाही. तुम्ही एक स्त्री आहात. पण तुम्ही स्त्रीत्वाची काळजी घेत नाही. आणि मी म्हणतो, का घेत नाही? हे दयनीय आहे."

थोडा वेळ त्याला मिस "कनिंगहॅम पुरुष माणसासारखी दिसल्याचे समाधान मिळाले. त्याला तिच्या डोळ्यात रागाची ठिणगी दिसली. नंतर तिने परत समाधानाने हसण्याचा दृष्टीकोन पत्करला.

"प्रिय मिस्टर पायरो, मला भीती वाटते, तुम्ही आधुनिक आदर्शांच्या बाबतीत कोसो मैल दूर आहात. तुमची मूळ तत्वे कशी आहेत हे महत्वाचे आहे, वरवरचे दिसणे नव्हे."

एक काळा पण फार देखणा मनुष्य त्यांच्याकडे येऊ लागल्यावर, तिने वर पाहिले. ती उत्साहाने म्हणाली, "हे फार

रुचीपूर्ण आहे. पॉल व्हॅरेस्को! तो बायकांवर जगतो आणि तो नैतिक दृष्ट्या भ्रष्ट अशा लालसा असलेला आहे! तो तीन वर्षांचा असतानाच्या त्याच्या दाईबद्दल तो मला काही सांगणार आहे.”

दोन तीन मिनिटांनी ती त्या तरुणाबरोबर नाचत होती. तो सुरेख नाचत होता. ते जेव्हा पायरोच्या टेबलाजवळ आले, तेव्हा पायरोने तिला असे बोलताना ऐकले, “बोगनॉर येथील उन्हाळ्यानंतर तिने तुला खेळण्यातील क्रेन दिली? क्रेन? --- हं, हे फार सूचक आहे.”

क्षणभर पायरोने असा विचार केला, की गुन्हेगारांच्या प्रकारात रस घेणाऱ्या मिस कनिंगहॅमचे जखमी विद्रूप शरीर एकाकी जंगलात सापडले आहे. त्याला ॲलीस कनिंगहॅम आवडली नाही, पण तो प्रामाणिक असल्यामुळे, त्याचे कारण असे होते, की हे स्पष्टपणे दिसत होते, की ती हर्क्युल पायरोच्या व्यक्तीमत्वाने भारावून गेली नव्हती. त्याचा गर्विष्ठपणा नडत होता.

नंतर त्याला असे काही दिसले, की ॲलीस कनिंगहॅम त्याच्या डोक्यातून गेली. पलीकडील बाजूच्या टेबलाजवळील फरशीवर, एक छान केसांचा तरूण बसला होता. त्याने संध्याकाळचे कपडे घातले होते. त्याच्याकडे बघून असे वाटत होते की त्याने सगळे आयुष्य चैनीत व आरामात घालवले आहे. त्याच्यासमोर

उजवीकडे एक श्रीमंत मुलगी बसली होती. तो तिच्याकडे मूर्खासारखे निरर्थकपणे पहात होता. त्यांच्याकडे बघणारे कोणीही पुटपुटले असते, "मूर्ख श्रीमंत!" तरी पायरोला माहिती होते, की तो तरुण श्रीमंत नव्हता व आळशीदेखील नव्हता. खरे तर तो गुप्तहेर इन्स्पेक्टर चार्ल्स स्टीव्हेन्स होता. आणि पायरोला अशी शक्यता वाटली, की तो इथे काही कामासाठी आलेला होता.

## दोन

दुसऱ्या दिवशी सकाळी पायरो स्कॉटलंड यार्डमध्ये मुख्य इन्स्पेक्टर जापला भेटायला गेला. इकडच्या तिकडच्या चौकशांनंतर अनपेक्षितपणे जापने त्याचे स्वागत केले. तो प्रेमाने म्हणाला, "काय रे जुन्या लबाड मित्रा, तू कसा काय बरोबर वेळेवर येतोस, हे एक कोडेच आहे!"

"पण मी तुला खात्रीने सांगतो, मला काहीही माहिती नाही --- अगदी काहीही नाही. मी सहज नेहमीच्या उत्सुकतेने आलो."

जाप पायरोला म्हणाला की तो असे नाविक दलातील लोकांना सांगू शकतो.

"तुला 'पाताळ' या जागेबद्दल सर्व काही जाणून घ्यायचे आहे का? वरवर पहाता, हे नेहमीसारखे हॉटेल आहे, पण काहीतरी गोम

आहे. जरी खर्च खूप असला, तरी ते अती पैसा कमावत असावेत. हे संशयास्पद रीत्या खरे आहे की एक रशियन बाई ते चालवते. ती स्वतःला खानदानी घराण्यातील --- किंवा तसेच काही समजते. मी तिला ओळखतो आम्ही जुने मित्र आहोत."

जाप बोलला, "पण ती तर फक्त बाहुले आहे. जादा पैसे मिळवणारी ती नाही. अरीस्टीडे पापोपोलस नावाचा मुख्य वेटर आहे --- त्याला यात रस आहे --- पण हे त्याचे काम आहे, यावर आमचा विश्वास नाही. खरे तर आम्हाला माहिती नाही, की यामागे कुणाचा हात आहे?"

"आणि म्हणून इन्स्पेक्टर चार्ल्स स्टीव्हेन्स तिथे ते शोधायला गेला आहे?"

"ओहो, तू त्याला पाहिलेस का? कर भरणाऱ्यांच्या पैशांवर तो नशीबवान माणूस ते काम करतो आहे. आतापर्यंत त्याला बरेच काही सापडले आहे."

"तिथे काय शोधायचे आहे? तुझा काय संशय आहे?"

"डोप नावाच्या अंमली पदार्थांचे जाळे तिथे मोठ्या प्रमाणात असल्याचा संशय आहे. डोप पैशात विकले जात नाही, तर रत्नांमध्ये!"

"बापरे!"

तर असे हे आहे. ब्लँक बाईसाहेब --- किंवा कुठल्या कोणास ठाऊक, उमरावाची बायको --- छापा घालून नोटा पकडणे मुश्कील वाटते आहे --- कुठल्याही परिस्थितीत, बँकेतून मोठ्या रकमा काढल्या जात नसतील. पण तिच्याकडे रत्ने आहेत --- कधीकधी कुटुंबातून वारसा हक्काने आलेली. ती एका अज्ञात ठिकाणी नेऊन, स्वच्छ केली जातात किंवा नव्याने कोंदणात बसवली जातात. इथे किंवा दुसऱ्या खंडात विकली जातात. हा सगळा सरळ विक्रीचा व्यवहार आहे. इथे चोरी नाही, विशिष्ट रंग हवा किंवा तत्सम काही रड नाही. आज ना उद्या याचा शोध लागणारच, की नेकलेसवरील विशिष्ट तऱ्हेने जडवलेली रत्ने खोटी आहेत? ब्लँक बाईसाहेब म्हणजे सगळा निरागसपणा आणि दुःख आहे --- हे कसे किंवा कुठे घडले असेल, ते माहिती नाही. --- नेकलेस सतत तिच्याकडेच असत. नोकराणींना, संशय असलेल्या स्वयंपाक्यांना किंवा संशय असलेल्या सफाई कामगाराना काढून टाकल्यावर, गरीब, घाम गळणाऱ्या पोलिसांना रानटी बदकांचा पाठलाग करायचे काम आले.

पण या सामाजिक पक्ष्यांना वाटते, तेवढे काही आम्ही मुके नाही. आमच्याकडे एकामागून एक खूप केसेस येत असतात --- आणि आम्हाला एक सामान्य बाब आढळते --- सगळ्या बायका डोप घेतल्याची चिन्हे दाखवतात. नसा उत्तेजित होणे, चिडचिड,

झटके येणे, डोळ्यातील बाहुली मोठी होणे इत्यादी. प्रश्न असा होताः त्यांना डोप कुठून मिळत होते आणि हा व्यवसाय कोण चालवत होते?”

आणि तुला वाटते, उत्तर आहे, ही पाताळ नावाची जागा?”

“आमचा विश्वास आहे, की हे या सगळया व्यवसायाचे मुख्य केंद्र आहे. रत्नांवरील काम कुठे चालते, ते आम्ही शोधून काढले आहे --- गोलकोंडा लिमिटेड नावाच्या जागी --- ते जमिनीवर आहे. दर्जेदार नकली रत्नांचे दागिने तिथे बनतात. पॉल व्हॅरेस्को --- नावाचा वाईट मनुष्य आहे --- मला वाटते, तुला तो माहिती आहे?”

“मी त्याला पाहिले आहे --- पाताळात.”

“मलाही त्याला तिथे बघायला आवडेल --- खऱ्या ठिकाणी! ते वाईटपणात कुठल्याही थराला जाऊ शकतात --- पण बायका --- चांगल्या बायका --- त्याही त्याला सामील असतात. गोलकोंडा लिमिटेडबरोबर त्याचे काही लागेबांधे आहेत. माझी खात्री आहे, की तोच या पाताळचा सूत्रधार आहे. ही त्याच्यासाठी आदर्श जागा आहे --- तिथे सर्वजण जातात. समाजातील बायका, व्यावसायिक लोक --- ही चांगली भेटायची जागा आहे.”

“मला वाटते इथेच रत्नांच्या बदल्यात, डोप विकणे होत असावे का?”

“हो. आम्हाला त्याची गोलकोंडा बाजू माहिती आहे --- आता डोपची दुसरी बाजू शोधून काढायची आहे --- आम्हाला हे शोधून काढायचे आहे, की इथे मालाचा पुरवठा कोण करते व तो कुठून येतो.”

“आणि अजूनपर्यंत तुम्हाला ते माहिती नाही?”

“मला वाटते, ती रशियन बाई --- पण आमच्याकडे पुरावा नाही. काही आठवड्यांपूर्वी आम्हाला वाटले, आम्हाला तो मिळतो आहे. व्हॅरेस्को गोलकोंडा इथे गेला, तिथून काही रत्ने घेतली आणि तिथून सरळ पाताळात आला. स्टीव्हन्स त्याच्यावर लक्ष ठेऊन होता. पण त्याने प्रत्यक्ष माल विकतांना त्याला पाहिले नाही. जेव्हा व्हॅरेस्को तिथून निघाला, तेव्हा आम्ही त्याला पकडले --- त्याच्याकडे रत्ने नव्हती. आम्ही क्लबवर धाड टाकली. प्रत्येकाची तपासणी केली आणि काय झाले, तर रत्ने नाहीत आणि डोपही नाही!”

“म्हणजे फजितीच झाली?”

जापने कळ आल्यासारखा तोड वाकडे केले. अडचणीत सापडलो असतो, पण नशीबाने फेरी मारतांना, पेव्हेरेल मिळाला. [

बॅट्टेरसी खटल्यातील खुनी, तुला माहिती आहे. ] केवळ नशीब, तो स्कॉटलंडला जाणार होता. त्याच्या फोटोवरून आमच्या एका चटपटीत सार्जंटने त्याला पकडले. त्यामुळे, ज्याचा शेवट गोड, ते सर्वच गोड! --- या कामगिरीसाठी आम्हाला अभिमान वाटतो --- क्लबसाठी मोठ्या प्रोत्साहनाची गोष्ट ---तेव्हापासून सगळे जोमाने कामाला लागले आहेत.''

पायरो बोलला, ''पण त्यामुळे डोपच्या बाबतीत काही पाऊल पुढे पडले नाही. कदाचित त्या जागेला कुलूप ठोकले गेले असेल का?''

''नक्कीच. पण आम्हाला तिथे काही सापडले नाही. अगदी कोपरानकोपरा तपासला. आपल्याआपल्यात म्हणून सांगतो, तिथे पोलिसांच्या अधिकारातील तपासणीपेक्षा वेगळी तपासणीही केली --- त्याने डोळा मारला. ''काटेकोरपणे आत शिरायच्या व बाहेर पडायच्या जागेचा शोध घेतला. पण काही सापडले नाही. पण हे करणाऱ्या आमच्या माणसाला त्या दणकट मोठ्या कुत्र्याने जवळजवळ फाडून खाल्ले. तो तिथे झोपतो.''

''आहा, तो सर्बेरस नावाचा कुत्रा?''

''हो. कुत्र्याचे विचित्र नाव --- त्याचा अर्थ मिठाची पुडी असा आहे..''

पायरो विचारपूर्वक पुटपुटला, “सर्बेरस”

जापने सुचवले, “पायरो, तू यात लक्ष घातलेस तर! ही चांगली, त्यात लक्ष घालण्यासारखी समस्या आहे. लोकांचे शरीर व मन, दोन्हीचा विनाश करणाऱ्या मादक पदार्थांच्या जाळ्याचा मी द्वेष करतो. हे खरोखरचे पाताळ आहे!”

पायरो ध्यानस्थपणे बोलला, “हे सगळ्या गोष्टी बरोबर करेल. --- हो. हर्क्युलसचे बारा श्रम काय होते, ते तुला माहिती आहे का?”

“नाही.”

“त्या सर्बेरस कुत्र्याला पकडणे. हे बरोबर आहे, नाही का?”

“अरे म्हाताऱ्या, तू काय बोलतो आहेस, ते मला काही माहिती नाही. कुत्रा माणसाला खातो, ही मोठी बातमीच आहे.” एवढे बोलून जाप खो खो हसू लागला.

## तीन

पायरो बोलला, “मला तुझ्याशी गंभीरपणे बोलायचे आहे.”

लवकरची वेळ असल्याने क्लब अजून रिकामा होता. दरवाज्याजवळील एक लहानशा टेबलाशी पायरो व वेरा बसले होते. ती म्हणाली, “मला गंभीर असे काही वाटत नाही. शुद्ध

हरपायला आलेली ॲलीस, ती नेहमी गंभीर व खासगीत काही सांगत असते. त्याने मी कंटाळते. माझा बिचारा निकी, त्याला काय मजा येणार? काहीच नाही."

पायरो सातत्य राखत म्हणाला, "तुझे त्याच्याबद्दलचे प्रेम मला जाणवते. आणि मला तुला दुग्ध्यात पडल्यासारखे बघायला आवडत नाही."

"पण हे तू काहीतरीच बोलतो आहेस. पैसा वाहतो आहे. मी अत्यंत सुखी आहे."

"ही जागा तुझी आहे?"

तिचे डोळे किंचित टाळाटाळ करणारे झाले. ती बोलली, "अर्थात."

"पण तुझा कुणी भागीदार आहे का?"

तिने विचारले, "हे तुला कोणी सांगितले?"

"तुझा भागीदार पॉल व्हॅरेस्को आहे का?"

"ओहो, पॉल व्हॅरेस्को! काय कल्पना आहे!"

"त्याचे उद्योग चांगले नाहीत --- तो गुन्हेगार आहे. इथे गुन्हेगारांचे येणे जाणे आहे, याची तुला कल्पना आहे का?"

वेरा जोराने हसू लागली. “हा खास मध्यमवर्गीय सामाजिक दृष्टीकोन बोलतो आहे. अर्थातच मी हे जाणते. तुला हे कळत नाही का, की या जागेचे अर्धे आकर्षण त्यातच आहे. हे मेफेअरचे तरुण लोक --- वेस्टएंड मध्ये त्यांच्याचसारखे लोक आजूबाजूला बघून ते कंटाळले आहेत. ते इथे येऊन, गुन्हेगार, चोर, ब्लॅकमेल करणारे, लबाड लोक --- कदाचित खुनीदेखील लोकांना बघतात. पुढच्या रविवारी ज्याचे नाव वर्तमानपत्रात झळकणार आहे, असा खुनी! हे उद्दीपित करणारे आहे --- ते म्हणतात, इथे त्याना आयुष्य दिसते. तसेच श्रीमंत माणूस --- जो आठवडाभर चड्ड्या, बायकांची घट्ट कंबरवस्त्रे आणि मोजे विकतो. त्याला त्याच्या माननीय मित्रांपासून व माननीय आयुष्यापासून किती बदल मिळतो! आणि अजून मजा म्हणजे --- त्या टेबलावर बघ --- त्याच्या मिशा पिळत बसलेला स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर आहे --- त्याच्या कामगिरीवर आलेला आहे.”

पायरो मृदुपणे म्हणाला, “म्हणजे तुला हे माहिती आहे तर?”

दोघांची नजरानजर झाल्यावर ती हसली. “अरे मित्रा, तुला वाटते, तितकी मी साधी नाही.”

‘मग येथील मादक द्रव्यांच्या जाळयात तू देखील गुंतलेली आहेस?”

“नाही. नाही. ती माझी बदनामी ठरेल.”

पायरोने दोन क्षण तिच्याकडे बघितले व सुस्कारा टाकला. तो बोलला, “मी तुझ्यावर विश्वास ठेवतो. पण ही जागा नक्की कुणाची आहे, हे तू मला सांगणे गरजेचे आहे.”

ती टोकेरीपणे म्हणाली, “ही माझ्या मालकीची आहे.”

“कागदोपत्री हो. पण यामागे कुणीतरी आहे.”

“अरे मित्रा, तुला माहिती आहे का, मला हे फार चौकसपणाचे वाटते आहे. तू इतका चौकसपणा का करत आहेस?”

शेवटचा शब्द बोलल्यावर तिचा आवाज एखाद्या कबुतरासारखा झाला. तिने तिच्या ताटलीतील बदकाचे हाड मोठ्या काळ्या कुत्र्यापुढे फेकले. त्याने जबड्याची भयानक हालचाल करून, ते पकडले.

पायरोने विचारले, “तू त्या कुत्र्याचे काय नाव घेतलेस?”

“हा सर्बेरस माझा मित्र व साथीदार आहे.”

“पण हे असले नाव विचित्र आहे!”

पण तो खूप प्रेमळ व आनंद देणारा आहे. तो पोलीस कुत्रा आहे. तो काहीही करू शकतो --- काहीही --- थांब!”

तिने उठून आजूबाजूला पाहिले. अचानक तिने जेवणापूर्वी नुकतीच आणलेली जवळील टेबलावरील चविष्ट ताटली मोठ्या काठीने भिरकावून दिली. तिने पुढे आलेल्या संगमरवरी भागापर्यंत जाऊन, रशियनमध्ये काही बोलत, ती ताटली कुत्र्यासमोर ठेवली.

त्या कुत्र्याने त्याच्यासमोर बघितले. काठी जणू अस्तित्वातच नव्हती. "तू पाहिलेस? काही मिनिटांचा प्रश्न नव्हता. फक्त हा कुत्रा गरज असेल, तर तासनतास तसाच्या तसा राहू शकतो."

तिने काही शब्द उच्चारले. आणि विजेच्या कडकडाटासारख्या त्या कुत्र्याने त्याची लांब मान वळवली आणि जणू जादूसारखी काठी अदृष्य झाली.

वेरा रॉसाकोफने चवड्यावर उभे राहून, कुत्र्याच्या गळ्याभोवती हात टाकून, त्याला भावनातिरेकाने जवळ घेतले. ती ओरडली, "बघ, तो किती सभ्य आहे! माझ्यासाठी, ॲलीससाठी व त्याच्या मित्रांसाठी --- ते त्याला काही करू शकतात. पण त्यासाठी त्याला भरभर सूचना द्याव्या लागतात. मी तुला खात्री देऊ शकते, की तो पोलीस इन्स्पेक्टरला फाडून खाईल --- त्याचे लहान तुकडे करेल." एवढे बोलून, ती हसत सुटली.

“मी तेच म्हणणार होतो --- “ पायरो घाईने बोलला. त्याने वेराच्या विनोदी बोलण्यावर विश्वास ठेवला नाही. इन्स्पेक्टर स्टीव्हेन्स खरेच धोक्यात होता.

“प्राध्यापक लीस्केआर्डला तुमच्याशी बोलायचे आहे.” प्राध्यापक तिच्या कोपराशी नाराजी दाखवत उभा होता. त्याने कुरकुरत म्हटले, “तुम्ही माझ्या ताटलीतील मोठे हाड घेतले. तुम्ही असे का केले? ते चांगले होते.”

## चार

जाप बोलला, “म्हाताऱ्या, गुरुवारी रात्री नशेतील लोकांचे फुगे वर जातात. ते अर्थात अँन्ड्र्युचे डुक्कर असते --- मादक द्रव्याचा शोध घेणारा वेगळा पोलीस विभाग आहे. पण तू त्यात घुसलास तर त्यांना आनंद होईल. नाही, आभारी आहे. मला तुझी काही वेगवेगळी सरबते नकोत. मला माझ्या पोटाची काळजी घ्यायला हवी. तिकडे ती व्हिस्की मला दिसते आहे का? ती मला चालेल.”

त्याचा पेला सरसावत, तो बोलला, “मला वाटते, आम्ही समस्या सोडवली आहे. या क्लबमधून बाहेर पडायचा अजून एक रस्ता आहे --- आम्ही तो शोधून काढला आहे.”

”कुठे?”

“लोखंडी जाळीच्या मागे. त्याचा काही भाग गोल झुलत असतो.”

“पण तुला नक्की दिसेल --- “

“अरे नाही. जेव्हा धाड घालणे सुरु झाले, तेव्हा वीज गेली --- मुख्य बोर्डच बंद केला गेला. वीज परत आणण्यासाठी आम्हाला एक दोन मिनिटे लागली. पुढच्या दाराने कोणी गेले नाही, कारण त्यावर लक्ष ठेवले गेले होते. पण हे स्पष्ट आहे, की कुणीतरी काही कारभार करून, गुप्त वाटेने सटकले. अशा तऱ्हेने आमचा बेत फसला.”

“तुमचा बेत काय होता?”

जापने डोळे मिचकावले. “आम्ही ठरवलेल्या बेताप्रमाणे सगळे चालू होते --- पोलीस आले. वीज गेली --- आणि कोण येते आहे हे बघण्यासाठी गुप्त दाराच्या दुसऱ्या बाजूला थांबलेले कुणीतरी होते. यावेळेस आम्ही त्यांना पकडले आहे.”

“गुरुवार का?”

परत जापने डोळे मिचकावले. “आम्ही गोलकोंड्याचे बोलणे चांगले ध्वनीमुद्रित केले आहे. तिथून माल गुरुवारी बाहेर जाणार आहे. कॅरिंग्टनची रत्ने!”

"तुम्ही त्यांना परवानगी द्या. मी पण एक दोन प्रकारची व्यवस्था करु का?"

## पाच

गुरुवारी रात्री त्याच्या नेहमीच्या आत शिरायच्या लहान टेबलाशी बसून पायरोने आजूबाजूचे निरीक्षण केले. रोजच्यासारखे पाताळ जोरात सुरु होते.

शक्य असेल, तर वेरासुद्धा नेहमीपेक्षा जास्त चमकदारपणे नटली होती. आज ती अगदी पूर्णपणे रशियन दिसत होती. ती टाळ्या पिटत होती व हसता हसता किंचाळत होती. पॉल व्हॅरेस्को आलेला होता. काही वेळा तो अगदी बिनचूक संध्याकाळचे कपडे घाले, तर कधी आजच्याप्रमाणे, रस्त्यावरील आक्रमक मवाल्यासारखा घट्ट बटणे लावलेला कोट, मानेभोवती रुमाल असे कपडे घाले. ते आकर्षक पण दुष्टपणाचे दिसे. तो लहानशा वहीत काही लिहिण्यात गुंग असलेल्या ॲलीस कनिंगहॅमवर वाकून, हिऱ्यांनी मढलेल्या तगड्या मध्यमवयीन स्त्रीपासून दूर जाऊन, ॲलीसला नृत्य करण्याबद्दल विचारत होता. तगड्या स्त्रीने ॲलीसकडे बघून नापसंतीने भुवई उंचावली व व्हॅरेस्कोकडे मोठ्या प्रेमाने बघितले.

मिस कनिंगहॅमच्या डोळ्यात स्तुती नव्हती. ते पूर्ण शास्त्रीय रुचीने चमकत होते. ते दोघे नाचत पायरोच्या अंगावरून गेले, तेव्हा त्याने त्यांच्या संभाषणातील काही भाग ऐकला. पॉल तीन वर्षांचा असतानाच्या दाईचा भाग संपवून, आता ती पॉलच्या निवासी शाळेच्या मेट्रनकडून माहिती गोळा करण्यापर्यंत येऊन पोचली होती. संगीत संपल्यावर, ती आनंदी व उद्दीपित झालेल्या पायरोशेजारी येऊन बसली.

ती म्हणाली, 'फार रुचीपूर्ण! व्हॅरेस्को हा माझ्या पुस्तकातील सर्वात महत्वाची केस असणार आहे. प्रतिकात्मता बिनचूक आहे. उदाहरणार्थ, त्याने त्याच्या इतर मित्रांबरोबर बिनबाह्यांचा लाल गंजीफ्रॉक घातला होता --- आणि सर्व गोष्ट एकदम साधी सरळ होऊन गेली. तो नक्की गुन्हेगार प्रवृत्तीचा आहे, असे तुम्ही म्हणू शकता. पण त्याला सुधारायचा प्रयत्न होऊ शकतो.''

पायरो म्हणाला, ''म्हणजे स्त्री गुन्हेगारी वृत्तीच्या माणसाला सुधारू शकते? हा तिचा आवडता भ्रम आहे.''

ॲलीस कनिंगहॅमने त्याच्याकडे थंडपणे पाहिले. ''मिस्टर पायरो, यात व्यक्तिगत काही नाही.''

पायरो म्हणाला, कधीच नसते. हे नेहमी फक्त दुसऱ्यांच्या कल्याणासाठी असते. पण सहसा त्याचा उद्देश विरुद्ध लिंगी

आकर्षक प्राणी असतो. उदाहरणार्थ, मी कुठल्या शाळेत गेलो किंवा माझ्याबद्दल मेट्रनचा दृष्टीकोन काय होता, यात तुम्हाला रुची असेल का?”

मिस कनिंगहॅम म्हणाली, “तुम्ही काही गुन्हेगार वृत्तीचे नाही.”

“एखाद्याला बघितल्यावर तुम्हाला तो गुन्हेगार वृत्तीचा असल्याचे कळते का?”

“नक्कीच कळते.”

प्राध्यापक लीस्केआर्ड त्यांच्याकडे आला व पायरोशेजारी बसला.

“तुम्ही गुन्हेगारांबद्दल बोलता आहात का? मग तुम्ही हमुराबीचे इ.स. पूर्वी १८०० सालचे गुन्हेगारांबद्दलचे पुस्तक वाचले पाहिजे. ते फार रुचीपूर्ण आहे. आग लागलेली असतांना जो चोरी करतांना सापडला त्याला आगीतच फेकायला हवे.”

तो त्याच्यासमोर असलेल्या लोखंडी जाळीकडे आनंदाने बघत होता.

जुने सुमेरियन कायदे आहेत. जर बायको नवऱ्याचा द्वेष करत असेल आणि त्याला म्हणत असेल, “तू माझा नवरा नाहीस.” तर ते तिला नदीत फेकून देतात. कोर्टात जाऊन घटस्फोट मिळवण्यापेक्षा सोपे आणि स्वस्त! पण नवरा जर बायकोला असे

म्हणाला, तर त्याला फक्त तिला ठराविक वजनाची चांदी द्यावी लागते. त्याला कोणी नदीत फेकत नाही.”

अॅलीस कनिंगहॅम म्हणाली, “तीच जुनी गोष्ट. पुरुषाला वेगळे कायदे आणि स्त्रीला वेगळे कायदे.”

प्राध्यापक विचारपूर्वक बोलले, “स्त्रियांना अर्थात पैशांचे महत्व जास्त जाणवते. तुम्हाला माहिती आहे, मला ही जागा आवडते. मी बऱ्याच वेळा संध्याकाळी इथे येतो. मला पैसे द्यावे लागत नाहीत. वेराने ते तसे सांगितले आहे --- हे तिने फार चांगले केले आहे --- मी तिला येथील सजावटीबद्दल सल्ला दिल्यामुळे, असे ती म्हणते. खरे तर त्याचे मला एवढे काही देणेघेणे नाही --- ती मला प्रश्न का विचारत होती, याची मला काही कल्पना नाही --- ती आणि सजावट कलाकार याना ते नीट कळले नाहीच. त्या भयानक गोष्टींशी माझा दुरान्वयानेही संबंध नाही, हे कधीच कुणाला समजले नसेल, अशी मी आशा करतो. पण ती गोष्ट मी नजरेआड करायला नको. मला नेहमी वाटते, ती थोडी बॅबिलोनियन काळातील नवलपूर्ण बाई आहे --- तुम्हाला माहिती असेल, तर बॅबिलोनियन बायका व्यापारात फार हुशार होत्या.”

प्राध्यापकाचे शब्द अचानक आलेल्या एकत्रित आवाजात बुडाले. ‘पोलीस’ हा शब्द ऐकू आला --- गोंधळ चाललेला ऐकून,

बायका उठून उभ्या राहिल्या. दिवे गेले आणि विजेवरची भट्टीही बंद झाली. हमुराबीच्या कायद्यांमधील विविध उतारे, बोलून दाखवणारा प्राध्यापकांचा आवाज त्रासिक होऊन खोल व शांत होत गेला.

पायरो रुंद, खोलगट पायऱ्या अर्धवट चढलेला असतांना पुन्हा दिवे गेले. दारातील पोलीस ऑफिसरांनी त्याला सलाम केला. तो रस्त्यावर गेला आणि कोपऱ्यापर्यंत फेरी मारली. तिथे भिंतीलगत एक लहान, वाईट वास येणारा, लाल नाकाचा मनुष्य होता. तो कुजबुजल्यासारख्या, खर्जातील चौकस स्वरात बोलला, "मी त्यांचा पिता आहे. माझे काम करायची वेळ झाली आहे का?"

"ठीक आहे. तसे करा."

"तिथे अनेक कॉपरच्या रंगाची उदार माणसे आहेत."

"ते ठीक आहे. त्याना तुमच्याबद्दल सांगितले आहे."

"माझी एवढीच अपेक्षा आहे, की त्यांनी मध्ये मध्ये लुडबुड करू नये?"

"ते तसे करणार नाहीत. जे करण्यासाठी तुम्ही बाहेर पडला आहात, ते तुम्ही मिळवणार? त्या प्रश्नातील पशू मोठा आणि भयानक आहे." तो लहानसा माणूस आत्मविश्वासाने बोलला,

“माझ्यासाठी तो पशू तसा भयानक नाही. माझ्याकडे जे आहे, त्यामुळे कोणताही कुत्रा पाताळामध्ये माझ्याबरोबर येईल.”

पायरो पुटपुटला, “तर मग त्याला पाताळाच्या बाहेरही तुमच्याबरोबर यायला हवे.

## सहा

सकाळच्या थोड्या तासांमध्ये फोन खणखणला. पायरोने तो उचलला. जाप बोलला, “तू मला फोन करायला सांगितला होतास.”

“होय मित्रा, खरेच की!”

“ते मादक पदार्थ, डोप सापडले नाहीत पण रत्ने सापडली.”

“कुठे?”

“प्राध्यापक लीस्केआर्डच्या खिशात.”

“प्राध्यापक लीस्केआर्ड?”

“तुलाही नवल वाटले ना? खरे तर मला कळेना, काय विचार करावा! तो तर एखाद्या आश्चर्यचकित झालेल्या लहान मुलासारखा त्यांच्याकडे बघत म्हणाला, की ते त्याच्या खिशात कसे आले, याची त्याला सुतराम कल्पना नाही. आणि माझा विश्वास आहे, की

तो खरे बोलत होता. दिवे गेले तेव्हा व्हॅरेस्कोने सहजपणे ते त्याच्या खिशात घातले असणार. मला नाही वाटत की लीस्केआर्डसारखा म्हातारा माणूस या डोपच्या जाळयात गुंतलेला असेल. तो फक्त दिखाऊ उच्च समाजाचा सभासद असावा. नाहीतर तो ब्रिटीश वस्तुसंग्रहालयाशी तरी संबंधित का असावा? तो फक्त पुस्तकांवर, जुन्या कमी किमतीच्या पुस्तकांवर खर्च करतो, ही गोष्ट खरी असावी. नाही. तो या प्रकरणात बसत नाही. या सर्व प्रकरणाचा आपला विचार कुठेतरी चुकतो आहे. त्या क्लबमध्ये कधी डोप नव्हतेच.''

“माझ्या मित्रा, आज रात्री ते तिथे होते. मला एक सांग, तुझ्या गुप्त रस्त्याने कुणी बाहेर पडले नाही का?''

“हो. स्कँडेनबर्गचा राजपुत्र हेन्री आणि त्याचा लवाजमा --- तो इंग्लंडमध्ये कालच आला. राज्यमंत्री व्हिटॅमिअन इव्हान्स [ कामगार मंत्री यासारखे वाईट काम असल्याने तुम्हाला खूप काळजी घ्यावी लागते. तुम्ही वारेमाप खर्च केलात, तरी पाठींबा देणारा गट काही बोलत नाही. कारण कर भरणाऱ्यांना वाटते, की तो त्यांचाच पैसा आहे --- पण जेव्हा विरुद्ध पक्षातील लोक असतात, तेव्हा लोकांना वाटते की तो त्यांचे पैसे उधळत आहे --- त्यामुळे मोठ्या खुबीने बोलावे लागते. ] बिट्राइस व्हिनेर बाईसाहेब

शेवटच्च्या होत्या --- त्यांचे परवा लिओमिन्स्टरच्च्या श्रेष्ठ अशा तरुण उमरावाशी लग्न होते. मला नाही वाटत, की लग्नाची वऱ्हाडी मंडळी येथील गर्दीत होती."

"तुमचा विश्वास सार्थ होता. तथापि क्लबमध्ये डोप होते आणि कुणीतरी ते क्लबबाहेर नेले."

"पण कुणी?"

"पायरो मवाळपणे बोलला, "अरे मित्रा, मी"

दाराची घंटी वाजली, तेव्हा त्याने जापचा फटाके फुटल्यासारख्या आवाजाचा फोन बंद केला. त्याने जाऊन पुढचे दार उघडले. वेरा रॉसाकोफ आत आली.

ती ओरडली, "जर आपण इतके म्हातारे नसतो, तर किती छान समेट झाला असता! हे बघ, तू तुझ्या चिठ्ठीत सांगितल्याप्रमाणे मी आले आहे. मला वाटते, माझ्यामागे पोलीस आहे. पण तो रस्त्यावर थांबू शकतो. आणि आता माझ्या मित्रा, हे काय आहे?"

पायरोने एखाद्या नायकासारखा तिचा फरचा कोट काढायला मदत केली. त्याने विचारले, "तू प्राध्यापकाच्या खिशात रत्ने का ठेवलीस? हे तू चांगले केले नाहीस. हे करायचे कारण काय?"

वेराने डोळे पूर्ण उघडून बघितले. "नैसर्गिकपणे, मला ते तुझ्या खिशात घालायचे होते."

“ओहो, माझ्या खिशात?”

“खात्रीने. तू जिथे नेहमी बसतोस, त्या टेबलावरून मी घाईघाईने गेले --- पण तेवढ्यात दिवे गेले आणि मी चुकून ते प्राध्यापकाच्या खिशात घातले.”

“आणि ती चोरलेली रत्ने तुला माझ्या खिशात का घालायची होती?

“मला असे वाटले --- तुला समजले का, मला फार भरभर विचार करावा लागला --- तसे करणेच उत्तम होते.”

“वेरा, तू खरेच अमूल्य आहेस!”

“पण प्रिय मित्रा, असे बघ, पोलीस आले आहेत. दिवे गेले आहेत. [ आमच्या बहुमूल्य गिऱ्हाईकांना त्रास होऊ नये, यासाठी असलेली आमची छोटीशी खासगी व्यवस्था ] एका हाताने माझी बॅग टेबलावरून ओढून नेली गेली. मी ती खेचून परत मिळवली. पण मला मखमलच्या आत काहीतरी कडक लागले. मी माझा हात आत घातला. स्पर्शाने मला ती रत्ने असल्याचे समजले. मला ताबडतोब कळले, की ती कुणी तिथे ठेवली आहेत.”

“ओहो, खरे की काय?”

“अर्थात मला समजले. तो तो हलकट होता. ती पाल, तो राक्षस, तो चेहऱ्यावर चेहरा चढवलेला, फसव्या, लाज आणणारा डुकराचा पोर, पॉल व्हॅरेस्को.”

“पाताळामध्ये तुझा भागीदार आहे तो?”

“हो. हो. तोच जागेचा मालक आहे. त्यानेच पैसे घातले आहेत. आजपर्यंत मी त्याला फसवले नाही --- मी विश्वासाला धक्का लावला नाही. पण त्याने मला फसवले. मला पोलीस बोलावून संकटात घालायचा प्रयत्न केला --- ओहो, आता मी त्याचे नाव कटापच करून टाकते. त्याच्या नावावर मी थुंकते.”

पायरो म्हणाला, “शांत हो. माझ्याबरोबर पुढच्या खोलीत ये.”

त्याने दार उघडले. ती एक लहानशी खोली होती. क्षणभर त्याला असे वाटले, की ती पूर्णपणे कुत्र्याने व्यापून टाकलेली आहे. पाताळच्या ऐसपैस जागेतही तो कुत्रा, सर्बेरस भला दांडगा दिसत होता. पायरोच्या छोट्या सदनिकेच्या छोट्याशा जेवायच्या खोलीत बाकी काही नाही, तर फक्त सर्बेरस भरून राहिला होता. तिथे एक घाणेरडा वास येणारा मनुष्यही होता.

खर्जातील आवाजात तो मनुष्य बोलला, “बाबा, आपल्या ठरलेल्या बेताप्रमाणे मी इथे आलो आहे.

वेरा किंचाळली, “मित्रा, छान! माझ्या देवदूत मित्रा, किती छान!”

सर्बेरसने जमिनीवर शेपटी आपटली --- पण त्याने हालचाल केली नाही.

सर्बेरसच्या शेपटी आपटण्याच्या आवाजापेक्षा जोरदार आवाज काढून, पायरो ओरडला, “मिस्टर विलियम हिग्सबरोबर मला तुझी ओळख करून देऊ दे. तो त्याच्या व्यवसायात माहीर आहे. आज रात्रीच्या येथील गडबड गोंधळात मिस्टर हिग्स सर्बेरसला पाताळाच्या बाहेर पडायला लावतील. आपण त्याच्या मागोमाग जाऊ.”

वेराने अविश्वासाने त्या लहानशा उंदरासारख्या आकृतीकडे बघत विचारले, “तुम्ही त्याला तसे करायला लावाल? पण कसे काय? हे तुम्हाला जमेल?”

मिस्टर हिग्सने लाजेने त्याचे डोळे खाली वळवले.

“हिग्सला बाईसाहेबांना काही सांगायचे आहे. त्याला कुत्रे कधीच विरोध करत नाहीत.” मिस्टर हिग्स म्हणाला, “मी कुत्र्याला कसेही वागवू शकतो. अर्थात तुम्हाला हे माहिती आहे, की कुत्री असेल तर मी तीच पद्धत वापरू शकत नाही. ती वेगळी पद्धत असते.”

वेरा रॉसाकोफ पायरोकडे वळली. “पण का? का?”

पायरो सावकाशीने बोलला, “प्रशिक्षण दिलेला कुत्रा त्याला जोपर्यंत सांगितले जात नाही, तोपर्यंत त्याच्या तोंडातील वस्तू खाली टाकत नाही. तशी गरज असेल, तर तो तासनतास ती वस्तू तोंडात धरून ठेवतो. आता त्या कुत्र्याला तू त्याच्या तोंडातील वस्तू खाली टाकायला सांगशील का?”

वेरा रॉसाकोफने रोखून बघितले, वळली आणि दोन कोरडे शब्द बोलली. सर्बेरसने त्याचा मोठा जबडा उघडला. मग त्याने केलेली कृती जबरदस्त होती. त्याची जीभ तोंडातून जणू बाहेर पडते आहे, असे वाटत होते --- पायरो पुढे झाला. रबर लावलेल्या छोट्याशा गुलाबी पेटीतून, लहानशी पुडी काढून उघडली. त्यात पांढरी पावडर होती.

वेराने टोकेरीपणे विचारले, “हे काय आहे?”

पायरो मृदुपणे बोलला, “कोकेन. ही इतकी लहानशी वाटते --- पण ही काहीजण खुशीने हजार पौंड देऊन विकत घेतात. शेकडो लोकांना विनाशाप्रत नेऊन ती त्यांची वाट लावू शकते --- “

तिने श्वास रोधून धरला. ती किंचाळली, “आणि तुम्हाला वाटते, मी --- पण तसे नाही! मी शपथेवर सांगते, मी असले धंदे करत नाही. पूर्वी मी रत्नांनी माझे मनोरंजन केले. कुतूहल

शमवण्यासाठी लहानसहान दागिने --- यामुळे एखाद्याला जगायला मदत होते, समजले? आणि मला वाटते, असे का नाही करायचे? एका माणसाकडे जे नाही, ते दुसऱ्याकडे का असावे?"

मिस्टर हिग्स बोलले, "हेच मला कुत्र्यांबद्दल वाटते."

पायरो दुःखाने वेराला म्हणाला, "तुला योग्य व अयोग्य याची काही जाण नाही."

तिने चालू ठेवले, "पण मादक द्रव्ये --- ते नाही! कारण त्यामुळे दुःख, त्रास, हानी होते. मला कल्पना नाही --- जराही कल्पना नाही --- की माझा इतका सुंदर, निरागस, छोटासा पाताळ अशा कामासाठी वापरला जातो आहे!"

मिस्टर हिग्स म्हणाले, "मी डोपच्या बाबतीत तुमच्याशी सहमत आहे. भल्या दांडग्या कुत्र्यांना मादक द्रव्य देणे --- हे घाणेरडे आहे --- आहेच --- मला असल्या गोष्टींशी काही देणेघेणे नाही. मी कधीच असे करत नाही."

वेरा काकुळतीने म्हणाली, "पण माझ्या मित्रा, तू म्हणालास तुझा माझ्यावर विश्वास आहे."

"माझा तुझ्यावर विश्वास नक्कीच आहे. मी डोपच्या जाळ्याचा खरा सूत्रधार कोण आहे, हे शोधून काढण्यासाठी मी वेळ आणि त्रास घेतला नाही का? आणि हर्क्युलसचे बारावे श्रमाचे

काम मी केले नाही का? आणि माझी केस सिद्ध करण्यासाठी सर्बेरसला पाताळातून वर काढले नाही का? मला माझे मित्र कुठल्या भानगडीत अडकलेले आवडत नाहीत, म्हणून मी हे केले. हो, अडकलेले! --- कारण जर गोष्टींना भलतेच वळण लागले असते, तर तुझ्यावर त्याचे खापर फुटले असते. तुझ्या छोट्या बॅगेत रत्ने सापडली असती. आणि जर कोणी [ माझ्यासारखे ] हुशार असते, तर त्याने रानटी कुत्र्याच्या तोंडात ते लपवायची जागा असल्याचा संशय घेतला असता. अग वेरा, तो तुझा कुत्रा आहे, नाही का? जरी त्याने सजगपणा थोड्या प्रमाणात गमावला असता, तरी त्याने ॲलीसच्या आज्ञाही पाळल्या असत्या. तू तुझे डोळे आता तरी उघडू शकतेस. मला पहिल्यापासून ती शास्त्रीय शब्द वापरणारी आणि मोठ्या खिशांचे कोट आणि स्कर्ट वापरणारी मानसशास्त्रज्ञ तरूण स्त्री आवडली नव्हती. हो, मोठ्या खिशांचे कोट आणि स्कर्ट! कोणीही स्त्री तिच्या दिसण्याबाबत एवढी बेफिकीर असावी, हे थोडे अनैसर्गिक होते. आणि ती मला काय म्हणाली --- प्राथमिकता जास्त महत्वाची असते. आहा, काय पण झाकापाक! प्राथमिकता कशात असेल, तर ती तिच्या मोठ्या खिशात! ज्यात ती डोपसारखे मादक पदार्थ घालून आणू शकते आणि रत्ने नेऊ शकते. गुन्ह्यातील तिच्या मदतनीसाबरोबर नाचत असतांना ती हे सहज करू शकत होती. आणि वर तो तिचा

मानसशास्त्राच्या अभ्यासातील महत्वाचा विषय असल्याचे ढोंग करत होती. काय ही युक्ती! कोणालाच त्या वैद्यकीय पदवी असलेल्या चष्मिस, प्रामाणिक, शास्त्रीय मानसशास्त्रज्ञ बाईचा संशय आला नाही. ती बाहेरून तस्करी करून डोप आणू शकत होती. तिच्या श्रीमंत रुग्णांना त्याची सवय लावत होती. तो पैसा रात्रक्लबमध्ये घालत होती. आणि हे सर्व दुसरे कोणीतरी --- ज्याचा भूतकाळ फारसा बरा नाही, तो चालवत असल्याचा आभास निर्माण करत होती. हर्क्युल पायरोला कःपदार्थ समजत होती. तिच्या मानसशास्त्राच्या संशोधनाच्या थापा मारून त्याला आपण सहज फसवू शकू, असे तिला वाटत होते. पण अग मैत्रिणी, मी त्यासाठी तयार आहे. तुला माहिती आहे का, दिवे गेल्यावर पटकन मी माझ्या टेबलावरून उठतो आणि सर्बेरसच्या बाजूला जाऊन उभा रहातो. अंधारात मला ती आल्याचे समजते. ती त्याचे तोड उघडते. आणि आत पाकीट कोंबते. मी तिच्या नकळत तिच्या कोटाच्या बाहीचा एक तुकडा कात्रीने कापून घेतो.”

नाटकीपणे तो गुन्ह्यातील पुरावा सादर करतो.

तुम्हाला दिसते --- चौकडीचे ट्विडचे तिच्या स्कर्टसारखे कापड --- जिथून काढले तिथे परत जोडून टाकण्यासाठी, तो ते

जापला देणार असतो --- आणि मग अटक --- आणि स्कॉटलंड यार्ड किती हुशार आहे, हे परत एकदा सिद्ध होणार.”

वेरा अवाक होऊन पायरोकडे बघत राहिली. जहाजांना धुक्याची सूचना देणाऱ्या यंत्रासारखी ती अचानक किंचाळली.

“पण माझा निकी --- माझा निकी! त्याच्यासाठी हे भयंकर असेल --- का मी याचा विचारच करू नये?”

पायरो म्हणाला, “अमेरिकेत इतर खूप मुली आहेत.”

“पण त्याची आई तुरुंगात असेल --- तुरुंगात --- केस कापलेली ---तुरुंगातील खोलीत बसलेली --- डास घालवण्यासाठी मारलेल्या फवाऱ्याचा वास घेत बसलेली. ओहो, पण तू नवलपूर्ण आहेस --- नवलपूर्ण.”

पुढे सरकत भावनावेगाने स्लॅव्हिक भाषेत काही बोलत, तिने पायरोला हाताने कवळून, मिठी मारली. सर्बेरस कुत्र्याने शेपटी जमिनीवर आपटली.

या आनंदाच्या क्षणी घंटीचा आवाज आला. वेराच्या मिठीतून स्वतःला सोडवून घेत, पायरो ओरडला, “जाप!”

वेरा बोलली, “मी दुसऱ्या खोलीत गेले, तर कदाचित बरे ठरेल.” ती दारातून सटकली. पायरो हॉलकडे निघाला. मिस्टर हिग्स

धाप लागल्यासारखा पण उत्सुकतेने म्हणाला, "अरे बाबा, तू जरा आरशात बघितलेस, तर बरे होईल, नाही का?"

पायरोने तसे केले आणि घाबरून मागे झाला. त्याच्या चेहऱ्याला लिपस्टिक आणि मेकपचे मिश्रण लागून, तो अजब दिसत होता.

मिस्टर हिग्स म्हणाला, "जर तो स्कॉटलंड यार्डचा जाप असेल, तर मला नक्कीच खराब वाटेल." पायरो रागाऊन, त्याची मिशी साफ करू लागला. परत जोरात घंटी वाजल्यावर मिस्टर हिग्स पुढे बोलला, "तुला मी काय करायला हवे आहे? --- मी हे बघत बसू का? थोड्याच वेळात काय होणार आहे?"

पायरो म्हणाला, "जर मला नीट आठवत असेल, तर सर्बेरस पाताळात परत आला आहे.

मिस्टर हिग्स म्हणाले, :तुम्ही म्हणता, तसेच झाले आहे. खरे तर मी अशी कल्पना करत होतो, तो अजून --- मला चिमटा काढावासा वाटेल, असा तो नाही --- फारच लक्ष वेधून घेणारा आहे. मला काय म्हणायचे आहे, ते तुला समजले असेल. गाईच्या पुढच्या खुराचा खालील भाग किंवा घोड्याचे मास सर्बेरस माझ्या मते, सिंहाच्या छावा खाईल, तितके थोडेसे खातो."

पायरो पुटपुटला, “नेमियन सिंहापासून सर्बेरसच्या अपहरणापर्यंत, हे हर्क्युलसचे श्रम पूर्ण झाले.”

## सात

एक आठवड्याने, मिस लेमनने पायरोकडे बिल आणले. “मिस्टर पायरो, मला माफ करा. पण मी हे बिल भरू का? लीओनोरा फुलवाला. लाल गुलाब अकरा पौंड आठ शिलिंग व सहा पेनी --- वेरा रॉसाकोफ बाईसाहेबांसाठी, पाताळ,१ ३ एंड रस्ता WC १, या पत्त्यावर पाठवले.”

लाल गुलाबांची छटा हर्क्युल पायरोच्या गालावर आली होती. तो लाजला. डोळ्यांनी लाजला.

“मिस लेमन, अगदी क्रमाने बरोबर. प्रसंगाला साजेसा फुलांचा गुच्छ! वेरा रॉसाकोफच्या मुलाचा आताच अमेरिकेत, त्याच्या स्टीलचा राजा असलेल्या मालकाच्या मुलीबरोबर साखरपुडा झाला. मला आठवते त्याप्रमाणे, लाल गुलाब तिचे आवडते फूल आहे.”

मिस लेमन बोलली, “वर्षातील यावेळी ती फुले फार महाग असतात.”

पायरोने स्वतःला ताठ केले. तो म्हणाला, “काही प्रसंग असे असतात, की खर्चाचा विचार करून चालत नाही.”

तोंडाने लहानशी धून गुणगुणत, तो दाराबाहेर गेला. त्याची पाऊले उत्साहाने भरलेली होती. मिस लेमन त्याच्याकडे मागून बघत होती. ती तिचे काम विसरून गेली. तिच्या स्त्रीत्वाच्या सर्व सहजप्रवृत्ती उफाळून आल्या.

ती पुटपुटली, “अरे देवा, मला नवल वाटते --- खरेच --- त्याच्या या वयात! --- नक्कीच नाही --- “

## अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे सत्ताविस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)
























डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)













वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY


वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे सत्ताविसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू

गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(९), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(२७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१४), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आाळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।